कृषीवल
रायगड, शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०२५
किंमत ४ ₹

## लाचखोर पोलीस एसीबीच्या जाळ्यात

**रायगड :** पोस्कोच्या गुन्ह्यातून वाचविण्याबरोबरच मदत करण्यासाठी साडेतीन लाख रुपयांची लाच घेताना पोलीस कर्मचाऱ्याला रंगेहाथ पकडण्यात आले. रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी (दि.१०) सकाळी ही कारवाई केली. या कारवाईने लाच घेणाऱ्यांना दणका मिळाला. विशाल वाघाटे असे या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. रायगड पोलीस दलात गेल्या अनेक वर्षांपासून हवालदार या पदावर तो कार्यरत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून अलिबागमधील पोलीस मुख्यालयात कार्यरत आहेत. तक्रारदार यांच्यावर पॉक्सो कायद्या अंतर्गत कारवाई न करण्यासाठी व योग्य ती मदत करण्यासाठी त्याने पाच लाख रुपयांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांनी •>पान २ वर

## म्हाडाचा अभियंता लाच घेताना अटक

**मुंबई :** अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी ४ लाखांची लाच मागणारा म्हाडाचा कार्यकारी अभियंता मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला आहे. लाचेच्या रक्कमेतील ४० हजार रुपयांचा पहिला हफ्ता घेताना त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. तक्रारदारांचे रो हाऊस आहे. त्यावर अनधिकृत पत्रे चढवून तेथे पोटभाडेकरू ठेवण्यात आले होते. याबाबत म्हाडामध्ये अहवाल देऊन कारवाई करण्याची धमकी म्हाडामधील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाने दिली होती. याबाबत कारवाई न करण्यासाठी त्याने ४ लाखांची लाच मागितली. तडजोडीनंतर २ लाख स्वीकारण्याचे कबूल केले. परंतु तक्रारदारांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

# मोर्चा, आंदोलने अन् निदर्शने!

## न्याय हक्कासाठी समाजबांधवांचा एल्गार

## राज्यात ओबीसी, कुणबी, बंजारा समाजाकडून निदर्शने

**। मुंबई । प्रतिनिधी । मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच गाजवल्यानंतर शुक्रवारी (दि.१०) विजय वडेट्टीवर यांच्या नेतृत्वाखाली नागपूरमध्ये तर कुणबी दाखला अबाधित ठेवण्यासाठी कुणबी समाजाने आझाद मैदानात आंदोलनाची हाक दिली.मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊ नये आणि २ सप्टेंबर रोजी सरकारनं काढलेला जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनात मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांतील कुणबी समाजाचे हजारो बांधव सहभागी झालेत. याशिवाय बंजारा समाजही आता आक्रमक झाला असून त्यांनीही संपूर्ण महाराष्ट्रात शुक्रवारी निवेदने दिली. हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, अशी त्यांची मागणी आहे. १७ ऑक्टोबर रोजी मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये हे आंदोलन होणार आहे. बंजारा समाजाच्या नेत्यांनी यावर्षी दिवाळी शिवाजी पार्कवरच साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मुख्यमंत्र्यांनी आमचा अंत बघू नये, असा इशारा माजी आमदार हरिभाऊ राठोड यांनी सरकारला दिला आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी विविध समाज मुंबईत एकत्र येत आहेत. त्यामुळे सध्या सर्वच समाजांनी मुंबईला लक्ष्य केले असून चक्काजाम करण्याच्या तयारीत आहेत.**

## आरक्षणासाठी बंजारा समाज आक्रमक



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
बंजारा समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षण टक्केवारीत स्वतंत्रपणे समावेश करण्यात यावे, या मागणीसाठी बंजारा समाजामार्फत शुक्रवारी (दि.१०) दुपारी मोर्चा काढण्यात आला. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल बंजारा समाज एकवटला. एसटी आरक्षण देण्यात यावे, असा एकच नारा करीत या मोर्चाची सुरुवात कामगार नाका येथून करण्यात आली. या मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सेवालाल महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मोर्चाला दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास सुरूवात करण्यात आली. अलिबागमधील सेवालाल महाराज नाका कामगार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, •>पान २ वर

## मुंबई, ठाण्यासह पुणेही जाम करू

### ओबीसी मोर्चातून विजय वडेट्टीवारांचा सरकारला इशारा

**। नागपूर । प्रतिनिधी ।**
आमदारकी गेली खड्ड्यात वडेट्टीवार कसलीही परवा करणार नाही. राजकारणापलिकडे जाऊन जो कोणी आपला घात करेल, त्याचा घात करण्याची तयारी ठेवा. सरकारने २ सप्टेंबरचा जीआर रद्द न केल्यास पुणे-मुंबई जाम करू, असा इशाराही सरकारला दिला. माझा डीएनए ओबीसी आहे, तुमचा ओबीसी असेल तर ओबीसींच्या गळ्यावर सुरी का फिरवत आहात. सुधारून जा नाहीतर तुमची जागा दाखवणार, असा इशाराच सरकारला दिला आहे.

आमदारकी खड्ड्यात गेली, आमच्यावर अन्याय होत असेल तर वडेट्टीवार कसली परवा करणार नाही. सरकारने २ सप्टेंबरचा जीआर रद्द न केल्यास त्यांनी केवळ मुंबईत मोर्चा काढला, आम्ही मुंबई पुण्यासह ठाणेही जाम करू, असा इशाराही विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील महायुती सरकारला दिला आहे.

राज्यातील मराठा-ओबीसी आरक्षणातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.१०) ओबीसी नेत्यांच्या •>पान २ वर

## कोकणातील कुणबी बांधव आझाद मैदानात एकवटले






**। मुंबई । सुजित धाडवे ।**
कुणबी नोंदणीच्या आधारावर मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाचा लाभ देणाऱ्या राज्य सरकारच्या शासन निर्णयाला तीव्र विरोध करत कोकणातील कुणबी समाजातील कोकणवासीयांच्या वतीने मुंबईत एल्गार मोर्चा काढण्यात आला. या मोर्चासाठी कोकणातील ७ जिल्ह्यातील कुणबी बांधव मुंबईत मोठ्या संख्येने दाखल झाले होते. विशेष बाब म्हणजे सरकार दूरच राहिले, कुणब्यांच्या मतांवर कोकणात नेते म्हणून मिरवणारे आमदार, खासदार, मंत्री यांपैकी कोणीही कुणबी बांधवांच्या या मोर्चाकडे फिरकलेही नाही.

कुणबी समाजाच्या विविध लागण्यांसाठी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई तर्फे कोकणातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ७ जिल्ह्यात ओबीसी आरक्षण बचाव तसेच ते अबाधित ठेवण्यासाठी कुणबी बांधवांचा संघाचे अध्यक्ष अनिल नवगने यांच्या अध्यक्षतेखाली कुणबी एल्गार मोर्चा आझाद मैदान मुंबई येथे काढण्यात आला.आमच्या आरक्षणात मराठा समाजाला जबरदस्तीने घुसवलं जात आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या दबावाखाली सरकारने काढलेला जीआर रद्द करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

यासाठी हजारोंच्या संख्येने कुणबी बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मुंबई संघाचे अध्यक्ष अनिल नवगणे तसेच उपाध्यक्ष शंकरराव म्हसकर यांनी सात जिल्ह्यातील कुणबी बांधवांना केले होते. या पार्श्वभूमीवर कुणबी आंदोलक मोठ्या संख्येने आझाद मैदानात जमले होते. काही कार्यकर्ते पारंपरिक वेशभूषेत •>पान २ वर

- **मते घेणाऱ्या नेत्यांनी मोर्चाकडे फिरवली पाठ**
- **सरकार या आंदोलनाची दखल घेणार असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे आश्वासन**

> **संघर्षासाठी कुणबी समाजाच्या वतीने एकजुटीचा एल्गार मोर्चा निर्धार करण्यात आला असून आझाद मैदानावर होत असलेले आंदोलन हे न भूतो न भविष्यती असे ठरले आहे. मराठा समाजाला शासनाने दिलेल्या आरक्षणास कुणबी समाजासह सर्व ओबीसी जातीचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे सरकारने त्वरित हा जीआर रद्द करावा, अशी प्रमुख मागणी आझाद मैदानावर आंदोलनात करण्यात आली.**
> **– अनिल नवगणे, संघाध्यक्ष, कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई**

> **ओबीसी विद्यार्थांना १०० टक्के शिष्यवृत्ती मिळालीच पाहिजे. जातिनिहाय जनगणना झालीच पाहिजे. शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळास स्वतंत्र दर्जा देवून त्यास पंधराशे कोटी रुपयांची भरीव आर्थिक तरतूद शासनाने लवकरात लवकर करावी. लोकनेते शामराव पेजे न्यासासाठी सरकारने ५० कोटीचा निधी उपलब्ध करून द्यावा, आदी मागण्यांसह जन्माने आणि कर्माने कुणबी असून ते आर्थिकदृष्ट्या मागास आहेत. जातीचा दाखला शासनाच्या काही जाचक अटीशर्तीमुळे मिळत नसल्याने मुलाबाळांचे शैक्षणिकदृष्ट्या मोठ नुकसान होत आहे. कुणबी एल्गार मोर्चा सरकारला जागेवर आणण्यासाठी आझाद मैदानावर काढण्यात आला. – शंकरराव म्हसकर, उपाध्यक्ष**

## वेधक

### गतीमंद तरुणीवर लैंगिक अत्याचार

**मुंबई :** दक्षिण मुंबईत घडलेल्या एका धक्कादायक घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. केवळ २० वर्षीय गतीमंद तरुणीवर अनेकांनी लैंगिक अत्याचार केल्याचं उघड झालं असून, ही भयावह बाब तेव्हा समोर आली, जेव्हा तिच्या पोटात दुखत असल्याने तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आणि तपासणीत ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचं स्पष्ट झालं. या प्रकरणात पोलिसांनी एका ३७ वर्षीय इसमाला आणि एका अल्पवयीन मुलाला अटक केली आहे. मात्र, आरोपींची संख्या यापेक्षा अधिक असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. परिसरातील १५ हून अधिक संशयितांचे डीएनए नमुने तपासणीसाठी घेतले आहेत.

### पुण्यात एनडीएमध्ये कॅडेटचा मृत्यू

**पुणे :** पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये शुक्रवारी सकाळी एका १८ वर्षीय कॅडेटचा मृतदेह आढळला. अंतरिक्ष कुमार सिंग (वय १८) असे मृत कॅडेटचे नाव आहे. अंतरीक्ष हा उत्तर प्रदेशातील लखनऊ येथील रहिवासी होता. अंतरिक्ष सिंगचा मृतदेह सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्याच्या वसतिगृहाच्या खोलीत आढळला. माहिती मिळताच उत्तम नगर पोलीस ठाण्याचे पथक तपासणीसाठी एनडीए येथे दाखल झाले होते. पोलीस उपायुक्त संभाजी कदम म्हणाले की, रॅगिंगबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. तपास सुरु असून कुठलीही सुसाईड नोट सापडलेली नाही. डिफेन्स पीआरओकडून काढण्यात आलेल्या निवेदनात म्हटलंय की, दैनंदिन प्रशिक्षणासाठी अनुपस्थित राहिल्यानंतर सहकारी कॅडेट्सना तो त्याच्या रुममध्ये पडलेला बेशुद्ध अवस्थेत आढळला.

### वेणगाव येथे चाकूने हल्ला

**नेरळ :** वेणगाव या ठिकाणी लोखंडी हत्याराच्या साहाय्याने एका व्यक्तीच्या घरात घुसून हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. पहाटेच्या सुमारास काही हल्लेखोरांनी घरात घुसून एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात दोघा भावांना चॉपरने भोसकून, कोयता व बंदुकीचा धाक दाखवत गंभीर मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात प्रफुल्ल शिंदे आणि प्रतिभा शिंदे जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी किरण शिंदे, मंगेश जाधव, जय साबळे आणि त्यांच्यासोबतचे दोन अनोळखी इसम पहाटे घराचा दरवाजा तोडून आत शिरले. घरात झोपलेल्या शिंदे कुटुंबियांवर त्यांनी चॉपर, मोठा कोयता आणि रिव्हॉल्व्हरच्या मुठीने हल्ला चढवला.

## महावितरण कर्मचाऱ्यांचा संप मागे

### वरिष्ठ स्तरावर होणाऱ्या बैठकीनंतर ठरणार निर्णय

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
खासगीकरणासह विविध प्रलंबित प्रश्नांसाठी महावितरण कर्मचाऱ्यांनी ७२ तासांचा संप पुकारला होता. अखेर या संपाला पूर्णविराम भेटला असून शासनासोबत झालेल्या चर्चेनंतर शुक्रवारी (दि.१०) हा संप मागे घेण्यात आला. येत्या १४ व १५ ऑक्टोबरला होणाऱ्या बैठकीनंतर पुढील निर्णय होणार असल्याची माहिती कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली.

महानिर्मितीच्या ताब्यातील जलविद्युत प्रकल्पाचे खासगीकरण, महापारेषणमधील टीबीसीबीच्या माध्यमातून खासगीकरण सुरु झाले आहे. महावितरण कंपनीमधील एकतर्फी पुनर्रचना केली जात आहे. महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीतील विविध मार्गाने होणाऱ्या खासगीकरणाविरोधात महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी संप सुरु केला आहे. शासनाने मंजूर केलेली पेन्शन योजना लागू करा. मागासवर्गीय पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करा. •>पान २ वर

> **कर्मचाऱ्यांनी गुरुवारपासून संपाला सुरुवात केली होती. शुक्रवारी दुपारनंतर संप मागे घेतल्याचे पत्र संघटनेकडून देण्यात आले आहे.**
> **– धनराज बक्कड, अधीक्षक अभियंता**

## अखेर आदर्श शिक्षकांचा होणार सन्मान



**। रायगड । प्रमोद जाधव ।**
आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर होऊन देखील जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत प्रत्यक्ष पुरस्कार वितरण समारंभ चार वर्षे घेतलाच नाही. त्यामुळे जिल्ह्यातील १२० आदर्श शिक्षकांना प्रत्यक्ष पुरस्कार वितरणाची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर ही प्रतीक्षा संपली असून सोमवारी (दि.१३) शिक्षकांना आदर्श पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

रायगड जिल्ह्यात तीन हजारहून अधिक शाळा असून त्यात २ हजार ५०१ जिल्हा परिषद शाळा आहेत. या शाळांमध्ये ५ हजार ८८८ शिक्षक असून ८७ हजार ९२ विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहे. या विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शिक्षक करतात. शासनाच्या वेगवेगळ्या शैक्षणिक व अशैक्षणिक योजनांचे काम शिक्षक करतात. डिजीटल शिक्षण देण्याबरोबरच खेळता खेळता शिक्षण यावरही अनेक शिक्षक भर देत आहेत.

आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श पुरस्कार देऊन जिल्हा परिषदेमार्फत गौरव केला जातो. या पुरस्कारामुळे शिक्षकांना एक प्रेरणा मिळते. हा पुरस्कार म्हणजे आदर्शवत शिक्षकांसाठी नवी उर्जा देणारे आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून पाच सप्टेंबरला दरवर्षी साजरा केला जातो. या दिनानिमित्त जिल्ह्यातील आदर्शवत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केला जातो. सन्मानपत्र देऊन हा गौरव केला जातो. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या पुरस्काराचे महत्व वाढले आहे. रायगड जिल्हा •>पान २ वर

> **जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्यामुळे चार वर्षानंतर आदर्श शिक्षकांचा सन्मान होत आहे. याचा आनंद आहे. दरवर्षी शिक्षकांचा सन्मान होणे गरजेचे आहे. तो झाला पाहिजे. शिक्षकांचा सत्कार वेळच्या वेळी करावा ही अपेक्षा आहे. १२० शिक्षकांचा सोमवारी सन्मान होणार आहे. त्यामुळे तो यथोचित सन्मान करण्यात यावा.**
> **राजेश सुर्वे– अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद**

## वस्ती, रस्त्यांची जातीवाचक नावे बदलणार

- **ग्रामविकास विभागाचा महत्त्वाचा निर्णय**

**। रायगड प्रतिनिधी ।**
ग्रामविकास विभागाने राज्याच्या ग्रामीण भागातील वस्त्यांची आणि रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार संबंधित गावाला ग्रामसभेत तसा ठराव करून तो गटविकास अधिकाऱ्याला सादर करावा लागणार आहे. या प्रस्तावावर निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील वस्त्यांची तसेच रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून जातीवाचक नावाऐवजी महापुरुषांची, लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देण्याचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाने घेतला आहे.

गावाचे नाव बदलण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येते. त्यामुळे ग्रामविकास विभागाने जातीवाचक नाव बदलून नवे नाव देण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असल्याचे गुरुवारी जारी केलेल्या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाने जातीवाचक नावे बदलण्यासाठी कार्यपद्धती ठरवली आहे. त्यानुसार एखाद्या वस्तीचे वा रस्त्याचे जातीवाचक नाव •>पान २ वर

**पर्यटकांसाठी पुरातत्व विभागाचा उपक्रम | पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण**

## क्यूआर कोडवर मिळणार जंजिऱ्याची माहिती



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दिघी जेट्टी, खोरा जेट्टी व राजपुरी जेट्टीवरुन देश-विदेशातुन लाखो पर्यटक ये-जा करतात. बहुतांशी पर्यटक राजपुरी जेट्टीवरून आकर्षक शिड्याच्या बोटीतुन किल्ला बघण्यासाठी जातात. बोट किल्ल्याकडे पोहोचण्याच्या आत बोटचालक पर्यटकांना किल्ल्याची माहिती थोडक्यात सांगत असतात. परंतु काही देश-विदेशीतील पर्यटकांना कळत नसल्याने व समाधान होत नसल्याने नाराजी दिसून येत होती. ही नाराजी दूर करण्यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळाने क्युआर कोड स्कॅन तयार केले आहे. या स्कॅनद्वारे ऑडिओतुन माहिती प्राप्त होणार आहे.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई, मंडळ बहुभाषिक स्मार्ट डिजिटल, ऑडिओ गाईड एएसआय, जंजिरा फोर्ट ई-वॉक ऑडिओ गाईड टुर स्कॅन आणि एक्सप्लोरद्वारे माहिती प्राप्त होणार आहे. पर्यटकांनी किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळील तिकीट बुकिंग कार्यालयाजवळ क्युआर कोड लावण्यात आले आहेत. त्याचा वापर करून स्कॅन करा आणि ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याची ऑडिआद्वारे माहिती ऐका ही ऑडिओ पाच मिनिटांची असुन यामध्ये हा किल्ला कोणत्या वर्षी बांधला, कोणी बांधला, कसा बांधला, या किल्ल्यात किती तोफा आहेत, यांची माहिती सांगण्यात आली आहे. तरी जंजिरा फोर्ट ई-वॉक ऑडिओ गाईड स्कॅन करा, असे आवाहन पुरातत्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांनी केले.

यावेळी पर्यटक आकाश मोरे यांनी या क्युआर कोडद्वारे जंजिरा किल्ल्याची ऑडिओद्वारे माहिती ऐकली. तसेच ही सुविधा उपलब्ध करून दिल्याने समाधान व्यक्त केले. तसेच या ठिकाणी वायफाय सेवेची अत्यंत आवश्यकता आहे. नेट नसेल तर या क्युआर कोडचा काहीही फायदा होणार नाही. तरी पुरातत्व विभागाने ही सेवा उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून या क्युआर कोडद्वारे किल्ल्याची माहिती प्राप्त होईल. आज पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांनी किल्ल्यासंदर्भात चांगली माहिती दिली, अशी प्रतिक्रिया नांदेड येथील आकाश मोरे यांनी दिली.



अलिबाग : क्लासिक - 99702 88702, पेण : मेनहूड - 86009 45123, महाड : चिंतामणी ट्रेडर्स - 94233 83020,
रायगड : खोपोली : शुभम कलेक्शन - 88056 33001, रत्नागिरी : आकृती कलेक्शन - 95616 12322,
कुडाळ : श्री तुळजाभवानी ॲपेरल्स् - 91302 00907 / 73787 12969
For Franchise Enquiries ✆ 9372870673 | 9594672424 | 8080990265 | Shop online on cambridgeapparels.com

## पान १ वरून

## कोकणातील कुणबी बांधव आझाद मैदानात एकवटले

सजलेले, डोक्यावर जय कुणबी लिहिलेली, गांधी टोपी घालून हातात निषेधाचे फलक घेऊन मैदानात दाखल झाले. कार्यकर्त्यांनी शांततेतून शक्तिप्रदर्शन केले. आमची सरकारकडे फार मोठी मागणी नाही. मराठा सम ाजाला कुणबी आरक्षणात घुसवले जात आहे, ते सरकारने पहिले थांबवावे. हैदराबाद गॅझेटियरबाबत काढलेला अध्यादेश तातडीने मागे घ्यावा. आम्ही शांततेत मागणी करत आहोत. पण सरकारने वेळीच निर्णय घेतला नाही तर समाज आक्रमक होईल, असा इशाराच या आंदोलकांनी सरकारला दिला. कायदा आणि सुव्यवस्थेच्या सूचनांचे पालन आंदोलकांनी केले. या दरम्यान सायंकाळी ६ च्या सुमारास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आझाद मैदानावर कुणबी बांधवांशी संवाद साधला. त्यानंतर आंदोलन तात्पुरतं स्थगित करण्यात आले.

## आरक्षणासाठी बंजारा समाज आक्रमक

महावीर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बालाजी नाका, मारुती नाका ते जिल्हाधिकारी कार्यालय असा हा मोर्चा निघाला. सकल बंजारा आरक्षण समिती रायगड जिल्हा यांच्या वतीने आयोजित मोर्चाला हजारोच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील हिराकोट तलावाजवळ आल्यावर मोर्चाचे रुपांतर सभेमध्ये झाले. यावेळी वेगवेगळ्या मान्यवरांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रकाश राठोड यांच्यासह अनेक पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. मागण्यांची दखल न घेतल्यास भव्य मोर्चा काढून सरकारला आरक्षण देण्यास भाग पाडू, असा इशारा मोर्चेकऱ्यांनी यावेळी दिला.

## मुंबई, ठाण्यासह पुणेही जाम करू

नेतृत्वात नागपूर येथे मोठा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चातून ओबीसी समाजाने सरकारला इशारा दिला असून २ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेला शासन निर्णय रद्द करावा, अशी प्रमुख मागणी मोर्चेकरांची आहे. ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनीही मोर्चातील भाषणातून सरकारला इशारा दिला आहे. येथे ओबीसींच्या आजच्या ऐतिहासिक मोर्चामध्ये ३७१ जाती आहेत, आणि दुसरीकडे मराठा एक जात आहे. जे ५६ टक्के त्यांना २७ आरक्षण आणि १५ टक्के लोकांना ४८ टक्के आरक्षण ही चाणक्यनिती आहे. राज्यातील १५ टक्क्याचं सरकार हे तुमच्यात भांडण लावण्याचं काम करत आहे. २ सप्टेंबर रोजी काढलेला जीआर वाचल्यावर एका जरांगेच्या भरवश्यावर तुम्ही निवडून आलात काय? असा सवाल वडेट्टीवार यांनी विचारला.

## वस्ती, रस्त्यांची जातीवाचक नावे बदलणार

बदलायचे झाल्यास संबंधित गावाने ग्रामसभेत तसा ठराव करून त्याबाबतचा प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांना सादर करावा. गटविकास अधिकारी यांनी प्रस्ताव तपासून तो जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा प्रस्ताव तपासून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावा आणि जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तवाला मंजुरी द्यावी, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## अखेर आदर्श शिक्षकांचा होणार सन्मान

परिषदेमार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाची ही परंपरा गेल्या अनेक वर्षापासून सूरू आहे. परंतु या पुरस्कार वितरणाला गेल्या चार वर्षापासून ब्रेक लागला होता. जिल्हा परिषदेवर २१ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरुझाल्यापासून ही परंपरा थांबली होती. दरवर्षी पाच सप्टेंबरपूर्वी आदर्श शिक्षकांची यादी जाहीर केली जात होती. परंतु त्यांचा प्रत्यक्ष सन्मान करण्यास जिल्हा परिषद प्रशासनाकडून झालाच नाही. त्यामुळे १२० आदर्श शिक्षकांना प्रत्यक्ष सन्मानाची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर ही प्रतीक्षा संपण्याच्या वाटेवर आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने सोमवारी (दि.१३) आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला आहे. कुरुळ येथील आरसीएफ वसाहतीच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. त्यामुळे आदर्श शिक्षकांना हा सन्मानाचा आणि आनंदाचा क्षण असणार आहे.

## महावितरण कर्मचाऱ्यांचा संप मागे

तिन्ही कंपनीमधील वर्ग तीन व चार स्तरावरील संवर्गनिहाय रिक्त पदे भरण्यात यावी. सरळसेवा भरती, पदोन्नती व अंतर्गत भरतीद्वारे मुळ बी.आर प्रम ाणे भरणे. कंत्राटी व बाह्यस्त्रोत कामगारांना कायम नोकरीत समाविष्ट करण्यात धोरण राबविणे अशा अनेक मागण्यांसाठी हा लढा गुरुवारी (दि.९) सुरु केला. रायगड जिल्ह्यात महावितरण कंपनीमध्ये दीड हजारहून अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामध्ये नियमीत कर्मचारी ७५० असून त्यापैकी ५०० कर्मचारी संपावर गेले होते. महावितरणचे कर्मचारी संपावर गेल्याने वीजपुरवठा सेवा सुरळीत करण्यास अडथळे निर्माण होण्याची शक्यता होती. त्याचा परिणाम शासकीय कार्यालयांसह दवाखाने व सर्वसामान्य नागरिकांना होण्याची भिती निर्माण झाली होती. ७२ तासांच्या संपाचा परिणाम जिल्ह्यातील वीज सेवेवर होण्याची शक्यता वर्तविली जात होती. मात्र या संपानंतर शासनाने तातडीने वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन संपकऱ्यांसोबत चर्चा केली. या सकारात्मक चर्चेनंतर वीज कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी दुपारी संप मागे घेतला.

## लाचखोर पोलीस एसीबीच्या जाळ्यात

घटनेचे गांभीर्य ओळखून गुरुवारी (दि.८) या प्रकरणाची पडताळणी केली. त्यानंतर शुक्रवारी सकाळी पाच लाख रुपयांपैकी तीन लाख रुपये घेताना त्याला रायगड पथकाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निशांत धनवडे, नारायण सरोदे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, सुषमा राऊळ, पोलीस हवालदार महेश पाटील, परम ठाकूर, सुमित पाटील, सचिन आटपाडकर, महिला पोलीस शिपाई मोनाली पाटील, अनंत घरत, सागर पाटील या पथकाने कारवाई करीत आरोपीला ताब्यात घेतले.

---

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.४६३ /२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. नासिर मोहम्मद इकबाल मापकर
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. मु.पो. ता. महाड, जि. रायगड

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. नासिर मोहम्मद इकबाल मापकर यांचा भाऊ श्री. खलील अहमद इब्राहीम मापकर याचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०२/०६/१९६४ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ३१/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा भाऊ श्री. खलील अहमद इब्राहीम मापकर यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०२/०६/१९६४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.
विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नासिर मोहम्मद इकबाल मापकर यांचा भाऊ श्री. खलील अहमद इब्राहीम मापकर यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०२/०६/१९६४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही
ता. २५/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसात कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे आर्के, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| के अॅन्टोनी मॅथ्यु | १२६ | १ | ०-२०-०० | ० | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — सही /-
कार्यालयीन पत्ता :-ए विंग, फ्लॅट नं.४, — **अॅड. जयेश संभाजी म्हसे**
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, — दिनांक :- १०/१०/२०२५
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, — मो.नं. ९०२८९८२२७७
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ ई मेल:- adv.jayeshmhase@gmail.com

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.२१९/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. दत्ताराम कृष्णा मोरे
वय ६५ वर्षे, धंदा शेती.
रा. मु. पो. देगांव, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देगांव, — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. दत्ताराम कृष्णा मोरे यांचे वडील कै. कृष्णा देवू मोरे हे दि. २४/०९/१९९७ रोजी मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १०/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै. कृष्णा देवू मोरे हे दि. २४/०९/१९९७ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.
विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. दत्ताराम कृष्णा मोरे यांचे वडील कै. कृष्णा देवू मोरे हे दि. २४/०९/१९९७ रोजी मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — सही /-
ता. : २९/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. ४६४/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. नासिर मोहम्मद इकबाल मापकर
वय : ४९ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा. मु.पो. ता. महाड, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. नासिर मोहम्मद इकबाल मापकर यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०७/०६/१९७६ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ३१/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०७/०६/१९७६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.
विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नासिर मोहम्मद इकबाल मापकर यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०७/०६/१९७६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही /-
ता. २५/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत सदर जमीनीचे मालक श्री. प्रशांत तुकाराम पाटील रा - अंबर पॅराडाईज २०४ शांती नगर नंबर २. जैन मंदिराच्या जवळ, नांदीवली क्रॉस रोड, डोंबिवली पूर्व जिल्हा ठाणे - ४२१२०१ यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीची ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली जमीन मिळकत मौजे चांधई. तालुका - कर्जत, जिल्हा-रायगड या गावी आहे. त्यामिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे

**मौजे - चांधई, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकतींचे वर्णन**

| सर्वे नं./हि.नं. | क्षेत्र - हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १२/४ | ०-५९-४० | १-३१ |

यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे खरेदी देण्याचे ठरलेले क्षेत्र - हे.आर.पॉ. ०-३५-४०.

वर वर्णन केलेली जमीन मिळकत झाडझाडोऱ्या सुद्धा सर्व हक्क हितसंबधासह सदर जमीनीचे मालक यांचे कडुन खालील सही करणार यांनी विकत घेण्यांचे ठरले असून त्याबाबत बयाणा पावती झालेली आहे. सदर जमीन मालक यांनी सदर वर वर्णन केलेली जमीन दुसरे कोणास कोणत्याही हक्काने म्हणजे साठेकरार, बयाणा पावती, हक्कसोड पत्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, लिज, लीन, बक्षिस खरेदी वगैरे दिलेली नाही. अगर दुसरे कोणास कोणत्याही हक्कांने दिलेली नाही. अगर तोंडी अगर लेखी करार केलेला नाही. जर करता सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत असल्यांस त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासुन ०७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुरावे सादर करावेत. जर करीता सदर मुदतीस कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत न आल्यांस सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित अशी समजुन सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदी खत केले जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस व हरकतीस खालील सही करणार हे जबाबदार राहणार नाही. करीता सदर जाहिर नोटीसीने कळवित आहे.

तारीख : ११/१०/२०२५ — सही/-
**१) श्री. सचिन विश्राम नेरुरकर**
रा-ए/५०४. श्री गणेश लिला को. ऑप. हौ. सोसायटी, डॉ. शिरोडकर रोड, परळ, मुंबई.
मुंबई नंबर - ४०००१२.
मोबाईल नंबर - ९९६०५३९८९७/९८२२८९७२९९

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. २२०/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. दत्ताराम कृष्णा मोरे
वय ६५ वर्षे, धंदा शेती,
रा. मु. पो. देगांव, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत देगांव,
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदर अर्जदार श्री. दत्ताराम कृष्णा मोरे यांची आई कै. रखमाबाई कृष्णा मोरे ही दि. ०२/०९/१९६४ रोजी मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली आहे. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०४/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आई कै. रखमाबाई कृष्णा मोरे ही दि. ०२/०९/१९६४ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.
विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. दत्ताराम कृष्णा मोरे यांची आई कै. रखमाबाई कृष्णा मोरे ही दि. ०२/०९/१९६४ रोजी मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव : — सही/-
ता. : २९/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्रीम. रंजना दिनेश वळवी यांनी त्या मिळकतीचे मालक १ श्री नामा उर्फ नाथा गिरजू झुगरे, २. श्री. विठ्ठल गिरजू झुगरे, ३ श्रीम. सरिता उर्फ कल्पना हरिशचंद्र उर्फ हरिचंद्र निरगुडा यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३५ | २ | ६.०३.०० | ४.०६ |

पैकी विक्री दिलेले क्षेत्र
२.४०.०० हे. आर. पॉ.
तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबाकबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ११-१०-२०२५
**अॅड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल. एल. बी,
अॅडव्होकेट व नोटरी,
मो. नं ९५६१७१९४९४
९०११७१६००१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली रापड जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या रापड जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र:हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| ऐहरार अ. मुहम्मद इब्राहीम व इतर ५ | ३५/१/ब | ०-१०-०० <br> पोटखराबा ०-००-०० <br> ०-१०-०० | ०.३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : सदनिका क्र.१०८, — सही /-
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट — **अॅड.सुर्यकांत भाऊ मसणे**
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड. — दिनांक : ११/१०/२०२५
ठिकाण: कर्जत — मो.नं. ९९२२१५५१५३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तीचे विद्यमान मालक १) श्री. गणेश पांडुरंग मोरे, २) श्री. पांडुरंग हाशा शेडगे कडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - जामरूंग, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे जामरूंग | १६ | ९ | ०.१२.०० | ०.१७ |
| | १६ | ११ | ०.५३.०० | ०.५० |
| | १३ | ४ | ०.२८.८० | ०.२५ |

सदरच्या जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत — खरेदीदारातर्फे वकील
दि. ११/१०/२०२५ — **अॅड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक मनोहर शंकर सोनावळे रा-मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता-कर्जत, जि-रायगड यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३० | ४/अ/१ | लागवडी योग्य क्षेत्र - २.७३.०० हे.आर.पॉ. <br> पोटखराबा क्षेत्र - ०.२९.०० हे.आर.पॉ <br> एकुण क्षेत्रफळ ३.०२.०० हे.आर.पॉ. | १.८७ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक मनोहर शंकर सोनावळे यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच सदरील व्यक्तीचा अगर, संस्थेचा, खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार अॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक ११/१०/२०२५
**अॅड. भारत अंकुश सावंत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली रापड जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसम ाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या रापड जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**-: मौजे :- बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र:हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| नेसारअहमद मकबुल अव्वाल व ईतर ९ | ३५/२/ब | ०-१६-३० <br> पोटखराबा ०-०१-५० <br> ०-१७-८० | ०.५९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : सदनिका क्र.१०८, — सही
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट — **अॅड.सुर्यकांत भाऊ मसणे,**
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड. — दिनांक : ११/१०/२०२५
ठिकाण: कर्जत — मो.नं. ९९२२१५५१५३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक १) श्री. स्वप्निल दिपक मोगारे, २) श्री. विजय मारूती बिबवे कडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - जामरूंग, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे जामरूंग | १३ | २/ब | ०.२१.०० <br> पो.ख.०.०९.०० | ०.५२ |

सदरच्या जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्याा हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत — खरेदीदारा तर्फे वकील
दि. ११/१०/२०२५ — **अॅड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, कर्जत, जि. रायगड येथील ता. मौजे दहिवली तर्फ निड, सर्व्हे नं. ६९ व ७० एकूण क्षेत्र ४९८०.१२ चौ.मी त्यापैकी डिपीरोड करीता देण्यात आलेले क्षेत्र ६२९.६२२ चौ.मी हे क्षेत्र कर्जत नगरपरीषद यांना १२ मी रूंद रस्ता करीता हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे. सदर हस्तांतरीत करावयाच्या क्षेत्राच्या मोबदल्यामध्ये या मिळकतींचे मालक हेमंत दत्तात्रेय डोंबे यांना प्राप्त होणारे हस्तांतरणीय विकासाचे हक्क व अधिकार (टी.डी.आर) आमचे पक्षकारांना त्यांनी मोबदल्यास्वतः प्रदान करण्याचे मान्य व कबूल करून त्याबाबत जरूरीचे दस्त करणेचे योजिले आहे.

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी तशी लेखी व कागदोपत्री पुराव्यासह हरकत प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर दाखल करावी वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न केल्यास सदर व्यवहारास कोणाचीही हरकत नाही असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर येणाऱ्या हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक ११/१०/२०२५
अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा
मुद्रे खुर्द ता. कर्जत. जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

---

## पनवेल महानगरपालिका,
**ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल-४१०२०६.**

वेबसाईट : www.panvelcorporation.com ईमेल : panvelcorporation@gmail.com

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**अंतिम प्रभाग रचना**

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक व स्थळ | शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२५ <br> स्थळ :- पनवेल महानगरपालिका, मुख्यालय व महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर तसेच महानगरपालिकेच्या **www.panvelcorporation.com** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. |

ठिकाण :- पनवेल.
दिनांक :- ११ ऑक्टोबर, २०२५

-स्वाक्षरीत-
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका,
**ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल-४१०२०६.**

वेबसाईट : www.panvelcorporation.com ईमेल : panvelcorporation@gmail.com

**Panvel Municipal Corporation General Election 2025**
**Final Ward Formation**

### Public Notice

It is hereby announced that Final Ward Formation for Panvel Municipal Corporation General Election 2025 is being published The details are as follows

| | |
|---|---|
| Date of publishing notification of the Final Ward formation | Saturday 11th October, 2025 <br> Place :- Head Quarters of Panvel Municipal Corporation, all ward offices of Panvel Municipal corporation and on the website **www.panvelcorporation.com** of the Panvel Municipal Corporation |

PLACE:- Panvel
DATE:- 11/10/2025

Sd/-
**Commissioner,**
**Panvel Municipal Corporation**

# निवडक

## कळंब ग्रामस्थांची पोलिसांत धाव

**पाली :** सुधागड तालुक्यातील कळंब गावाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात फार्महाऊस तसेच सेकंड होम आहेत. त्यामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत गोष्टींच्या विरोधात कळंब ग्रामस्थांनी गुरूवारी (दि.९) पाली पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. त्याबाबतचे तक्रारी निवेदन पालीचे उपनिरीक्षक निकम यांना देण्यात आले आहे. या निवेदनात नमूद केले आहे की, गावच्या हद्दीत असणारे फार्म हाऊस व रिसॉर्ट येथे मुंबई, ठाणे, पुणे येथील युवा वर्ग तसेच उच्चभ्रू लोक सुट्टीच्या दिवशी मौजमजा करण्यासाठी येथे येत असतात. त्यावेळी ते मद्यधुंद अर्धनग्न अवस्थेत फिरत असतात. तसेच, कानठळ्या बसविणाऱ्या आवाजात धांगडधिंगा करत असतात. त्याचा नाहक त्रास येथील नागरिकांना सहन करावा लागत आहे. तसेच, येथे मद्यप्राशन केलेल्या बाटल्या, ओला-सुका कचरा आजूबाजूला किंवा नदीपात्रात फेकून दिल्याने परिसर दूषित होऊन पर्यावरणावर याचा गंभीर परिणाम होत आहे. या अनधिकृत कृत्यांचा गावातील युवा पिढीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने गावकरी चिंतेत पडले आहेत. या सर्व बाबींची पाली पोलिसांकडून तात्काळ दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यावेळी समीर जाधव, नरेश खाणेकर, पांडुरंग आखाडे, धोंडू झोरे, गणेश जाधव, महेश मोरे, मोहन शिर्के, बंडू गोंडे, संजय तांबे, संदीप ठाकूर आदींसह गावकरी उपस्थित होते.





## दक्षता, नियंत्रण समितीची सभा संपन्न

**पाली/बेणसे :** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत स्थापन केलेल्या दक्षता व नियंत्रण समितीची बैठक पेण उपविभागीय अधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकित जिल्हाधिकारी यांनी आदेशीत केलेल्या १ ते ४७ मुद्यांतील अनेक विषयांवर सकारात्मक चर्चा करून मुद्धेनिहाय कारवाई केली जाईल, असे आदेश पारित करण्यात आले. तसेच, अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे होऊ नये यासाठी सामाजिक स्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम घेऊन कायद्याच्या महत्वांचा प्रसार व प्रचार करण्यात येणार असून सर्व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यात सहभागी करून वाडी वस्तीत जाऊन जनजागृती करण्यात येणार असल्याचे बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. याचबरोबर विविध विषयांवर देखील सकारात्मक चर्चा करण्यात आली आहे. या बैठकीला पोलीस उप अधीक्षक जालंधर नालकूल, गट विकास अधिकारी गजानन लेंडी, नायब तहसीलदार रश्मी साळुंखे, प.स. कनिष्ठ सहाय्यक नवनीत पाटील, महामुख्य सहाय्यक सुनिल सुरवाडे, विकास गावंड, उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीचे संजय सोनावणे, विजय जाधव, चंद्रकांत अडसुळे, प्रदिप जाधव, उमेश दोरे, भुषण वाघमारे व जोमा दरवडा हे उपस्थित होते.




## जि.प.च्या गुणवंत अभियंत्यांचा सन्म

**नेरळ :** रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजात अभियंता वर्गाची भूमिका आणि त्यांची कामाबद्दलची बांधिलकी महत्वाची असल्याचे कौतुक मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे. कर्जत येथे जिल्हा परिषद अभियंता दिनाच्या निमित्ताने 'अभियंता सन्मान' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होते. कर्जत येथील रॉयल कॅम्प येथे रायगड जिल्हा परिषदेतील विविध विभागातील अभियंता संघटनांच्यावतीने अभियंता दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियंता दिनाच्या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे, बांधकाम विभागाचे राहुल देवांग, संघटनेचे अध्यक्ष सुजित धनगर आणि कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्यासह जिल्ह्यातील १५ तालुक्यातील उप विभागाचे उप व शाखा अभियंता, संघटनेचे माजी अध्यक्ष सदानंद शिर्के, सुरेश इंगळे, परब, शाखा अभियंता गोपाने, मते व मंगेश सावध आदी उपस्थित होते.



## ठाकरे गटाचा भूमिपुत्रांना पाठिंबा

**पनवेल :** शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने तालुक्यातील चिंध्रण येथे आमरण उपोषणाला बसलेल्या भूमिपुत्रांना पाठिंबा दिला आहे. तळोजा एमआयडीसीच्या विस्ताराकरीता चिंध्रण व लगतच्या गावांचे भुसंपादन करण्यात येत आहे. त्याकरीता अदानी समुह शेतकऱ्यांची जमीन कवडीमोलाने खरेदी करत असुन बाजारमुल्य व योग्य मोबदला न देता शेतकऱ्यांची फसवणुक करत असल्याने त्या विरोधात चिंध्रण, कानपोली व महालुंगी ग्रामस्थ तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने गेले ५ दिवसांपासुन आमरण उपोषण करण्यात येत आहे. नागरीक मोठ्या संख्येने न्याय हक्कासाठी या उपोषणास बसले असून या उपोषणाला शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्यावतीने जिल्हाप्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, शिवसेना महानगरप्रमुख अवचित राऊत, समन्वयक दिपक घरत आदी उपस्थित होते.

# अलिबाग एसटी स्थानक कचऱ्यात

## महामंडळाच्या स्वच्छ सुंदर अभियानाला ब्रेक

| प्रमोद जाधव |
| रायगड |

सर्वसामान्यांना एसटी बस स्थानकात उभे राहताना समाधान वाटावे, एसटीतून प्रवास करताना सुरक्षीतता आणि आनंद निर्माण व्हावे, म्हणून मात्र, एसटी महामंडळाचा हा दिखावा फक्त अभियानापुरता असल्याचे समोर आले आहे. अलिबाग एसटी बस स्थानक जिल्ह्याचे ठिकाण असतानाही या स्थानकात ठिकठिकाणी खड्डे पडलेले असून सुविधांचा देखील अभाव आहे. अशा अनेक समस्या असताना अलिबाग स्थानकात कचऱ्याचा ढिगारा दिसून आला आहे. त्यामुळे अलिबाग स्थानक कचऱ्यात घालवल्याच्या चर्चा प्रवासीवर्गातून होताना दिसत आहेत.



अलिबाग एसटी बस स्थानकातून मुंबई, पुणे, बोरीवली, ठाणे, अक्कलकोट, शिर्डी बरोबरच पनवेल, पेण, रोहा, मुरूड तसेच गावे, वाड्यांपर्यंत एसटीची सेवा पोहचली जाते. त्यामुळे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह नोकरी व्यवसायानिमित्त एसटीने ये-जा करणाऱ्यांची संख्या हजारोच्या पटीने आहे. प्रवाशांच्या चांगल्या आरोग्य आणि सुखसोयींसाठी एसटी महामंडळाने हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर स्थानक अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून रत्नागिरीपासून सोलापूरमधील एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अलिबाग स्थानकाला भेट देऊन स्वच्छतेची आणि येथील सुविधांची पाहणी केली. मात्र, या प्रवाशांच्या आरोग्याशी आगार व्यवस्थापन खेळ खेळत असल्याचे चित्र आहे. अलिबाग स्थानकाच्या आवारातच ठिकठिकाणी कचरा पडला असून स्थानकात प्रवेश केल्यावर समोर कचऱ्याचा ढीगारा दिसून आला आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास यंत्रणा उदासीन ठरली आहे. त्यामुळे स्थानकात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामध्ये प्लास्टीक पिशवी, कापडी बॅगा, दारुच्या बाटल्यांचा ढीगारा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे अलिबाग आगार खड्ड्यासह कचऱ्यात गेले असून एसटी महामंडळाचा स्वच्छतेचा दिखावा फक्त अभियानापुरता असल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

> अलिबाग स्थानकातील कचरा काढण्याचे काम खासगी ठेकेदाराला देण्यात आले आहे. स्थानकात कचरा पडून आहे. कचऱ्याची वाहतूक करणारे वाहन आले नसल्याने कचरा स्थानकात पडून आहे. तात्काळ कचरा काढण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.
> – राकेश देवरे,
> आगार व्यवस्थापक, अलिबाग

### ठेकेदार सुस्त

जिल्ह्यातील एसटी स्थानकातील कचऱ्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन व्हावे, परिसर स्वच्छ राहवा म्हणून जिल्ह्यातील प्रत्येक स्थानकांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी एका खासगी कंपनीला ठेका देण्यात आला आहे. पुर्वी स्थानकातील स्वच्छता राखण्यासाठी महामंडळाचे सफाई कामगार होते. परंतु, आता त्यांच्या जागी खासगी ठेकेदाराला स्वच्छतेचे काम देण्यात आले आहे. त्यामुळे ठेका देऊनही कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यास ठेकेदार अपयशी ठरल्याची चर्चा आहे. स्थानकात कचरा असूनदेखील ठेकेदार सुस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे कचऱ्याच्या ठेक्यासाठी केलेलो खर्च वाया जात असल्याचे बोलले जात आहे.

## विद्यार्थ्यांसोबत साजरा केला अंडी दिन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील उमटे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पशुसंवर्धन विभागामार्फत शुक्रवारी (दि.१०) जागतिक अंडी दिवस साजरा करण्यात आला. हा उपक्रम जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व दुग्धव्यवसाय अधिकारी डॉ. सचिन देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या उपकमातून अंडी खाण्याचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभागाने केला.




ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी जागतिक अंडी दिवस साजरा केला जातो. यंदाही हा दिवस शुक्रवारी अलिबागसह जिल्ह्यातील इतर जि.प. शाळांमध्ये राबविण्यात आला. विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ व पोषक राहवे, यासाठी हा उपक्रम हाती घेतला असून अंडी खाण्याचे महत्व शालेय स्तरापासून निर्माण करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला. अलिबाग तालुक्यातील उमटेसह पेझारी, भोवाळे तसेच अन्य तालुक्यातील ५० हून अधिक शाळांमध्ये जागतिक अंडी दिवस साजरा करण्यात आला. शरीराला पोषण तत्वे मिळण्यासाठी अंडीचे सेवन फायदेशीर असते. त्याचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभागाने नाविन्य उपक्रमातून केला. अंड्याचे दैनंदिन आहारात वापर होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले. यावेळी पशुधन पर्यवेक्षक अनिल गोतकर, मैत्री प्रशिणार्थी साईजित गुरव, मुख्याध्यापक राजेश शेळके, महेश वेरुळे व विद्यार्थी उपस्थित होते.

## सदस्यांसाठी सोमवारी आरक्षण सोडत

| तळा | प्रतिनिधी |

तळा पंचायत समिती सभापतीपद अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) साठी आरक्षीत झाल्यानंतर सदस्य आरक्षण सोडत सोमवारी (दि.१३) जाहीर करण्यात येणार आहे. त्यासाठी तळा येथील पंचायत समितीच्या डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये तालुक्यातील बोरघरहवेली, चरईखुर्द, रहाटाड व मांदाड या निर्वाचक गणाचे सोडत पद्धतीने जागांचे आरक्षण जाहिर होणार आहे. त्यामुळे या सभेला तालुक्यातील राजकिय पक्षांचे नेते, कार्यकर्ते व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार स्वाती पाटील यांनी केले आहे.



## कोलाड-विळे मार्गावर चालकांची कसरत

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

कोलाड ते विळे मार्गावर पडलेले खड्डे आता उग्ररूप धारण करून हजारो प्रवाशांच्या जीवाशी खेळत आहेत. वाळजवाडी येथील नागमोडी वळणांवर साईड पट्टी अत्यंत दुरवस्थेत आहे. या खड्ड्यांमध्ये खडी टाकण्यात आली आहे. परंतु, वाहनांच्या वरदळीमुळे ही खडी आता वर येऊ लागली आहे. या खडीमुळे दुचाकींसह तीनचाकी वाहनांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसाने परतीचा प्रवास घेतला तरी प्रशासनाला जाग येत नाही, अशी संतप्त प्रतिक्रीया प्रवासी वर्गातून उमटत आहेत.



## महागणपतीच्या तीर्थक्षेत्रात भक्तीचा मळा

| चिरनेर | प्रतिनिधी |

तीर्थक्षेत्र चिरनेर नगरीत शुक्रवारी (दि.१०) संकष्टी चतुर्थी निमित्ताने भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती. उरण, पनवेल, पेण, नवीमुंबईसह मोठ्या संख्येने गणेश भक्त दाखल झाले होते. विशेषतः छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय व परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. त्यामुळे शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल, नारळ, हार, फुले, पापड, भाजीपाला, प्रसाद व पेढेवाले विक्रेते सुखावले होते. मंदिर परिसरात कंदमुळांसह रानातील इतर रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थानतर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.

## वाकण-खोपोली महामार्गाची दुरवस्था

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

वाकण-खोपोली महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या महाम ार्गाच्या वळणांवर आणि दुतर्फा साईड पट्टीवर उंच गवत वाढल्यामुळे समोरून येणारी वाहने दिसत नाहीत, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाढलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सुधागड शेतकरी समन्वय संघर्ष समितीतर्फे संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पालीच्या तहसिलदारांना लेखी निवेदन दिले आहे.




या निवेदनात, महामार्गाच्या दुतर्फा साईड पट्टीवर उंच गवत वाढल्यामुळे रस्त्याच्या वळणांवरून समोरून येणारी वाहने दिसत नाहीत. त्यामुळे अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, अनेक ठिकाणी खडी आणि माती साचल्याने वाहने घसरून अपघात होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. पावसामुळे रस्त्यावर पाणी साचते, मात्र त्याच्या निचऱ्याची कोणतीही व्यवस्था नाही. लेक सिटी ते रासळ यादरम्यान शाळा, उद्योग आणि व्यवसायिक केंद्रे असल्याने नागरिक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. मात्र, रस्त्याच्या

### तहसिलदारांना निवेदन

दुरवस्थेमुळे त्यांचा जीव धोक्यात आला आहे. त्यामुळे या ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत, तसेच महामार्गावरील खड्डे तातडीने दुरुस्त करावेत. या समस्यांबाबत संघर्ष समितीच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष सचिन तेलंगे, सचिव गिरीष काटकर, मिलिंद खंकाळ, कैलास दळवी, पांडुरंग तेलंगे, नितीन जाधव आणि दिपक वालगुडे आदी उपस्थित होते.

## पनवेल परिसर मध्यरात्रीपासून अंधारात

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल परिसरातील नवनाथ नगर, खांदा वसाहत, तळोजा रोड, आणि आजूबाजूच्या भागात बुधवारी (दि.८) मध्यरात्रीपासून वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिक अक्षरशः अंधारात बुडाले होते. उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांनी महावितरण कार्यालयात धाव घेतली असता कार्यालयात शुकशुकाट असून, उपस्थित कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला आणि नागरिकांनी रास्तारोको केले.



पनवेल परिसरातील आजूबाजूच्या भागांत बुधवारी मध्यरात्रीपासून वीज पुरवठा खंडीत झाला होता. अचानक वीज गेल्याने शाळकरी विद्यार्थी, चाकरमानी, दुकानदार आणि गृहिणींचे प्रचंड हाल झाले होते. विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु असताना वीज नसल्याने अभ्यासात अडथळा निर्माण झाला होतो. पाण्याचा पुरवठाही बंद असल्याने नागरिकांना मूलभूत गरजांसाठी त्रास सहन करावा लागला. तर, काही ठिकाणी फ्रीज आणि पंखे बंद असल्याने उष्णतेत नागरिकांना त्रास झाला. संतप्त नागरिकांनी महावितरण कार्यालयात धाव घेतली असता कार्यालयात शुकशुकाट होता. उपस्थित कर्मचाऱ्यांना, सगळीकडे लाईट आली, परंतु आमच्या भागात का नाही? असा सवाल नागरिकांनी विचारला. परंतु, त्यांच्याकडून उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली. वीज वितरण विभागाचा संपामुळे सर्वसामान्य जनतेला वेठीस धरले गेले. संपादरम्यान कोणताही अधिकारी वर्ग नागरिकांशी संवाद साधण्यास पुढे न आल्याने रोष अधिकच वाढला. दरम्यान, संतप्त नागरिकांनी नवनाथ नगर परिसरात रस्त्यावर उतरून रस्तारोको केला. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.

## 'नशामुक्त शाळा' अभियान

| पनवेल | प्रतिनिधी |

'नशा मुक्त भारत' अभियानाअंतर्गत नवी मुंबई पोलिसांनी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. रबाळे पोलीस ठाण्याच्यावतीने 'नशा मुक्त शाळा' या विशेष उपक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या अभियानाचा शुभारंभ घणसोली येथील न्यू बॉम्बे स्कूलमध्ये करण्यात आला असून, विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत नशामुक्त जीवनाची शपथ घेतली. या उपक्रमाचे नेतृत्व पोलीस उपनिरीक्षक वर्षा काळे यांनी केले. तर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी वर्षा काळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, आजची तरुण पिढी ही देशाचे भविष्य आहे; परंतु, व्यसनाधीनतेचा धोका या भविष्याला अंधारात ढकलत आहे. प्रत्येक शाळा नशामुक्त झाली तरच समाज सुदृढ बनेल. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याचे आणि अमली पदार्थांचा वापर करणाऱ्यांविषयी पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन त्यांनी केले.

**अत्याधुनिक एआय ॲप विकसित | सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार**

## कृषी विभागाकडून शेतकऱ्यांचा 'महाविस्तार'

| चिरनेर | प्रतिनिधी |

शेतकऱ्यांना हवामान तसेच बाजारपेठेतील अस्थिरता आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यावर उपाययोजना म्हणून, शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाकडून 'महाविस्तार एआय' हे अत्याधुनिक ॲप विकसित करण्यात आले आहे, अशी माहिती उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना दिली. चिरनेर येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात गुरुवारी (दि.९) शेतकऱ्यांसाठी एआय ॲप विषयीच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

उरण तालुक्यातील गावागावांत कृषी सहाय्यकांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी एआय ॲपचे प्रशिक्षण राबविले जात आहेत. दरम्यान, चिरनेर येथे एआय ॲपच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राबण्यित आला. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने हे ॲप शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देत आहे. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे ॲप शेतकऱ्यांना रियल टाईम, माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पद्धतीचे मार्गदर्शन करते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी 'महाविस्तार एआय' ॲपमधील एआय' बॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देणे, रियल टाईम, हवामान अंदाज, तसेच स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात, अशी माहिती त्यांनी प्रशिक्षणातून दिली. तसेच, स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव, रियल टाईम तसेच कृषी विभागाच्या विविध कृषी योजनांची माहिती, अनुदान आणि विमा योजनांचे तपशील एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याचे देखील त्यांनी सांगितले.



### 'डिजिटल क्रांतीचा भाग व्हा'

या ॲपचे मराठीत व्हिडिओ उपलब्ध आहेत. पिकांची लागवड व खतांचा वापर, कापणी आणि जैविक शेती याबाबत तपशील वार मार्गदर्शन, तसेच ॲपमधील एआय तंत्रज्ञानामध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडीचे निदान करून त्याच्यावर उपाय शोधू शकतात. महाविस्तार एआय ॲप शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनविण्यासाठी अनेक फायदे घेऊन आले आहे. चुकीच्या खतांचा किंवा कीटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात. हे ॲप घ्या आणि शेतीतील डिजिटल क्रांतीचा भाग व्हा, असे आवाहन कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

# सोने घ्यावे की न घ्यावे?

मिडियाच्या आणि राजकारण्यांच्या चिंता वेगळ्या आणि सामान्य माणसांच्या चिंता निराळ्या. येत्या निवडणुकीत भाजप आणि शिंदे गट एकत्र लढणार का, राज आणि उद्धव एकत्र कधी येणार आरक्षणाच्या जीआरचे काय होणार याची काळजी आणि चर्चा आपले मिडियावाले दिवसरात्र करताना दिसतात. त्यावेळी सामान्य आईबापांना मात्र वेगळीच चिंता सतावत आहे. ती आहे- सध्या सोने विकत घ्यावे की घेऊ नये. कारण या सोन्याचे दर आकाशाला भिडून त्याच्याही आरपार पुढे निघून गेले आहेत. एका तोळ्याला एक लाख २६ हजार रुपये असा दर चालू आहे. तो रोज वाढतो आहे. काहींच्या मते हा कळस आहे. इथून दर वर जाऊ शकत नाहीत. तर काहींना या दरवाढीला अंतच नाही असे वाटते आहे. परिणामी, सोने इथून पुढे वर जाणार की धाडकन खाली कोसळणार यावर सट्टे लागले आहेत. काही जणांच्या मते हा दर तो दीड लाखांपर्यंत जाऊ शकतो. तर इतर काही जाणकारांनी आकडेमोड करून तो ७७ हजार रुपये तोळा इतका खाली येईल असे छातीठोक दावे केले आहेत. सोन्याचे भाव गेल्या काही दिवसात वाढण्याचे म्हणजे जागतिक अस्थिरता. डोनाल्ड ट्रम्प यांनी सगळ्या शांततेची वाट लावून टाकली आहे. ते कधी कोणावर टॅरिफ म्हणजेच आयातशुल्क लावतील आणि कधी कोणाला मित्र किंवा शत्रू ठरवतील याचा कोणीही अंदाज बांधू शकत नाही. भारतावर त्यांनी सर्वाधिक ५० टक्के आयातशुल्क लावले आहे. यामुळे भारतातून अमेरिकेला जाणारी निर्यात बंद पडली आहे. पण त्याचवेळी भारत आणि अमेरिका यांच्यात पुन्हा दोस्ती स्थापित होण्यासाठी वाटाघाटीही चालू आहेत. त्यामुळे डिसेंबरअखेर पुन्हा ट्रम्प आणि मोदी हे फ्रेंड होऊन गळ्यात गळे घालताना दिसले तर नवल वाटायला नको. ट्रम्प यांच्या या धोरणांमुळे बाहेरचे देश वैतागले आहेतच. पण त्यांच्या देशातल्या बँका व कंपन्या अधिक त्रासलेल्या आहेत. अमेरिका आजवर चीन, भारत, व्हिएतनाम अशा देशांमधून येणाऱ्या मालावर अवलंबून होती. आता हा माल अमेरिकी लोकांसाठी महागडा झाला आहे किंवा मिळेनासाच झाला आहे. यामुळे अमेरिकेतल्या गुंतवणदारांमध्येच भयंकर अस्वस्थता आहे.

### डॉलरऐवजी सोने खरेदी

दुसरीकडे अमेरिकेच्या भानगडीत न पडता बाकीचे देश आपसात अधिक करारमदार करू लागले आहेत. ब्रिटन व भारतामधले ताजे करार हा त्याचा पुरावा आहे. पुन्हा हे करार डॉलर या चलनामध्ये न करता अन्य चलनाचा वापर करता येतो का हे तपासले जाऊ लागले आहे. चीनने तर अमेरिकेवर जवळपास बहिष्कार घातला आहे. यंदा चीनने अमेरिकेकडून एक किलोदेखील सोयाबीन व मका खरेदी केलेला नाही. दरवर्षी चीन हा या वस्तूंचा मोठा आयातदार असतो. अमेरिकेतील एनव्हिडीया या एक नंबरच्या कंपनीच्या चिप्स खरेदी करण्यावरही चीनने बंदी घातली आहे. गुगल, फेसबुक, अमेझॉन यांना चीनची आधीपासूनच बंदी आहे. थोडक्यात, अमेरिकेचा डॉलर घ्यायला वा द्यायला लागूच नये असा बंदोबस्त चीनने करून ठेवला आहे. भारत व चीन अजूनही रशियाकडून तेल खरेदी करीत असून तो व्यवहार डॉलरच्या बाहेरचा आहे. डॉलरवरच्या या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बहिष्कारामुळे त्याचे दर खाली येत आहेत. भारतीय माणसे जशी सोन्यात गुंतवणूक करून ठेवतात तशा जगभरातील बँका, देशांची सरकारे, बड्या कंपन्या डॉलर आणि अमेरिकी सरकारचे रोखे खरेदी करून ठेवत असत. ट्रम्प यांच्या कृपेने त्यांची मागणी कमी झाली आहे. तो पैसा किंवा ती गुंतवणूक आता डॉलरऐवजी सोन्यामध्ये होऊ लागली आहे. साहजिकच सोन्याची मागणी वाढून भाव कडाडले आहेत. भारतात घराघरांमध्ये सोन्याची जमेल तेव्हा जमेल तितकी खरेदी होते. तशी जगात कोठेही होत नाही. त्यामुळे जगातील सर्वात मोठा सोन्याचा आयातदार आजपर्यंत भारत हाच होता. पण आता खुद्द अमेरिका व युरोपातल्या बँका, कंपन्या व सरकारे सोने खरेदी करू लागले आहेत. त्या देशांमध्ये लग्नात सोन्याचे दागिने देण्याघेण्याची फारशी पध्दत नाही हे भारतीयांचे सुदैवच म्हणावे लागेल. अन्यथा, हा भाव केव्हाच तीनचार लाखांपर्यंत गेला असता.

### सोने घसरेल?

सोने हा धातू म्हणून लोखंडापेक्षा फार कामाचा आहे असे काही नाही. क्रिप्टो चलन म्हणजे तर कागदी नोटादेखील नाहीत. केवळ संगणकावरच्या नोंदी. तरीही सर्व समाजाने हे ठरवून टाकले आहे की, पूर्वी सोन्याला आणि आता क्रिप्टोला प्रचंड मूल्य आहे. दसऱ्याला आपण सोने म्हणून झाडाची पाने एकदुसऱ्याला देतो. त्यातही आपण असे समजतो की ती आपट्याची आहेत. पण प्रत्यक्षात असतात कांचनाची. ते असो. पण कांचन किंवा आपट्याच्या पानांमध्ये जसे आपण सोने पाहतो तसेच सोन्यामध्ये प्रचंड काहीतरी मूल्य आहे असे मानायचे असे सर्व समाजाने अनेक शतकांपासून ठरवून टाकले आहे. त्यामुळेच देशाचे चलन छापतेवेळी तितक्याच मूल्याचे सोने आपल्या मध्यवर्ती बँकेत असावे असा नियम सर्व देशांनी स्वतःवर घालून घेतलेला होता. म्हणजेच अमेरिकी सरकार जेव्हा शंभर डॉलरची नोट छापत असे तेव्हा त्या प्रत्येक नोटेइतके किमतीचे सोने तिथल्या फेडरल बँकेत आहे याची ती हमी असे. सोने व डॉलर यांची ही सांगड १९७० च्या दशकात अमेरिकेने काढून टाकली. वाटेल तितक्या नोटा छापण्याचा मार्ग मोकळा झाला. इतर देशांनीही याचाच कित्ता गिरवला. तेव्हापासून सोन्याला असलेले महत्व खालावत होते व एकविसाव्या शतकात ते कमी कमी होत जाईल असे अनेकांना वाटत होते. पण आता अनपेक्षितपणे पुन्हा सोन्याने उसळी घेतली आहे. अर्थात, भारतात सोने कायमच ऐन भरात होते व आहे. इसवी २००० साली दहा ग्रॅम सोन्याची किंमत ४४०० होती. २०१० साली ती वाढून २०२७८ झाली. अवघ्या पाच वर्षांपूर्वी ती ५० हजार होती. आता गेल्या पाच वर्षात ती दुप्पटीहून अधिक झाली आहे. आता इथून पुढे हे दर खाली येतील असे म्हणणाऱ्यांचे तर्क वेगवेगळे आहेत. एक म्हणजे, अमेरिकेतील ज्या श्रीमंतांनी, बँकांनी व कंपन्यांनी प्रचंड खरेदी केल्यामुळे हे दर वाढले आहेत, ते सोने त्यांनी घरात कुजवून ठेवण्यासाठी घेतलेले नाही. ते त्याकडे गुंतवणूक म्हणून पाहतात. त्यामुळे ते लवकरच जिथे प्रचंड दर मिळतो आहे अशा भारत व चीनला विकू पाहतील. बाजारात एकाच वेळी इतके सोने आले तर त्याचे दर साहजिकच पडतील. पण पडतील म्हणजे ते अमेरिका व इंग्लंडच्या बाजारात पडतील. भारतीयांची हौस लक्षात घेता ते इथे खाली पडणे कठीण.

**विचार**

# ट्रम्प नीतीला रणनीतीक उत्तर

*पन्नास टक्के आयात शुल्क. चाबहार बंदराच्या कामात खोडा, 'एच-वन बी' व्हिसासाठी अव्वाच्या सव्वा शुल्क अशा निर्णयांद्वारे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. मात्र १४५ कोटींची बाजारपेठ आणि देशांतर्गत खपाचे प्रचंड प्रमाण असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला हलवणे ट्रम्पना शक्य नाही. ट्रम्प नीतीचा थोडाबहुत परिणाम होईल; परंतु भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक मजबूत पाऊल पडेल.*



**आरिफ शेख**

अमेरिकेने भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर पन्नास शुल्क आकारल्याने भारत-अमेरिका व्यापार संबंधांमध्ये अचानक आणि जलद बिघाड झाला. भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल, हा अंदाज मात्र खरा ठरला नाही. भारताची अमेरिकेशी असलेली निर्यात फायद्याची आहे. ट्रम्पनीतीमुळे अमेरिकेला निर्यात करणाऱ्या काही क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. वस्त्रोद्योग, मत्स्य, फर्निचर, ज्वेलरी आदी उद्योगांवर परिणाम झाला आहे; परंतु हा परिणाम तात्कालिक असेल. भारत, रशिया, ब्राझील या ब्रिक्स देशांमधील प्रमुख देशांनी अमेरिकी डॉलरला पर्यायी चलन बाजारात आणण्याचा विचार सुरू केल्यानंतर पित्त खवळलेल्या ट्रम्प यांनी या तीन देशांची कोंडी करण्याची व्यूहनीती आखली. 'ब्रिक्स' देशांमध्ये जगाच्या तुलनेत राहणारी लोकसंख्या, या देशांचे उत्पन्न, जी-सात देशांना शह देण्याइतकी 'ब्रिक्स' देशांची वाढलेली ताकद याची भीती अमेरिकेला वाटते आहे. 'ब्रिक्स' देशांपैकी चीन आणि भारतातून अमेरिकेला मोठ्या प्रमाणात निर्यात होते. अमेरिकेचे या दोन देशांशी असलेल्या व्यापारात असंतुलन आहे. त्यामुळे अमेरिकेने त्यांच्याकडून होणाऱ्या निर्यातीवर आयातशुल्क वाढवून बंधने आणण्याचा प्रयत्न केला; परंतु या दोन देशांमधील लोकसंख्या, बाजारपेठ आणि त्यांच्याकडून अन्य देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात होते. ते पाहता त्यांच्या अर्थव्यवस्थांवर फार परिणाम होणार नाही. उलट, आता अमेरिकेत महागाई वाढायला लागली आहे. गेल्या एक महिन्यात अमेरिकेत त्याचे परिणाम दिसायला लागेल. जागतिक पतमापन संस्थांनी अमेरिकेत मंदीचे संकेत दिले आहेत.

भारताने मात्र ट्रम्प नीतीवर 'स्वदेशी'चा उतारा शोधला. १४५ कोटी भारतीयांनी काही तोशीस सोसून भारतीय उत्पादने खरेदी करायला सुरुवात केली, तर अमेरिकन निर्यातीच्या बंधनामुळे होणारे भारताचे नुकसान भरून काढता येईल. भारतीय वस्तूंच्या किंमती लक्षात घेऊन तर सरकारने जीएसटी दरांमध्ये घटीचे पाऊल उचलले. एके काळी व्यापार तूट संतुलित करण्यासाठी आणि देशांतर्गत नोकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी बनवलेले आयात शुल्क आता दबाव युक्ती म्हणून वापरले जात आहे. अमेरिकेसोबत ४५.७ अब्ज अमेरिकन डॉलर्सची व्यापार तूट असलेल्या भारतावर चीनपेक्षा जास्त शुल्क आकारले जात आहे. रशियाकडून भारताची कच्च्या तेलाची आयात आंतरराष्ट्रीय नियमांमध्ये आहे आणि जागतिक किंमत मर्यादा प्रणालीचे पालन करते. त्यामुळे जगभरात तेलाच्या किमती स्थिर राहण्यास मदत होते. चीन, युरोप, अमेरिका रशियातून आयात करत असताना केवळ भारतावर शुल्क लादण्याचा निर्णय केवळ आकसापोटी आहे, हे जगही पहात आहे.

परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाच्या मते, २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताची कच्च्या तेलाची आयात १४३.०८ अब्ज डॉलर्सची होती, त्यात रशियाचा वाटा ३५ टक्के होता. २०२४ मध्ये भारत (५२.२ अब्ज डॉलर्स) आणि चीन (६२.३ अब्ज डॉलर्स) हे रशियाच्या तेलाचे सर्वात मोठे खरेदीदार म्हणून उदयास आले. ते एकत्रितपणे रशियाच्या एकूण कच्च्या तेल निर्यातीपैकी १२२.५ अब्ज डॉलर्सचे तेल खरेदी करतात. रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी केल्यामुळे भारताच्या तेल आयातीवरचा खर्च अंदाजे ७-१० अब्ज डॉलर्सने कमी झाला आहे. रशियाकडून कच्चे तेल खरेदीच्या सवलतीचे मार्जिन आता प्रतिपिंप २.२ डॉलर्स इतके कमी झाले असले, तरी रशियन कच्चे तेल अजूनही एक स्वस्त पर्याय आहे. या तेल खरेदीकडे भारताला व्यापक भू-राजकीय आणि आर्थिक वास्तवांपासून वेगळे करता येत नाही. जगातील तिसरा सर्वात मोठा तेल ग्राहक म्हणून भारताला वाढ टिकवून ठेवण्यासाठी परवडणाऱ्या किमतीत इंधन खरेदी करणे आवश्यक आहे. रशिया ज्या किंमतीत कच्चे तेल पुरवते, त्या किंमतीत कच्चे तेल पुरवण्याची क्षमता अमेरिका आणि इतर कोणत्याही तेल उत्पादक देशाकडे नाही. भारताने अमेरिकेकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवावे असे अमेरिकेला वाटत असेल, तर भारताची त्याला सशर्त तयारी आहे. त्यासाठी भारताने अमेरिकेला अट घातली आहे. इराण आणि व्हेनेझुएलकडून कच्चे तेल खरेदी करण्यास भारताला परवानगी द्यावी, अशी मागणी करून भारताने अमेरिकेला कोंडीत पकडले आहे. या दोन देशांतून कच्चे तेल खरेदी करण्यावर अमेरिकेने निर्बंध घातले आहेत.

दरम्यान, भारत आणि चीन रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्यामुळे जागतिक बाजारातील कच्च्या तेलाचे दर स्थिर आहेत. भारत आणि चीनने हे थांबवले, तर जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर दुप्पट होतील आणि त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होईल. महागाई वाढेल. भारताचे हे म्हणणे आता जागतिक पातळीवर मान्य व्हायला लागले आहे. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञही त्याला दुजोरा देऊन अमेरिकेची कोंडी करत आहेत. शिवाय, चीन रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची आयात करत आहे. अद्यापपर्यंत चीनवर अशा दंडात्मक शुल्काची कारवाई केलेली अमेरिकेने केलेली नाही. अमेरिका ही जगातील सर्वात मोठी आयातदार आणि प्रमुख निर्यातदार आहे. जागतिक व्यापार प्रवाहावर तिचा प्रभाव आहे. तिने भारतावर लादलेल्या आयातशुल्क वाढीचा फटका औषधे, कापड आणि वस्त्रे, रत्ने आणि दागिने, ऑटो पार्ट्स आणि सागरी उत्पादने (विशेषतः कोळंबी) यासारख्या कामगारकेंद्रित, उच्च-मूल्याच्या क्षेत्रांना बसेल. त्यात लाखो लोक नोकऱ्या करतात. या क्षेत्रांना आधीच मोठे स्पर्धक आहेत. आजघडीला भारत कापड आणि वस्त्रोद्योग क्षेत्र बांगलादेश (२० टक्के कर), पाकिस्तान (१९ टक्के) आणि व्हिएतनाम (२० टक्के) या कमी कर असलेल्या देशांशी स्पर्धा करत आहे. कोळंबी उद्योग इक्वेडोर, इंडोनेशिया आणि व्हिएतनामशी स्पर्धा करतो आणि रत्ने आणि दागिने क्षेत्र तुर्कस्तान (१५ टक्के) आणि थायलंड (१९ टक्के) शी स्पर्धा करते.

'ट्रम्पियन अर्थशास्त्रा'चा हा टप्पा तात्पुरता आहे. प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्या मते ट्रम्प यांचे धोरण दिशा चुकीची आहे आणि त्याचे परिणाम अमेरिकन नागरिकांना भोगावे लागतील. अमेरिकेने दीर्घकालीन जागतिक विश्वासापेक्षा अल्पकालीन व्यवहारात्मक नफ्याला प्राधान्य देऊन जागतिक विश्वास गमावला आहे. ट्रम्प यांचा टॅरिफ फटका केवळ व्यापाराबद्दल नाही, तर देशाच्या सार्वभौमत्वाशी संबंधित आहे. अशा वेळी भारताने ठाम राहिले पाहिजे; परंतु त्याचबरोबर शहाणपणाने वागले पाहिजे. भारताचा सर्वोत्तम पर्याय म्हणजे वाटाघाटी करणे आणि सौहार्दपूर्णपणे वातावरणात प्रश्न सोडवणे. भारताने भावनिक वाटाघाटींऐवजी विवेकी वाटाघाटी केल्या पाहिजेत. अमेरिका ही एक अतिशय महत्त्वाची बाजारपेठ आहे, हे दुर्लक्षित करता येणार नाही. भारताने अमेरिकेशी पुन्हा संपर्क साधण्यासाठी स्मार्ट, धोरणात्मक वाटाघाटी केल्या पाहिजेत. त्यासाठी ऊर्जा, संरक्षण उपकरणे (ड्रोनसह) आणि प्रगत सेमिकंडक्टर चिप्सवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारत अद्याप त्याचे देशांतर्गत उत्पादन करत नाही. जीएम पिकांच्या बाबतीत नेहमीच एक समस्या राहिली आहे. भारताने 'जीएम' आधारावर अमेरिकेतून सोयाबीन आणि कॉर्न आयात करण्यावर बंदी घातली आहे, तरीही 'जीएम' कापूस आणि त्याची उत्पादने आधीच भारताच्या अन्नसाखळीत समाविष्ट आहेत. भारतातील ९५ टक्के कापूस 'जीएम' आहे. इथेनॉल मिश्रण किंवा पोल्ट्री फीडसाठी 'जीएम कॉर्न' आणि खाद्यतेलाच्या पुरवठ्यासाठी 'जीएम' सोया आयात करण्याची परवानगी देणे हा अधिक व्यावहारिक दृष्टिकोन ठरू शकेल.

'जीएम' उत्पादनांबाबतच्या अमेरिकेच्या मागण्या वैज्ञानिक आधारावर सोडवल्या पाहिजेत. भारत कापूस, सोया आणि दुग्धजन्य पदार्थांसारख्या संवेदनशील वस्तूंसाठी 'टॅरिफ रेट कोटा' (टीआरक्यू) ३ यंत्रणादेखील स्वीकारू शकतो. अमेरिका भारतावर टॅरिफ दराचा दबाव आणत राहिल्यास लक्षणीय नुकसानाला सामोरे जाणारे उद्योग ओळखणे सध्या आवश्यक आहे. तात्पुरते व्याजमुक्त कर्ज, भांडवली प्रोत्साहन, करसवलती, जीएसटी कपात आणि मालवाहतुकीच्या अनुदानाची भरपाई याद्वारे लक्ष्यित मदत देण्याच्या पर्यायावर निर्णय घ्यावा लागेल. कापड, रत्ने, दागिने आणि कोळंबी यासारख्या क्षेत्रांसाठी हे उपाय काही आठवड्यामध्ये लागू केले पाहिजेत. अन्य स्पर्धक देश आणि भारताचे निर्यातदार यांच्यातील आयातदरांमधील तफावत भरून काढण्यासाठी आणि निर्यात उत्पन्न आणि ४५ दशलक्षाहून अधिक कामगारांच्या नोकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी तात्पुरते २५-३० टक्के प्रोत्साहन अनुदान देणे आवश्यक आहे. सुरतमधील रत्ने आणि दागिने क्षेत्र, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल आणि ओडिशामधील कोळंबी निर्यातीलाही असेच समर्थन दिले पाहिजे. भारताने आपल्या निर्यातीत विविधता आणण्यावर आणि अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जागतिक व्यापार व्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी 'ब्रिक्स-४' देशांनी एकत्र काम करायला हवे. भारत त्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

# दे वरचि असा दे

**सुहास पटवर्धन**

राष्ट्रसंत तुकडोजींची जन्मभूमी म्हणजे विदर्भाची. महाराष्ट्रातील साधूसंतांची प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज, स्वच्छतेचे महान प्रचारक वैराग्यमूर्ती गाडगे महाराज, आणि ब्रह्मांडनायक म्हणून गौरविलेले शेगावचे गजानन महाराज. विदर्भ भवती सा विदर्भ। अर्थात जिथे सहज ज्ञान प्राप्त होते तो विदर्भ. त्यांचं विदर्भातील तुकडोजी महाराज हे एक संत.

अमरावतीजवळील यावली या गावी ३० एप्रिल १९०९ रोजी बंडोजी ठाकूर आणि मंजुळाबाई या दाम्पत्याच्या पोटी तुकडोजींचा जन्म झाला. त्यांचे पाळण्यातील नाव होते माणिक. त्यांच्या बारशाच्या वेळी पाळणा गायला होता. जन्मांध संतश्रेष्ठींनी अर्थात माधान गावचे संत गुलाबराव महाराज यांनी. पाळण्यातच तुकडोजींना संतत्वाची आणि कवित्वाची जणू दीक्षाच मिळाली. या माणिक मधील संतत्वाचे तेज अधिक झळकले ते विदर्भातील अकोट येथील सिध्द पुरुष हरीबुवा यांच्या आशीर्वादाने आणि त्यांचे गुरु आडकोजी महाराजांच्या कृपेमुळे.

दारिद्र्यात बुडालेल्या आपल्या कुटुंबाचे वर्णन करताना तुकडोजी महाराज म्हणतात,

**"तुकड्याचे घर, तुकडेच सारे**
**येती जाती वारे घरामाजी ।**
**महाल चंद्रमौळी, सर्प विंचू वरी ।**
**विसावती घारी झाडी तेथे ।**
**सूर्याचे दर्शन होय घरातून ।**
**रात्री तारांगण स्पष्ट दिसे ।**
**मित्र ते म्हणती, वा रे काय घर ।**
**तुकड्यादास म्हणे ऐसा मी गरीब ।**
**घरातील खांब मुजरे देती"**

तुकडोजींना शालेय जीवनात रस नव्हता. त्यात भर पडली ती बिकट आर्थिक परिस्थितीची. त्यांचे लौकिक अर्थाने शालेय शिक्षण झाले ते तिसरी-चौथीपर्यंत. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर,

**"वर्ग झाले तीन -चार ।**
**परी गावे झाली फार ।**

भजनासाठी व उदरनिर्वाहासाठी भाकरीचे तुकडे मागणाऱ्या या "माणिक"ला गावचे लोक अगोदरच तुकड्या म्हणू लागले होते. तथापि एका प्रसंगी आडकोजी महाराजांनी माणिकला "तुकड्या" म्हणून हाक मारली. शिवाय "तुका म्हणे" च्या धर्तीवर तू पण "तुकड्या म्हणे" असे म्हणत जा असे सांगितले. याचा उल्लेख करताना तुकडोजी महाराज म्हणतात,

**"सद्‌गुरूने मज तुकड्या संबोधिले ।**
**तेचि मिरविले नाव लोकी ।**
**माझे जन्मजात माणिक सांगती ।**
**परी माझी गती तैशी नाही ।**
**तुकड्या नावाने लोकी मी खेळलो ।**
**उजेडी आलो तुकडे खाता"**

लौकिक अर्थाने अल्पसाक्षर असलेल्या तुकडोजी महाराजांची ग्रंथसंपदा विस्मयकारक आहे. त्यात विशेष उल्लेखनीय म्हणजे ग्रामगीता, सार्थ आनंदामृत, सार्थ आत्मप्रभाव, अनुभव प्रकाश, लहर की बरखा इत्यादी. अंधश्रद्धा निर्मुलन, भक्तीचा प्रचार आणि राष्ट्रप्रेमाची दृढ भावना निर्माण करण्यासाठी तुकडोजी महाराजांनी चंद्रपूर जवळील मेटेपार गावी केलेल्या सप्ताहात लाखों लोक सहभागी झाले होते.



१६ जून १९३६ रोजी महात्मा गांधी सेवाग्राम येथे रहावयास गेले तेव्हा त्यांच्या कानावर तुकडोजी महाराजांच्या कार्याची बातमी गेली. महात्माजींनी तातडीने तुकडोजी महाराजांना पत्र लिहून सेवाग्राम येथे बोलावून घेतले. महात्माजींच्या सहवासात त्यांनी एक महिना वास्तव्य करून १३ ऑगस्ट १९३६ रोजी दोघांनी परस्परांचा भावपूर्ण निरोप घेतला. १९३८ ते १९४१ या कालावधीत त्यांनी बरखेड, अकोला, भाम्बोरा, चिमूर इत्यादि ठिकाणी विविधांगी प्रशिक्षणाचे वर्ग सुरु करून राष्ट्रसेवा हीच प्रभूसेवा होय असा संदेश देत, अस्पृश्योद्धाराचे कार्य करीत संत महंतांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले. गांधीजींच्या १९४२ च्या छोडो भारत क्रांतीमुळे "करा किंवा मरा"हा नारा देशभरात दुमदुमत होता. तुकडोजी महाराज चळवळीत सक्रीय सहभाग घेत असल्याचे ब्रिटीशांच्या लक्षात आले. बी.बी.सी. लंडनने त्यावेळेला दिलेल्या वृत्तात म्हटले होते,

" हा नवा कोण दुसरा गांधी आला आहे की ज्यामुळे क्रांतीला वेग आला आहे"

परिणामी २८ ऑगस्ट १९४२ रोजी तुकडोजी महाराजांना चंद्रपूर येथून अटक करून नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. तेथेही उग्र आंदोलनाची चिन्हे दिसू लागताच त्यांना मध्य प्रदेश मधील रायपूरच्या कारागृहात हलविण्यात आले. डिसेंबर १९४२ मध्ये त्यांची कारागृहातून सुटका झाली.

१९४४ साली सेवाग्राम येथे गांधीजींच्या कुटीसमोर तुकडोजींच्या प्रेरणेमुळे सामुदायिक प्रार्थना झाली. त्याबद्दल महात्मा गांधीजीने म्हटले की ,

"सामुदायिक प्रार्थना व्यापक बनानेमे उपयुक्त होनेवाला तुकडोजी महाराजजीने यह अच्छा उपक्रम निकाला है । उनका जनसेवा और भजनका काम तो हमेशा चलताही रहता है । आप इसी तरह तुकडोजी महाराजके इस कार्यको आगे बढाते रहो यही मेरी इच्छा है ।" स्त्री शिक्षण व स्त्रियांची उन्नती याचे सखोल चिंतन करून ते आपल्या काव्यात लिहितात,

**"कोणी भोगवस्तू समजोनी भली ।**
**सजवोनी ठेविती नुसती बाहुली ।**
**त्याने घरोघरी शिरला कळी ।**
**अबला बनली मायभूमी ।**
**"अरे, तुझ्याहुनी ती उत्तम वागते ।**
**समाजी उत्तम भाषण देते ।**
**तुलाही शहाणपण शिकवू जाणते ।**
**मग ती मागे कशाने?"**

विनोबा भावे आणि सानेगुरुजी यांच्याबरोबरही तुकडोजी महाराजांनी कार्य केले. सेवाग्राममध्ये असताना तुकडोजी महाराजांचे भजन ऐकताना तल्लीन होऊन सोमवारचे आपले मौनही महात्माजी विसरले होते. १९४९ साली महात्मा गांधींच्या पहिल्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी "राष्ट्रसंत" ही सन्मानजनक उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. तेव्हा डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले,

"देशकी बिमारिकी नब्ज अगर पहचानी है तो वोह है हमारे तुकडोजी महाराज. सच मायनेमे तो उन्हे "राष्ट्र संत" कहना चाहिये. और लाखोकी तादातमे आये हुये, आप जनताजनार्दन को साक्षी रखकर मै उन्हे आज "राष्ट्रसंत" उपाधि से गौरवान्वित करता हुं ।" २००५ साली नागपूर विद्यापीठाचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर असे नामकरण करण्यात आले. गुरुकुंज आश्रम अमरावती येथे ११ ऑक्टोबर १९६८ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे महानिर्वाण झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त त्यांचे आदरपुर्वक स्मरण करून त्यांची ही प्रार्थना सर्वांनी मनापासून म्हणू या.

**" या भारतात बंधू भाव नित्य वसू दे**
**दे वरचि असा दे ।**
**हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे**
**मतभेद नसू दे ।**
**जाती भाव विसरुनिया एक हो आम्ही**
**अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनि**
**खलनिंदका मनीही सत्य न्याय वसू दे ।**
**सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी**
**ही नष्ट होऊ दे विपत्ति, भीती बोहरी**
**या भारतात बंधू भाव नित्य वसू दे ।"**
**दे वरचि असा दे ।।**

**लेखक महापुरुषांच्या चरित्राचे व इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक आहेत.**

**दिनविशेष**

# आंतरराष्ट्रीय बालिका दिन :अस्तित्वासाठी 'ती' धडपडतेय..

नवरात्रीत देवी दुर्गेची पूजा आणि आराधना केली जाते. मुलीदेखील तिचाच अंश आहेत असे समजले जाते. मग असे असताना मुली सुरक्षित का नाहीत? असा प्रश्न आजच्या दिवशी तर सर्वांना पडायला हवा. या विषयावर विचार करून जागरूकता करण्याची अत्यंत गरज आहे. दरवर्षी ११ ऑक्टोबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा केला जातो. बालिका दिन साजरा करण्यामागचे कारण म्हणजे जगभरातील मुलींचे हक्क, आव्हाने आणि संधी याबद्दल अधिकाधिक लोकांना जागरुक करणे. हे केवळ लैंगिक समानतेला प्रोत्साहन देत नाही. त्याऐवजी, ते आरोग्य, शिक्षण आणि मुलींना सुरक्षित वातावरण प्रदान करण्याचे समर्थन करते.

आजच्या आधुनिक जगात मुलींच्या सुरक्षेचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा झाला आहे. भारतासारख्या सांस्कृतिक आणि परंपरांनी समृद्ध असलेल्या देशात मुलीला देवीच्या रूपात पूजले जाते. तरीसुद्धा, मुलींच्या सुरक्षेचे प्रश्न उभे राहतात, विशेषतः लैंगिक अत्याचार, छळ, अपहरण आणि अन्यायाच्या घटना पाहायला मिळतात. अशा घटना मुलींच्या विकासाच्या आणि स्वातंत्र्याच्या मार्गात अडथळा ठरतात.

भारतात मुलींच्या सुरक्षेसाठी सरकार विविध उपक्रम राबवत आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारखे अभियान मुलींच्या शैक्षणिक आणि सामाजिक सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण आहेत. मात्र, फक्त सरकारी उपाय योजना पुरेशा नाहीत, तर समाजातील प्रत्येक घटकाने या विषयावर लक्ष दिले पाहिजे. शाळा, महाविद्यालये आणि घरांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

मुलींच्या सुरक्षिततेसाठी सर्वात मोठा धोका म्हणजे लैंगिक अत्याचार. अशा प्रकरणांमध्ये समाजाने पीडित मुलींच्या बाजूने उभे राहणे आणि दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजात मुलींना सुरक्षिततेची हमी मिळवून देण्यासाठी तात्काळ पावले उचलायला हवीत. मुलींना आत्मरक्षणाचे प्रशिक्षण देणे, त्यांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे आणि आपल्या कुटुंबात खुल्या वातावरणाची निर्मिती करणे गरजेचे आहे. महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसागणिक वाढत असून, शिक्षणासाठी घरापासून दूर जात असलेल्या विद्यार्थिनींना इतर मुलींच्या आधाराची गरज असते. अशा मुलींना आधार देण्यासह स्वातंत्र्यांची जाणीव करून देण्यासाठी गोवंडीतील १८ वर्षीय तरुणी धडपडत आहे.

पालकांनी आपल्या मुलींना धैर्याने बोलण्यास शिकवले पाहिजे. मुलींनी घडणाऱ्या चुकीच्या घटनांबद्दल लगेच पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीला सांगण्याचे धाडस करायला हवे. तसंच, पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडवणेही आवश्यक आहे. मुलींना सन्मान आणि सुरक्षा देणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

आंतरराष्ट्रीय बालिका दिनाचा मुख्य उद्देश मुलींच्या हक्कांबद्दल जागरूकता वाढवणे हा आहे. हा दिवस मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता या मुद्द्यांवर प्रकाश टाकतो, याद्वारे मुलींचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे हे समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला जातो, यासोबतच हा दिवस मुलींवरील भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात आहे. असा एक मजबूत संदेश देतो, यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, जे मुलींच्या चांगल्या भविष्याकडे पावलं टाकण्यास मदत करतात.

आंतरराष्ट्रीय बालिका दिनाचे महत्त्व म्हणजे मुलींच्या सक्षमीकरणावर आणि त्यांच्या हक्कांवर लक्ष केंद्रित करणे, हा दिवस समाजातील मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता या मुद्द्यांवर प्रकाश टाकतो, याद्वारे समाजाला मुलींची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला जातो. मुलींचा विकास आणि सक्षमीकरण सर्वांसाठी फायदेशीर आहे, हा दिवस एक व्यासपीठ प्रदान करतो जिथे मुली त्यांचा आवाज उठवू शकतात, अशा प्रकारे, हा दिवस सकारात्मक बदल घडवून आणण्याची एक महत्त्वाची संधी आहे.

# चाळ संस्कृतीवर महावितरणची कृपादृष्टी

## ● मीटर नसूनही वीजपुरवठा सुरळीत



। नेरळ । प्रतिनिधी ।

मुंबईमधील झोपडपट्टी हलवल्या जात असून कर्जत तालुक्यात नेरळ शेलू परिसरात मोठ्या प्रमाणावर चाळी बांधल्या जात आहेत. या चाळीमध्ये घर घेऊन राहणाऱ्या रहिवाशांना स्थानिक पातळीवर बिल्डरकडून फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. नेरळ परिसरातील अनेक चाळीमध्ये महावितरण कंपनीचे विजेचे मीटर नाहीत. मात्र या चाळीमध्ये वीजपुरवठा सुरळीत सुरू आहे. त्यामुळे महावितरण कंपनीचे दुर्लक्ष की महावितरण कंपनीची कृपाछाया याबद्दल उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

नेरळ परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या आणि नव्याने बांधण्यात येत असलेल्या चाळी यांच्या विजेचा प्रश्न याबद्दल उपलतसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. या चाळीवर महावितरण कंपनीची कृपादृष्टी असल्याचे दिसून येत आहे. अनेक चाळीमध्ये विजेचे कनेक्शन नाही. विद्युत मीटर नसताना देखील विद्युत खांब यांच्यावरून डायरेक्ट वीज कनेक्शन करून विद्युत चोरीचे प्रकार दिवसाढवळ्या सुरू आहेत. असे प्रकार सुरू असताना महावितरण कंपनीकडून दुर्लक्ष होताना दिसत आहे. नेरळ परिसरात अनेक वसाहतीमध्ये असे प्रकार सुरु असून नेरळमधील मोहाची वाडी जवळ असलेली कोंबळवाडी येथे श्री साई परफेक्ट होममधील चाळीमध्येदेखील असे प्रकार सुरू आहेत.

मात्र त्याचा महावितरण कंपनीला थांगपत्ता नाही, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. तेथील चाळींमध्ये लोक राहात असूनदेखील तिथे चक्क विद्युत मीटरच नसल्याचे समोर आले आहे. मात्र त्या चाळीमध्ये विजेचे दिवे मात्र पेटलेले असतात.

### कारवाई कधी?

चालीसाठी लागणाऱ्या पाण्याची टाकीदेखील मोटर पंपाने भरली जाते. त्या मोटरपंपाला देखील मीटर नसल्याचे समोर आले आहे. हे सर्व महावितरणच्या नजरेखाली होत असून महावितरण बघ्याची भूमिका घेत आहे. आता या सर्व गोष्टीकडे महावितरणाचे वरिष्ठ अधिकारी कधी आणि काय कारवाई करणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### अनेक वर्ष चोरून विजेचा वापर

येथे राहणारे रहिवासी हे गेली सात आठ वर्ष तेथे राहत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे लाईट बिल येत नाही. त्यांच्या रूमसाठी देण्यात आलेले मीटर हे थकित बिलामुले महावितरणाने काढून नेले आहेत. परंतु गेली सात-आठ वर्ष ही लोक चोरून विजेचा वापर करत आहेत. महावितरणाचे कर्मचारी अनेकवेळा या ठिकाणी जात असतात. परंतु त्यांच्याकडून त्या चालधारकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करत नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.


SRM e-Tender Notice No. 12/2025-26

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No | RFx no | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 22/2025-26 | 7000037850 | (2nd Call) Annual civil maintenance works for Dombivali, Dombivali Pal, Morivali, Anandnagar, Jambhul, Neral,Palava S/stn colony, offices under Kalyan SDn for FY 2025-26. | 3101090.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact person :** Dy. Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325/ Mob no. 9765644291

**Executive Engineer (Civil), Panvel**

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Tender Notice

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/PC-0 METER READING/T-10/2025-26 | METER READING OF PC O CONSUMERS THROUGH CMRI INCLUDING DATA DOWNLOADING, RETRIVEING, ANLYSIS & BILL DISTRIBUTION & PRINTING WORK FOR THE CONSUMERS UNDER GOREGAON DIVISION | 50.00 | 50,000/- | 5000+18 % GST= 5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 11.10.2025 to Dt. 15.10.2025. Submission of Bid is up to Dt. 15.10.2025 till 15.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO no. 253** **Executive Engineer, Goregaon Division**


# सिमा नाहीद पुरस्काराने सन्मानित



। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राध्यापिका सेवेत कार्यरत असलेल्या डॉ. सिमा नाहीद यांना उदाहरणार्थ शिक्षक पुरस्कार देण्यात आला. मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र स्टेट उर्दू अकॅडमी कार्यक्रमात बहारे उर्दू इन मुंबई या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट सेवेबद्दल पोचपावती महाराष्ट्र स्टेट उर्दू साहित्य अकॅडमीतर्फे त्यांना उदाहरणार्थ शिक्षक या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी त्यांनी आपल्या यशाचे सर्व श्रेय आपल्या वडिलांना दिले. सिमा नाहीद यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सलाम हाल्डे, जावेद खान, ताबीर, तमशील, फरहत बेगम, तसेच वसंतराव नाईक महाविद्यालय मुरुडचे प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे, सर्व प्राध्यापक, शिक्षक वृंद कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांनी अभिनंदन करुन पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

# हरवलेले मोबाईल मूळ मालकांना परत

। कल्याण । प्रतिनिधी।

गेल्या दोन ते तीन महिन्याच्या कालावधीत कल्याण पश्चिमेतील खडकपाडा पोलीस ठाणे हद्दीतील २५ नागरिकांचे मोबाईल चोरीला गेले होते. या चोरीप्रकरणी नागरिकांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या होत्या. खडकपाडा पोलिसांनी गुन्हे अहवाल तांत्रिक संकेतस्थळाच्या माध्यमातून या सर्व चोरीच्या मोबाईलचा शोध घेऊन ते सर्व मोबाईल २५ मोबाईल मालकांना परत केले. सुमारे साडे तीन लाखाहून अधिक किमतीचे हे मोबाईल होते.

# श्री सेवाशक्ती पतसंस्थेस 'दीपस्तंभ' पुरस्कार जाहीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चोरोंडे येथील श्री सेवाशक्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेस कोकण गटातून २०२४-२५ या वर्षाचा प्रतिष्ठित 'दीपस्तंभ' पुरस्कार जाहीर झाला आहे. सहकार क्षेत्राला बळकटी मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन पतसंस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान करते. तज्ज्ञ निवड समितीने केलेल्या कठोर मूल्यांकनानुसार श्रीसेवाशक्ती पतसंस्थेची सलग चौथ्यांदा या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार दि. १२ व १३ ऑक्टोबर रोजी डेनिसन्स रिसार्ट, कुमटा, कर्नाटक येथे होणाऱ्या सोहळ्यात प्रदान केला जाणार आहे.

ही पतसंस्था ९००१-२०१५ मानांकन प्रमाणित असून स्थापनेपासून संस्थेने सतत ऑडिट वर्ग 'अ' मिळवला आहे. तत्पर, विनम्र सेवा, सर्व व्यवहारांकरीता एसएमएस सेवा, ठेवींवर आकर्षक व्याजदर, अल्प व्याजदरात त्वरित कर्ज, संगणकीकृत आर्थिक व्यवहार आणि वातानुकूलित सेवा ही या पतसंस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. तसेच, संस्थेला सतत ७ वर्ष बँको पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे.


महाराष्ट्र शासन

महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(02145)222167

निविदा सूचना क्रमांक २५ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे गांगवली धाडवेवाडी ता.माणगांव येथे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव जिल्हा रायगड. | १७००७२५/- | १८०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |
| २ | मौजे कुमशेत ता.माणगांव येथे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा- रायगड | १६९९९८२/- | १७०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |
| ३ | मौजे चिंचवली ता. माणगांव रस्त्या लगत आर.सी.सी.गटार बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १२६३५०१/- | १३०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग सहा |
| ४ | मौजे पानसई करंजेवाडी ता. माणगांव येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १६९९५३६/- | १७०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |
| ५ | शासकीय विश्रामगृह नांदवी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड | १६४७७३१/- | मसस | ५९०/- | ६ महिने | मसस |
| ६ | आंबेत येथील शासकीय विश्रामगृहाच्या आवारातील संरक्षक भिंत बांधणे. (मागील बाजू) तालुका माणगांव जिल्हा रायगड | २४६४३५६/- | मसस | ५९०/- | ६ महिने | मसस |
| ७ | माणगांव येथील कर्मचारी निवासस्थानास (पूल निवासस्थान) आवारास संरक्षक भिंत बांधणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड | २४४९२८९/- | मसस | ५९०/- | ६ महिने | मसस |
| ८ | गोरेगाव येथे पोलीस स्टेशनची दुरुस्ती करणे ता.माणगांव, जि.रायगड | १३०९१९८/- | १४०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ |

ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १०-१०-२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक १७-१०-२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २०-१०-२०२५ वेळ १०.०० वाजता |

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळावरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३९०३
**दिनांक :- ०८-१०-२०२५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


# चिंतामणी शिर्के यांचे निधन

। कोलाड । प्रतिनिधी।

गोवे गावातील रहिवासी चिंतामणी दगडू शिर्के यांचे मंगळवारी (दि.७) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ४० वर्ष होते. ते प्रेमळ व शांत स्वभावाने सर्वाना परिचित होते. त्यांच्या पश्चात त्यांची आई, पत्नी, एक मुलगा, दोन भाऊ, एक बहीण व मोठा शिर्के परिवार आहे. त्याच्या तरुणपणी अचानक झालेल्या निधनामुळे त्याच्या कुटूंबासह संपूर्ण गावावर शोककला पसरली आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार दि. १६ ऑक्टोबर, तर उत्तरकार्य विधी रविवार दि. १९ ऑक्टोबर रोजी त्याच्या गोवे येथील राहत्या निवासस्थानी होणार आहेत.


MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM e-Tender Notice No. 14/2025-26

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No | RFx no | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 26/2025-26 | 7000037632 | (2nd call) Annual civil maintenance works at 220KV Kandalgaon substation with colony and 220KV Vilebhagad substation for civil works for F. Y. 2025-26. | 2203612.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact person :** Dy. Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022) 27480325/ Mob no. 9765644291

**Executive Engineer (Civil) Panvel**


### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**११ ऑक्टोबर**

१) श्रीम.प्रतिमा प्रकाश म्हात्रे नवेदर-चेंढरे, अलिबाग, ११-१०-१९५२

# शिरगाव ग्रामस्थांचे श्रमदान शिबीर

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेचे स्वच्छता अभियान शिबीर अंतर्गत मुरुड तालुक्यातील शिरगाव शाळेत पालकांचे व ग्रामस्थांचे श्रमदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. हे शिबीर गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

यामध्ये वाढलेली, नको असलेली झाडे तोडणे, स्वच्छता, कंपाउंड वॉलवरील शेवाळ काढणे, रंगरंगोटी करणे, शाळेला पाण्याची फिल्टर व्यवस्था करणे, परसबाग तयार करणे, सुशोभीकरण करणे इत्यादी बाबींबाबत पालकांनी मोठ्या प्रमाणावर हातभार लावला. शाळा आपली मी शाळेचा हा दृष्टिकोन घेऊन गावातील ७६ पालकांनी व ग्रामस्थांनी या श्रमदान शिबिरात आपली उपस्थिती दाखवली. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र नाईक व उपशिक्षक प्रियंका पाटील यांनी केलेल्या आव्हानाला गावातील स्त्री व पुरुषांनी मोठ्या प्रमाणावर साथ दिली. यावेळी पालकांनी एक चांगले मॉडेल्स स्कूल म्हणून शिरगाव शाळा ओळखले जावे, ही संकल्पना बोलून दाखवली. शाळेमध्ये विविध कार्यक्रम राबवून शाळा गुणवत्ता पूर्ण निकषांमध्ये जाण्यासाठी पालकांनी सहकार्य करण्याचे मान्य केले. सोमवारी ग्रामस्थांचं गरबा नृत्य, संगीत खुर्ची असे उपक्रम शाळेत घेण्यात आले होते.


परिशिष्ट-७

जाहीर प्रकटन

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्याकरीता सोडत पद्धतीने कार्यवाही करण्याकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे विशेष सभा आयोजित केली आहे.

| अ.क्र | जिल्हा परिषदेचे नाव/पंचायत समितीचे नाव | सभेचे ठिकाण | सभेची वेळ व तारीख |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद रायगड | नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड | दिनांक १३/१०/२०२५ रोजी दुपारी १२-०० वाजता |
| २ | पनवेल | आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल, | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ३ | कर्जत | प्रशासकीय भवन, तहसिल कार्यालय कर्जत | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ४ | खालापूर | छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पंचायत समिती खालापूर | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ५ | सुधागड | श्री.बल्लळेश्वर देवस्थान पाली भक्त निवास क्र.१ ता.सुधागड जि.रायगड | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ६ | पेण | उपविभागीय अधिकारी कार्यालय पेण | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ७ | उरण | पंचायत समिती सभागृह, उरण | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ८ | अलिबाग | नगरपरिषद अलिबाग सभागृह अलिबाग | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ९ | मुरूड | महाराष्ट्र भुषण आ.डॉ.ति.श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती मुरूड | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| १० | रोहा | ज्येष्ठ नागरिक सभागृह नगर परिषद रोहा | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| ११ | तळा | डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती तळा | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| १२ | माणगाव | मध्यवर्ती प्रशासकीय भवन तहसिल कार्यालय माणगाव | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| १३ | म्हसळा | पंचायत समिती सभागृह पंचायत समिती म्हसळा | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| १४ | श्रीवर्धन | मध्यवर्ती प्रशासकीय भवन, पहिला मजला तहसिल कार्यालय श्रीवर्धन | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| १५ | महाड | बहुउद्देशीय हॉल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक महाड, | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |
| १६ | पोलादपूर | कॅप्टन विक्रम राव मोरे सभागृह पोलादपूर | दिनांक १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता |

२. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे. त्यांनी वरील ठिकाणी व वेळी हजर राहावे.

जिल्हा : रायगड
दिनांक : १०/१०/२०२५

सही/-
**(किशन ना.जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड**

**Government of Maharashtra**
**Forest Department**
**Mangrove Division- South Konkan**
Swapanapurti Bungalow, Behind Horizon Hall, Laxmi Nagar, Post Varsoli, Tal. Alibag, Dist Raigad-402 209. Email- dfom.southkonkan@gmail.com
**Parent Portal:** http://mahatenders.gov.in
**E-Tender Notice**

**Tender Notice No. DFO/MDSK/05/2025-26.**

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division- South Konkan, Swapanapurti Bungalow, Behind Horizon Hall, Laxmi Nagar, Post Varsoli, Tal. Alibag, Dist Raigad-402 209. from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website http://mahatenders.gov.in from 10/10/2025 at 5.00 pm to 17/10/2025 at 5.00 pm.

Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no./Mobile no. 9960802320/8149737146 during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website. If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: 1800 3070 2232.

| Sr. No | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non-Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Providing & Erecting 1.6mt height Chain Link Fencing over UCR wall in Survey No-168, Mouje Varsoli Koliwada Under Kurul Beat, Alibag Round in Alibag-Raigad Range of Mangrove Division South Konkan. | 82,44,154/- | 82,441/- | 4 Months. | Rs. 1180/- (Including GST) |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.

2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

sd/-
**Divisional Forest Officer,**
**Mangrove Division- South Konkan**

## तहसिलदार अलिबाग यांचे न्यायालयात

कु.का.क.७० ब दावा क्र.०२/२०२५

श्री. गजेंद्र विश्वनाथ नाईक,
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग, रायगड
सध्या रा. २/११, कामिनी अपार्टमेंट,
पारशी वाडी, गणेश मंदीर जवळ,
कोपरी कॉलनी, ठाणे - पुर्व, — अर्जदार
ता. ठाणे, जि. ठाणे. ४००६०३
१. श्री. सतीश विश्वनाथ नाईक,
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग, जि. रायगड
सध्या रा.४१/२, शंकर नार्वेकर निवास,
डॉ ब.ए.आंबेडकर मार्ग, गणेश सिनेमाचा मागे
लालबाग, परळ, मुंबई ४०० ०१२

विरुद्ध

१. श्री. कानु गोविंद नाईक — सामनेवाला
रा. ढवर, ता. अलिबाग
जि. रायगड

**मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये**

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| ढवर | ४८८ | ०-०२-०० | ०-००-०० | ००.५० |

अर्जदार व सामनेवाला यांस कळविणेत येते की, वरील निर्दिष्ट केलेल्या जमिनीबद्दल अर्जदार यांनी कुळ कायदा कलम ७० ब प्रमाणे कुळाचे नाव कमी करणेबाबत दावा दाखल केला आहे. त्या अनुषंगाने सदर प्रकरणाची सुनावणी दि. ११/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे सुनावणी करणेचे ठरविले आहे. सबब, तुम्ही अगर तुमचे प्रतिनिधी यांनी सर्व कागदपत्रांसह व साक्षीपुराव्यानिशी म्हणणे घेऊन तहसिल कार्यालय अलिबाग यांचे कोर्टात हजर रहावे. वरीलप्रमाणे तुम्ही स्वतः अगर तुमचे प्रतिनिधीमार्फत सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रांसह सदर ठिकाणी व वेळी हजर न राहिल्यास सदर दाव्याची सुनावणी तुमचे गैरहजेरीत घेण्यात येऊन गुणवत्तेनुसार निकाल दिला जाईल, यांची नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग — सही/-
दिनांक :- ०८/१०/२०२५ — **तहसिलदार अलिबाग**

प्रतः- तलाठी सजा ढवर
२/-सदरच्या नोटीसा संबंधितांना बजावून नोटीस बजाविल्याबाबत पुर्तता अहवाल इकडे मुदतीत सादर करावा. व सुनावणीच्या वेळी संबंधित सर्व कागदपत्रे घेऊन कार्यालयास उपस्थित रहावे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **खुद्द अलिबाग मध्ये १ बेड हॉल किचन फ्लॅट भाडेतत्त्वावर** द्यावयाचा आहे. भाडे ₹ १५.००० डिपॉझिट ₹ ६०,०००. एजंट क्षमस्व फोन नंबर ९८६९४५९०६३.
- **अकाऊंटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **दुकान गाळा विक्री करणे आहे.** अलिबाग एस.टी.स्टँड जवळ ९७६४५४८६७९
- **अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी** १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- **अलिबाग-गोंधळपाडा येथे २.५ वर्षांच्या जुळ्या मुलींना** सांभाळून जेवण बनवणे किंवा घरकाम करणे यासाठी निवासी (२४ तास) प्रेमळ मदतनीस ताईची आवश्यकता आहे. साधारण वयोमर्यादा- ३५ ते ५५ वर्षे. संपर्क : ९८६९११८०१५१/८८०६६८५७१०

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र. ७५१/२०२५

श्रीम. संगिता राम निरगुडे
रा. दर्यागाव पो. पाच्छापुर — वादी
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत पाच्छापुर — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म- मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्रीम. संगिता राम निरगुडे रा. दर्यागाव पो. पाच्छापुर ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचा मुलगा कुमार राकेश राम निरगुडे याचा जन्म दि. १४/०४/२०१२ रोजी मौजे दर्यागाव पो. पाच्छापुर ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्याचा जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर राकेश राम निरगुडे त्याच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड-पाली — सही/-
दिनांक :- २४/०९/२०२५ — **उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या एन. के. एग्रो फार्म तर्फे प्रोप्रायटर केतन रसिकलाल शाह (''मालक'') यांच्या मालमत्ते संदर्भात (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) कोणताही व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगावी.

सदर मालमत्तेच्या मालकांनी आमचे अशील यांच्या सोबत सदर मालमत्ता विकण्याचा करार केलेला आहे. या करारानुसार आमचे अशील या जमिनीचे कायदेशीर हक्कदार/खरेदीदार बनले आहेत आणि या जमिनीचा संपूर्ण मोबदला मालकांना दिलेला आहे. सदर मालमत्तेवर आमचे अशीलांचा कायदेशीर मालकी हक्क प्रस्थापित झाला आहे.

त्यामुळे, या जाहीर सूचनेद्वारे सर्व सामान्य नागरिक, बँका, वित्तीय संस्था, खाजगी सावकार किंवा इतर कोणत्याही व्यक्तींना सूचित करण्यात येते की, उपरोक्त नमूद मालमत्तेसंदर्भात खरेदी-विक्री, तारण गहाण, बक्षीसपत्र आणि/किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण किंवा करार असे व्यवहार करू नये.

वरील मालमतेसंदर्भात आमचे अशिलांच्या हक्कांचे उल्लंघन करणारा कोणताही व्यवहार केल्यास, असा व्यवहार बेकायदेशीर आणि रद्दबातल मानला जाईल. तसेच, कोणताही असा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. या सूचनेकडे दुर्लक्ष करून कोणीही व्यवहार केल्यास होणाऱ्या नुकसानीस ती संबंधित व्यक्ती/संस्था पूर्णपणे जबाबदार राहील आणि कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

**अनुसूची (मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - धोकवडे, तालुका अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९१८, एकूण क्षेत्र ००.३०.१० (हे. आर. चौ. मी.) आकार ५ रु. ११ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्ध
उत्तरेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ९१७
दक्षिणेस आणि त्या दिशेने : आवास गावची हद्द
पूर्वेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग ९१३ आणि ९१४
पश्चिमेस आणि त्या दिशेने : भूमापन क्रमांक व उपविभाग १९१
ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/१०/२०२५
**ॲड. सागर विजय पाटील**
घर क्र. १६०६, लालबाग,
ब्राह्मण आळी, अलिबाग, रायगड- ४०२ २०१

## :: जाहीर नोटीस ::

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे/गाव- आदाड, ता. मुरुड, जि. रायगड गट क्रमांक व उपविभाग- ६८/२, एकुण क्षेत्र हे. आर. ०-४६-००, आकार रु. पैसे. ११-०१, लागवड- भात ही संपूर्ण मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक महादेव पद्या वाडकर यांचेकडुन आमचे अशिल यांनी रजिस्टर्ड खरेदीखताने कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

ही मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

लक्ष्मीखार, मुरुड — सही/-
ता. मुरुड-जंजिरा, — **ॲड. एम. जे. तांबडकर**
जि. रायगड, पिन कोड नं. ४०२४०१. — बी.कॉम.एल.एल.एम.
दि. ११/१०/२०२५ — ॲडव्होकेट व नोटरी

## :: जाहीर नोटीस ::

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे/गाव- आदाड, ता. मुरुड, जि. रायगड गट क्रमांक व उपविभाग- ३६/२/अ, एकुण क्षेत्र हे. आर. ०-८८-८०, आकार रु. पैसे. १६-३१, लागवड- भात या संपुर्ण मिळकतीपैकी क्षेत्र हे. आर. ०-५३-३ इतक्या क्षेत्राची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक नुरुद्दीन अ. रज्जाक लसने यांचेकडुन आमचे अशिल यांनी रजिस्टर्ड खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

ही मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

लक्ष्मीखार, मुरुड — सही/-
ता. मुरुड-जंजिरा, — **ॲड. एम. जे. तांबडकर**
जि. रायगड, पिन कोड नं. ४०२४०१. — बी.कॉम.एल.एल.एम.
दि. ११/१०/२०२५ — ॲडव्होकेट व नोटरी

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क. ७५०/२०२५

श्रीम. संगिता राम निरगुडे
रा. दर्यागाव पो. पाच्छापुर — वादी
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत पाच्छापुर — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म- मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्रीम. संगिता राम निरगुडे रा. दर्यागाव पो. पाच्छापुर ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचा मुलगा कुमार रुपेश राम निरगुडे याचा जन्म दि. ०९/०६/२०१४ रोजी मौजे दर्यागाव पो. पाच्छापुर ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्याचा जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर रुपेश राम निरगुडे त्याच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड - पाली — सही/-
दिनांक :- २४/०९/२०२५ — **उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली शेत जमिन मिळकत ही खरेदी करण्याबाबत आमचे अशिल १) श्री. प्रतिक हनुमान घरत, २) श्री. मयुरेश हनुमान घरत, दोन्ही रा. घर नं. ३६५/४ ए/पी, समर्थ नगर, खारपाडा, पो.जिते, ता. पेण, जि. रायगड यांच्यासोबत सदर जागेचा व्यवहार रजि. खरेदीखताने ठरविण्यात आलेला आहे. सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शांताराम दत्ताराम मुंढे, रा.आंबिवली, पो.कुडली, ता. रोहा, जि.रायगड यांनी अनुमती दिलेली आहे. सदरहू शेत जमीन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| आंबिवली आदिवासीवाडी | ८६ | ०.९४.००<br>पो.ख. ०.११.२०<br>एकूण १.०५.०० | ०.८२ |

वरील शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे विद्यमान मालक यांच्या मालकीचे संपूर्ण क्षेत्र १.०५.०० हे.आर.चौ.मी. (१०५ गुंठे) या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची शेत जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदर शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू शेत जमिन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

ठिकाण - पेण — अशिलांचे वकील
दिनांक ११/१०/२०२५ — **ॲड. श्री. जयंत घ. बैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड
मो.नं. ९८८१६७१४२४

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फ सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे लोणघर, ता.अलिबाग, जि.रायगड व ग्रुप ग्रामपंचायत कामार्ले हद्दीतील खालील वर्णनाची जमिन मिळकत.

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| लोणघर | २१/२ | ५.९९.०<br>पैकी ४.८०.०० | ८.४९ |

येणेप्रमाणे वर्णनाच्या लोणघर गट क्रमांक व उपविभाग २१/२ या मिळकती पैकी ४.८०.०० एकक आर.चौ.मी. क्षेत्राचे मिळकतीस चर्तु सिमा पुढील प्रमाणे. पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस :- श्री. प्रभाकर मोकल यांची मिळकत, पश्चिमेस- फॉरेस्ट, उत्तरेस :-मोहन कृष्णा पाटील, दामोदर नागु ठाकुर व मनोहर आठवले यांची मिळकत. येणे प्रमाणे चर्तु:सिमापुर्वक वर्णनाची ४.८०.०० एकक आर. चौरस मीटर इतके क्षेत्राची मिळकत, त्यातील झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक गावकरी लोक लोणघर तर्फे पंच ०१) श्री. बंडु जोमा पाटील ०२) श्री. प्रभाकर काशिनाथ वर्तक, ०३) श्री. प्रविण शांताराम ठाकुर, सर्व मु.लोणघर, पो.नारंगी, ता.अलिबाग, जि. रायगड यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालक यांनी माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी गावकरी लोक लोणघर तर्फ पंच यांचे सदरहू मिळकतीवरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग — **(ॲड.एस.वाय.बारटके)**
तारीख १०.१०.२०२५ — मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

**जाहिर सुचना**
**दिव्यांग कल्याण विभाग**

मा.अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने दिव्यांग कल्याण विभागातील सन २०२५-२०२६ करीता दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार व पुनर्वसन सेवा साहित्य पुरविणेबाबत बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र. पमपा/दिकवि/७८/२०२५
दि. ०९/१०/२०२५ — सही/-
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ८२ | एकूण क्षेत्र १-६६-९० हे.आर. | ७.२५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- ११/१०/२०२५ — **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं. १४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे वडगाव, ता. खालापुर, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. हि. नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्रीम. ताईबाई राम गडगे | २४/११ | ००-०९-४० पैकी<br>००-०९-२० हे.आर.पॉ. | ०-१२ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ११/१०/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय रामचन्द्र पाटील व इतर १९ यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै) |
|---|---|---|---|
| मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड | १०४ | जिरायत ०-५३-३०<br>वरकस ०-१६-८०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-७४-१० | १४.६१ |

अलिबाग, — **ॲड. हर्षल लक्ष्मण पाटील**
दि. ०९/१०/२०२५ — MAH/7118/2023
पत्ता : परहुरपाडा, पो.कामार्ले
ता.अलिबाग जि.रायगड
मो.८९८३६८३९५६
Email Id-patilharshal1097@gmail.com


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता.अलिबाग येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. १६६/१९०/१९६/१९७/१९८/७१, एकूण क्षेत्र ७-२०-०० आर. चौ.मी., आकार ७२.०० रू. पै. ही बिनशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.भुषण माधव भंडारे व सौ.मीना भुषण भंडारे दोघेही रा. स्वीकार नटराज सोसायटी, प्लॉट नं. ६७, गल्ली नं.३, प्रतिज्ञा कार्यालय जवळ, कर्वे नगर, पुणे ४११०५२ यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू बिनशेती मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : १०/१०/२०२५ — पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

दिनांक : ११ ऑक्टोबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) संजय रघुनाथ कांबळे<br>२) दिनेश रघुनाथ कांबळे<br>३) कैलास रघुनाथ कांबळे<br>४) अनिता रघुनाथ कांबळे<br>५)जयवंतीबाई रघुनाथ कांबळे | १९ | ४ | ०-०४-०० | ० | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — सही / -
कार्यालयीन पत्ता :-२०३ व २०४, दुसरा मजला, — **ॲड.अल्पेश अनंत कराळे**
साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक — (ॲडव्होकेट)
(अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड. — दिनांक:-११/१०/२०२५
मो.नं.९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा, मालकी वहीवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - महुरे ता.तळा जि.रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र हे आर | आकार रू.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| काशिराम वामन जाधव | २५०/१ | ०-१९-००<br>पो. ख. ०-०१-८०<br>एकुण ०-२१-२० | १.५० | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी, दावा दरखास्त मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन, भागीदारी, बक्षीस, कुळ वहिवाट, पोटगी अथवा मिळकतीबाबत वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक रहाणार नाही. हे कळावे,

दि १०/१०/२०२५ — सही/-
**ॲड.श्री पी.जी.दाभाडे**
रा फ्लॅट नं ४०२ बी विंग चौथा मजला साई नगरी
सोसायटी छत्रपती शिवाजी नगर वागळे
हॉस्पिटल जवळ रोहा, ता. रोहा, जि. रायगड
मो नं. ९२७२७१३९५६




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्च टाळावा. कलाकारांना मनाजोग्या संधी लाभतील. क्रीडा क्षेत्रात प्रगतीला वाव मिळेल.
- **वृषभ** : कार्याच्या विस्तारास अनुकूलता राहील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. महत्त्वाचे निर्णय घ्यावेत.
- **मिथुन** : वरिष्ठांशी मतभेद संभवतात. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. कुलदेवतेची उपासना करावी.
- **कर्क** : उत्साहवर्धक घटना घडतील. सार्वजनिक क्षेत्रात संधींचा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **सिंह** : कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. जोडीदाराच्या अपेक्षा समजून घ्या. गृहसजावटीकडे विशेष ओढा राहील.
- **कन्या** : अपेक्षित कामं मनाजोगी होतील. कर्ज प्रकरणं मार्गी लागतील. आर्थिक व्यवहार विचारानं करावे.
- **तूळ** : कामाचा ताण अचानक वाढेल. बोलण्यातून गैरसमज संभवतात. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : कौटुंबिक वाद-विवाद वेळीच टाळावे. प्रक्रिया उद्योगांना चालना मिळेल. वाहन काळजीनं वापरा.
- **धनु** : अनपेक्षित प्रसंग ताण निर्माण करतील. विचारानं रहायला हवं. गृह खरेदीचे बेत मार्गी लागू शकतील.
- **मकर** : छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. प्रगतीला अपेक्षित वाव मिळेल.
- **कुंभ** : आप्त-स्नेह्यांच्या भेटी होतील. प्रयत्न आणि चिकाटीतून अपेक्षित साध्य होईल. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : विवाहाची बोलणी सफल होतील. व्यवसायात नव्या संकल्पना कामी येतील. समाधानी रहाल.

मानसशास्त्र

## क्षणिक आनंद

माणसाला खर्च करताना भीती वाटत नाही; पण नंतर हिशोब लागत नाही, तेव्हा त्याचा त्रास होतो. म्हणून कोणतीही वस्तू खरेदी करताना या वस्तूची मला कितपत गरज आहे ? असा स्वत:च स्वत:ला प्रश्न विचारावा. विचार करून त्याचं उत्तर जर 'होय' आलं तरच ती वस्तू खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा. असा निर्णय घेतल्यावर त्या वस्तूचा दर्जा आणि किंमत वाजवी आहे का, याचा विचार करून मिळेल त्या किंमतीत न घेता ती वाजवी किंमतीत घेण्याचा प्रयत्न करावा. दुकानदार एक वस्तू समोर ठेवतो आणि लगेच तो दुसरी वस्तू दाखवून संभ्रमही निर्माण करतो. तेव्हा एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ती वस्तू कितीही चांगली असली, तरी तिचा आपल्या उपयोगितेशी व आनंदाशी काही संबंध नसतो. तो आनंद क्षणिक असतो. कालांतराने तो आनंद ही संपतो आणि पैसे ही जातात. म्हणून या प्रवृत्तीला आळा घालण्याची गरज आहे. पण त्यासाठी स्वत:च प्रयत्न करावा लागतो.

## ११ ऑक्टोबर

दिनविशेष

**आंतरराष्ट्रीय मुलगी दिन.**

**१९४२ :** प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता अमिताभ बच्चन यांचा जन्म.
**२००१ :** व्ही.एस.नायपॉल यांना साहित्यातील नोबेल पारितोषिक जाहीर.
**२००२ :** अभिनेत्री दीना पाठक यांचे निधन.
**२०१३ :** बंगालच्या उपसागरातील 'फायलिन' चक्रीवादळ ताशी २२० किलोमीटर वेगाने ओडिशा किनारपट्टीवरील गोपालपूरला धडकणार असल्याची माहिती.

महत्त्वपूर्ण काही...

## संदेशवहनाचा वेग

रॉकेट्सचा जनक गोडार्ड याने पहिलं रॉकेट आकाशात सोडलं तेव्हा ते कसं जात आहे, कुठे पडणार आहे याचा मागोवा चक्क दुर्बिणीतून घेतला गेला होता. त्यातही उंच गेलेलं रॉकेट शोधणं दिवसाउजेडीही कठीण जात होतं. १९५७ मध्ये पहिला उपग्रह अवकाशात गेला; पण त्याची कक्षा पृथ्वीच्या दुसऱ्या बाजुस गेल्यावर त्याच्याशी संपर्क तुटत असे. १९६० मध्ये यावर तोडगा म्हणून अमेरिका आणि रशियाने आपापल्या मित्र राष्ट्रांमध्ये संदेशग्रहणकेंद्रं उभारली. या विविध केंद्रांतून उपग्रहांवर लक्ष ठेवणं शक्य होऊ लागलं. रिले शर्यतीतील तंत्राप्रमाणे उपग्रहांवर लक्ष ठेवलं जाता असे. या तुलनेत आजची परिस्थिती अनेक योजनं पुढची आहे. उड्डाणानंतरचा अर्धा मिनिट आणि अवकाशयान उतरतानाची चार मिनिटे सोडली तर यानाचा मुख्य केंद्राशी सततचा थेट संपर्क असतो. व्हॉयेजर दोनने आता सूर्यमालेबाहेरील अवकाशात प्रवास सुरू केला आहे, पण त्याचे संदेश सतत ग्रहण केले जात आहेत. अजून कमीत कमी २५ वर्षे त्याच्याकडून संदेश मिळणार आहेत.

### पंचांग

**शनिवार ११ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
अश्विन कृष्ण ५, चंद्रराशी : वृषभ,
योग : व्यतिपात, नक्षत्र : रोहिणी
सूर्योदय : ६.३४, सूर्यास्त : ६.१७

### फॉरवर्डस

**हमें लोग़ भलें ही पसंद नां करें...**

**लेक़िन नज़र वों हम पऱ हीं ऱखतें हैं...!**

आरोग्यमंत्र

## जलनेती

अंतर्गत स्वच्छतेसाठी जलनेतीचा खूप चांगला उपयोग होतो. १ लीटर पाण्यामध्ये १० ग्रॅम सैंधव मीठ मिसळावं. हे पाणी कोमट करावं आणि त्यात मीठ चांगलं विरघळून घ्यावं. 'जलनेती' पात्र असल्यास ते त्यात भरावं. पण ते पात्र नसेल तर हात स्वच्छ धुवून उजव्या हाताच्या ओंजळीत पाणी घ्यावं. मान थोडी उजव्या बाजूला वळवावी या नाकपुडीतून पाणी आत ओढून घ्यावं.



उजव्या नाकपुडीने श्वास आत घेताना पाणीदेखील नाकात घ्यावं. या वेळी तोंड उघडं ठेवावं म्हणजे तोंडाने थोडा श्वास घेता येईल. हळूहळू उजव्या नाकपुडीत पाणी ओतत रहावं. हे पाणी डाव्या नाकपुडीतून आपोआपच बाहेर पडेल. आता हा प्रयोग पुन्हा डाव्या नाकपुडीने करावा. जलनेती केल्यानंतर कपालभातीदेखील अवश्य करावं. यामुळे नाकात अडकून राहिलेलं पाणी बाहेर पडण्यास मदत होते. जलनेतीमुळे श्वसनसंस्थेच्या क्रियेत सुधारणा होते. नाकात आणि घशात अडकलेले बारीक बारीक धूलिकण निघून जाण्यासाठी मदत होते. डोळ्याचे कार्य सुधारते. प्रत्येक बाजूला २ ते ३ वेळा याप्रमाणे जलनेती करावी. जलनेती केल्यावर लगेच पाणी पिऊ नये. फॅनखाली बसू नये. त्यानंतर अर्धा तास झोपण टाळावं. ज्यांचा डोळ्यांचा नंबर ४ ते ५ पेक्षा अधिक आहे त्यांनी जलनेती करू नये. तसंच ज्यांना सर्दी झाली आहे आणि त्यामुळे नाक बंद आहे त्यांनी जलनेती टाळावी.

### माईंड गेम

मानवी मेंदूला गुंगारा देता येतो, भुरळ घालता येते हे अनेकांनी सिद्ध केलं आहे. आता हेच बघा ना. वस्तूची किंमत १०० ऐवजी ९९ ठेवली तर ग्राहकवर्ग वाढतो हे लक्षात आल्यामुळेच जगभर ९ टू ९ पठडीतल्या दुकानांचा व्यवसाय विस्तारला आहे. ९,९९,९९९,९९९९ सारख्या किमती असणाऱ्या वस्तूंची विक्री पूर्ण रकमेच्या तुलनेत २४ टक्क्याने वाढते असं एका अभ्यासात स्पष्ट झालं आहे. एका रुपयाने फारसा फरक पडत नाही. पण हा माईंड गेम व्यवसायाला बरकत मात्र मिळवून देतो.

करिअरवाटा

## योग्य पर्याय निवडा

कारकिर्दीची नवनवीन क्षेत्रं खुली होताना त्यात विपुल संधी निर्माण होत आहेत. मात्र तिथपर्यंत पोहोचण्याचे मुख्य मार्ग दोन आहेत. ते म्हणजे प्रोफेशनल आणि ॲकॅडमिक कोर्स. या दोन्ही मार्गांनी एकच लक्ष्य गाठता येत असलं तरी काहींच्या मते बी-टेक, एमबीए, बीसीए, एमसीए, बी-फार्म, मास कम्युनिकेशन यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमानंतर मिळणाऱ्या संधींच्या सहाय्यानं कारकिर्दीत मोठं यश मिळवता येतं. याचं महत्त्वाचं कारण या अभ्यासक्रमानंतर लगेच नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. तातडीने नोकरी मिळण्याच्या दृष्टीने व्यावसायिक अभ्यासक्रम ठीक आहेत. परंतु नोकरीतील स्थैर्य तसंच अधिक कालावधीच्या यशाचा विचार करताना ॲकॅडमिक अभ्यासक्रमाचा पर्याय लक्षात घ्यायलाच हवा. आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाचा परिणाम म्हणून उद्योगक्षेत्रातही अनेक बदल झाले. साहजिक उद्योगक्षेत्राचा विस्तार झाला आणि या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासू लागली. आताही व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना याचा फायदा होत आहे. या क्षेत्रात दोन ते चार वर्षांच्या कालावधीतील अभ्यासक्रम पूर्ण करून चांगली नोकरी मिळणं शक्य आहे.



### खेचाखेची

सकाळी सकाळी गॅलरीत चिमणाचिमणीचं एक जोडपं चिवचिव करत होतं. चिमणी चोचीत कडी घेऊन चिवचिवत होती. तेवढ्यात बायको चहा घेऊन आली. मी जनरलच विचारलं, ती चिमणी त्या चिमण्याशी काय बोलत असेल ?

बायको म्हणाली, चोचीत कडी धरून ती चिमण्याला म्हणत असेल, की चिमण्या तू घरात या काडीइतकंही काम करत नाहीस. हल्ली जनरल गप्पा मारायची पण सोय उरली नाही.

### वेगळं काही

जपानमधल्या शाळांमध्येही विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिलं जातं. या शाळांमध्ये आहारतज्ज्ञांची नेमणूक केलेली असते. हे तज्ज्ञ मुलांच्या गरजा ओळखून स्वयंपाक करणाऱ्यांना सल्ले देतात. शाळेतले सर्व विद्यार्थी वर्गात बसून भोजन करतात. जेवण वाढण्याचं काम विद्यार्थ्यांनाच दिलं जातं. आठवड्यातून एकदा शिक्षक आणि विद्यार्थी मिळून स्वयंपाक करतात. स्वयंपाक करताना त्यांना टोपी आणि ॲप्रन घालावा लागतो. इथल्या विद्यार्थ्यांना खाण्यातल्या पोषक घटकांची माहिती दिली जाते. प्रत्येक पोषक घटक शरीरासाठी कसा उपयोगी आहे हेही सांगितलं जातं. यामुळे मुलं आवडीने जेवण जेवतात. इथल्या विद्यार्थ्यांना बाहेरून जेवण घेऊन यायची परवानगी नाही.

अर्थभान

## गुंतवणुकीचे सुकर पर्याय

गुंतवणूक हा भविष्याचा आधार असतो. तुम्हीही आयुष्याला खंबीर अर्थआधार देऊ इच्छित असाल तर काही बाबींची दखल घ्या.



✻ २५ ते ३५ वयोगटातल्या युवती एकीकडे नोकरी तर दुसरीकडे लग्नाच्या लगबगीत असतात. या वयोगटातल्या महिला दीर्घकाळासाठी गुंतवणूक करू शकतात. पगारातली थोडी रक्कम बाजूला ठेऊन गुंतवणूक करता येईल. पंचविसाव्या वर्षी गुंतवणुकीला सुरूवात केली तर साठीपर्यंत भरपूर निधी साठू शकेल. ✻ ३५ ते ५० वयोगटातल्या महिला करीअर आणि कौटुंबिक पातळीवरही स्थिरस्थावर झालेल्या असतात. मुलांची जबाबदारी असते. मुलांचं शिक्षण, लग्न यासाठी पैशांची गरज असते. या वयातल्या महिला सोनं, लाँग टर्म बॉंड्स, शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकतात. बँकेतल्या मुदत ठेवींचा पर्यायही आहे. गुंतवणुकीतला ५० टक्के भाग इक्विटीत गुंतवता येईल. ३० टक्के रक्कम म्युच्युअल फंडांमध्ये तर उर्वरित रक्कम सुरक्षित पर्यायांमध्ये गुंतवता येईल. ✻ नोकरदार महिला सोन्यात गुंतवणूक करू शकतात. गोल्ड बॉंड तसंच इतर सरकारी योजनांमध्ये गुंतवणूक करता येईल. ✻ आरोग्य तसंच जीवन विम्याचा पर्यायही तुमच्याकडे आहे.

## सुडोकू १५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ८ | ६ |
| ७ | ६ | | ४ | | ३ | १ | | ९ |
| | | | १ | ६ | ८ | ३ | ७ | २ |
| ९ | ४ | | | | ६ | | | ८ |
| ६ | | | | ३ | | | | ४ |
| ८ | | | ९ | | | | ३ | १ |
| १ | २ | ६ | ३ | ९ | ७ | | | |
| ३ | | ४ | २ | | १ | | ६ | ७ |
| ५ | ७ | | | | | | | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ५ | ८ | ९ | ३ | २ | ४ | १ | ६ |
| ३ | १ | ४ | ६ | ८ | ५ | ९ | २ | ७ |
| २ | ९ | ६ | ७ | १ | ४ | ५ | ३ | ८ |
| ५ | २ | ७ | ८ | ६ | ३ | १ | ४ | ९ |
| ८ | ४ | ३ | ५ | ९ | १ | ६ | ७ | २ |
| ९ | ६ | १ | २ | ४ | ७ | ३ | ८ | ५ |
| १ | ७ | ५ | ३ | २ | ६ | ८ | ९ | ४ |
| ४ | ८ | २ | १ | ५ | ९ | ७ | ६ | ३ |
| ६ | ३ | ९ | ४ | ७ | ८ | २ | ५ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १५

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | १० |
| ११ | | | ■ | | ■ | १२ | | | ■ | १३ | | ■ | १४ | |
| | ■ | ■ | १५ | | १६ | | ■ | ■ | १७ | | ■ | १८ | | ■ |
| १९ | २० | | ■ | ■ | | ■ | २१ | २२ | | ■ | ■ | २३ | | २४ |
| २५ | | ■ | २६ | | २७ | | ■ | | ■ | २८ | २९ | ■ | ■ | |
| | ■ | ३० | | ■ | ३१ | | ■ | | ■ | ३२ | | ■ | ३३ | |
| ■ | ३४ | | | ■ | ■ | ३५ | ३६ | ■ | ३७ | | ■ | ३८ | | ■ |
| ३९ | ■ | | ■ | ४० | | ■ | ४१ | ४२ | | ■ | ४३ | | | ४४ |
| ४५ | ४६ | ■ | ४७ | | ■ | ४८ | ■ | | ■ | ४९ | ■ | | ■ | |
| ५० | | ५१ | | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | | ■ | ५५ | |
| ■ | ■ | | ■ | ५६ | | | | ■ | ५७ | | ■ | ५८ | ■ | |
| ५९ | | ६० | ६१ | | ■ | | ■ | ६२ | | ■ | ६३ | | ■ | ■ |
| ६४ | ६५ | ■ | | ■ | ६६ | | ■ | | ■ | ६७ | | ■ | ६८ | ६९ |
| ■ | ७० | ७१ | | ■ | ■ | ७२ | | | | ■ | ७३ | ७४ | ■ | |
| ७५ | | | ■ | ७६ | | ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ७७ | | |

**आडवे शब्द :-**
१) आयातकर
४) वंदनीय
५) वर्षाव, भडीमार
७) हिशोबातील खर्चाच्या विरुद्धची
९) रममाण
११) ✻✻✻ बिलावल संगीतातील एक राग
१२) बालकाच्या डोक्यावरील जन्मजात केस
१३) व्याघ्र
१४) उपहास, चेष्टा
१५) खणणे
१७) वर्ष, साल
१८) चबुतरा
१९) योग्य, उचित
२१) उपयोग
२३) पडदा
२५) तुरुंग
२६) इंद्राचा हत्ती
२८) कुंभाराची भट्टी
३०) गाढव
३१) लक्ष्मीचे एक नाव
३२) स्तुती करणारा
३३) वजन
३४) उजाड, ओसाड, निर्जन
३५) वेल
३७) वेळ, यम
३८) बाई
४०) फक्त, केवळ
४१) होडी, सैन्याचा तळ
४३) अटीची भाषा
४५) फळावरील आवरण
४७) कपोल
५०) नवारीने बाज विणणे
५२) म गांधीजींचे अखेरचे शब्द
५४) सहाय्य
५५) श्वसनेंद्रिय
५६) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) जंगल
६०) ललाट
६२) माल साठविणे
६३) स्वामी, पती
६४) गंध
६६) नवा, न वापरलेला
६७) एक रत्न
६८) द्रव पदार्थ
७०) एक सुगंधी वनस्पती

**उभे शब्द :-**
१) जयाचा नामघोष
२) कार्य
३) शरीर
४) फसव्या
५) जादू, भ्रम
६) एक ज्वालाग्रही पदार्थ
७) भारतीय सैनिक
८) एक मराठी महिना
९) भात शिजताना होणारा आवाज
१०) जरच्या बरोबरचा शब्द
१२) गमन करणे
१६) रमापती
१७) पावसाची धार
१८) पातक
२०) आश्रय
२२) मान्य, आवडलेला
२४) सैन्यदल
२६) लोहाराकडचे एक साधन
२७) मसाल्यातील एक पान
२८) नभ
२९) मार्ग, रस्ता
३०) बाईट, नासलेला
३३) हिंदुस्थान
३६) ज्वर
३७) गेरु
३८) कळलाव्या मुनी
३९) सोपे, सहज जमण्यासारखे (हिं, )
४०) सामान
४२) वाम
४४) समुद्र
४६) सत्ता
४७) गीत
४८) बेडकांचे ओरडणे
४९) कामदेव
५१) धोबी
५२) परराष्ट्रात गुप्त बातम्या काढणारा
५३) अभिप्राय
५४) आचार्य अत्रे यांच्या दैनिकाचे नाव
५६) अचानक उठणारी वेदनेची उसळी
५८) संगत
५९) लबाडीचा हेतू
६१) कबूतर
६२) पुण्याजवळचे आ, अत्रे यांचे जन्मगाव
६३) निराश, नाखूष
६५) युद्ध
६९) फुरसत
७१) दारुचा एक प्रकार
७४) बारीक केस

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | ग | म | र | व | र | ■ | सा | रा | सा | र | ■ | अं | ग | ■ |
| ता | जा | ■ | ■ | न | ग | रा | ध्य | क्ष | ■ | ज | रा | बा | ज | रा |
| प | न | व | ती | ■ | त | म | ■ | स | प | क | ■ | बा | ■ | वा |
| ज | न | न | ■ | पा | ■ | रा | स | ■ | र | ■ | पा | ई | क | ■ |
| न | ■ | स | म | र्थ | रा | म | दा | स | स्वा | मी | ■ | ■ | म | स्त |
| क | स | र | त | ■ | जा | ■ | चा | ■ | धी | ■ | प | र | त | ■ |
| ■ | रा | णी | ■ | धा | ■ | प | र | वा | न | गी | ■ | त | र | ट |
| आ | ई | ■ | भा | गा | का | र | ■ | र्ता | ■ | त | प | ■ | ता | र |
| रा | त | सा | र | ■ | न | वा | र | ■ | अ | का | र | ण | ■ | फ |
| म | ■ | म | त | दा | न | ■ | म | हा | भा | र | त | ■ | पा | ल |
| ■ | ना | ना | ■ | स्य | ■ | ट | ■ | र | वि | ■ | प | र्व | त | ■ |
| न | र | वी | र | ■ | सा | व | ट | ■ | क | द | र | ■ | क | प |
| ख | ■ | र | ज | त | प | ट | ■ | पं | ■ | र | त | न | ■ | ला |
| क्ष | मा | ■ | नी | ■ | ■ | वी | र | ग | ती | ■ | ■ | व | ल | य |
| त | मा | शा | ■ | आ | या | त | ■ | त | र | फ | दा | री | ■ | न |



# कलासक्त



## शोमन राजकपूर आणि रविन्द्र जैन यांचे ऋणानुबंध

**श्रीराम शेटये**

भारतातले सर्वश्रेष्ठ शोमन राज कपूर आणि संगीतकार रविन्द्र जैन यांचे भारतीय चित्रपटसृष्टीला फार मोठे योगदान आहे. ''जर मी गंगा मैली म्हटली तर लोक मला माफ करणार नाहीत. कारण मीच 'जिस देश में गंगा बहती है' नावाचा चित्रपट बनवला आहे.'' राज कपूर यांनी एकदा संगीत दिग्दर्शक रवींद्र जैन यांना सांगितले. जैन यांनी त्यांना सांगितले, ''राज साहेब, मी 'राम तेरी गंगा मैली' या शीर्षकाला न्याय देण्याची जबाबदारी घेतो.'' त्यानंतर, रवींद्र जैन यांनी राज कपूरसाठी एक कोरस ओळ गायली. ती कोरस काय होती आणि रवींद्र जैन यांनी ती कशी न्यायची ते आपल्याला कळेल. पण सध्या आपल्या कथेला थोडे मागे घ्यावे लागेल. ते १९७५ चे वर्ष होते. रवींद्र जैन राज कपूर यांना भेटले होते. राज कपूरसोबतची ही त्यांची ही काही पहिलीच भेट नव्हती. पण १९७५ वर लक्ष केंद्रित करूया. रवींद्र जैन ''दो जासूस'' चित्रपटासाठी संगीत देत होते.



रवींद्र जैन यांनी काही गाणी तयार केली होती आणि ती राज कपूरसाठी गायली होती. राजेंद्र कुमार यांनी ''दो जासूस'' मध्ये राज कपूरसोबतही काम केले होते. तेच रवींद्र जैन यांना त्यांच्यासोबत राज कपूरच्याआरकेस्टुडिओमध्येघेऊन गेले होते. तिथे, रवींद्र जैन यांनी राज कपूर यांना गाणी वाजवली. राज कपूर यांना ती सर्व आवडली. ते म्हणाले, ''गाणी खूप छान रचली आहेत. ती रेकॉर्ड करा.'' त्यानंतर, रवींद्र जैन यांनी राज कपूर यांच्याशी फोनवर बोलण्यास सुरुवात केली. रवींद्र जैन त्यांना त्यांच्या एका चित्रपटासाठी संगीत देण्याची संधी देण्यास सांगायचे. राज कपूर म्हणायचे, ''जेव्हा जेव्हा माझ्याकडे तुमच्या योग्य काही काम असेल तेव्हा मी स्वतः तुमच्याकडे येईन.'' काही महिन्यांनंतर, दिल्लीत एक लग्न झाले. यजमान राज कपूर आणि रवींद्र जैन यांचे मित्र होते. याचा अर्थ ते दोघेही पाहुणे होते. ते एका मित्राच्या मुलीचे लग्न होते. लग्नात एक संगीत कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता. रवींद्र जैन यांनी कार्यक्रमात एक गाणे गायले. त्यांनी हे गाणे खूप पूर्वी लिहिले होते. त्याचे बोल होते ''एक राधा एक मीरा.'' लग्नाचा कार्यक्रम तीन दिवस चालला. राज कपूर आणि रवींद्र जैन तिन्ही दिवस भेटले. रवींद्र जैन यांच्या पत्नी दिव्या देखील त्यांच्यासोबत होत्या. एका वेळी राज कपूर यांनी दिव्या यांना विचारले की त्यांनी हे गाणे दुसऱ्या कोणाला देण्याची चर्चा केली आहे का. रवींद्र जैन यांना हे देखील कळले की राज कपूर या गाण्याबद्दल विचारपूस करत आहेत.



रवींद्र जैन यांना आश्चर्य वाटले की राज कपूर या एका गाण्याचे काय करतील. त्यांनी राज कपूर यांना सांगितले की त्यांनी अद्याप याबद्दल कोणाशीही बोललेले नाही. राज कपूर यांनी लगेच रवींद्र जैन यांना दीड रुपये ॲडव्हान्स दिले आणि म्हणाले, ''हे गाणे माझे आहे. ते माझ्यासाठी ठेवा.'' एके दिवशी, मुंबईला परतल्यानंतर, राज कपूर यांनी रवींद्र जैन यांना सांगितले की, ते पुण्यात त्यांच्या वाढदिवसाची पार्टी करणार आहेत. त्यांनी जैन यांना उपस्थित राहण्याचे आमंत्रणही दिले. जैन यांना वाटले की राज कपूर त्यांच्या कामाबद्दल तिथे चर्चा करतील. ते त्यांच्या पत्नी दिव्या जैन यांच्यासोबत राज कपूरच्या पार्टीला उपस्थित राहण्यासाठी पुण्याला गेले होते. तथापि, जैन यांनी त्यांच्यासोबत त्यांच्या कामाबद्दल चर्चा केली नाही. दुसऱ्या दिवशी, राज कपूर आणि जैन एकत्र चहा घेत असताना, राज कपूर जैन यांना म्हणाले, ''माझ्याकडे अजून कथा नाही. पण माझ्याकडे एक छोटीशी कल्पना आहे.

तोतापुरी महाराजांनी रामकृष्ण परम हंसांना टोमणे मारत म्हटले, 'राम, तुमची गंगा मैली आहे.' मला त्या शीर्षकाचा 'राम तेरी गंगा मैली' चित्रपट बनवायचा आहे. पण मी ते कसे न्याय्य ठरवू शकतो? मी आधीच 'जिस देश में गंगा बहती है' नावाचा चित्रपट बनवला आहे. जर मी आता गंगा मैली म्हटले तर लोक मला माफ करणार नाहीत. राज कपूरची परिस्थिती समजून घेत रवींद्र जैन यांनी त्यांना सांगितले, ''मी राम तेरी गंगा मैली या शीर्षकाचे न्याय्य ठरवण्याची जबाबदारी घेतो.'' रवींद्र जैन यांनी राज कपूर यांना पूर्ण आत्मविश्वासाने हे सांगितले. आणि त्यांना आत्मविश्वास वाटला कारण त्याच क्षणी त्यांच्या मनात एक 'मुखडा' आधीच आला होता. ''गंगा हमारी कहे रोते रोते। राम तेरी गंगा मैली हो गयी पापियो के पाप धोते धोते।'' त्यांनी तिथेच राज कपूर यांना हा मुखडा ऐकवला. हा मुखडा राज कपूर यांना हा एवढा आवडला की ते लगेच खुर्चीवरून उभे राहिले आणि रवींद्र जैन यांना मिठी मारली आणि म्हणाले, ''मला माझ्या समस्येचे समाधान सापडले आहे.''

राज कपूर यांच्या मनात ते गाणे देखील होते जे त्यांनी रवींद्र जैन यांना दिल्लीत त्यांच्यासाठी ठेवण्यास सांगितले होते, त्यांना एक चतुर्थांश रुपये ॲडव्हान्स देऊन. तेच गाणे, ''एक राधा एक मीरा'' असे बोल होते. राज कपूर यांनी ''राम तेरी गंगा मैली'' च्या क्लायमॅक्समध्ये हे गाणे वापरण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे राज कपूर यांनी ''राम तेरी गंगा मैली'' साठी संगीत तयार करण्याची जबाबदारी रवींद्र जैन यांना सोपवली. चित्रपटाचे बोल लिहिण्याची जबाबदारीही रवींद्र जैन यांना देण्यात आली. त्यांनी चित्रपटाची सर्व गाणी लिहिली, एक वगळता. रवींद्र जैन यांनी लिहिलेले एक गाणे ''सुन साईबा सुन. प्यार की धुन'' हे नव्हते. ते गाणे हसरत जयपुरी यांनी लिहिले होते. ९ ऑक्टोंबर ही रवींद्र जैन यांची पुण्यतिथी आहे. त्यांचे ९ ऑक्टोबर रोजी निधन झाले. रवींद्र जैन यांची कारकीर्द उल्लेखनीय होती. चित्रपटसृष्टी त्यांच्या प्रतिभेच्या असंख्य उदाहरणांनी भरलेले होते. **

## बंगलोरचा अनुभव

**वर्षा कुवळेकर**

एकदोन दिवसांच्या सहली अनेक झाल्या. पुणे लोणावळा, कोल्हापूर, श्रीवर्धन, महाबळेश्वर, मोराची चिंचोली, गोवा इत्यादी यशस्वी सहलींनंतर सख्या आता जरा लांबच्या आणि जास्त मुक्कामाच्या ट्रिप बाबत सिरीयसली विचार करू लागल्या.

वेगवेगळे पर्याय प्रत्येकजण सुचवू लागली. कोस्टल कर्नाटक, उटी, दार्जिलिंग.....बरेच ऊहापोह झाले. कोणी तिकडे जाऊन आली आधीच तर कोणाचे नको बाई तिथे अशी सगळी चर्चा घडलीच. साऊथ इंडिया या डेस्टिनेशनवर अखेर शिक्कामोर्तब झाले.

आता दक्षिण भारत म्हणजे कुठे? कोणाबरोबर? मुद्दे होतेच. आम्ही नेहमी सात जणी इनोव्हा गाडीतूनच सामानसुमानसकट फिरत असतो. त्यामुळे जरी आता मोठी टूर असली तरी आपले आपणच असावे, मोठ्या ग्रुप बरोबर नसावी. सहल ही आमची प्राथमिक गरज होती. आमच्यातील दोघी आराधना ट्रॅव्हल्स बरोबर ट्रिपच्या अनुभवाबाबत समाधानी होत्या. मग त्यांनाच विचारणा करावी असे ठरले. त्यांच्या बरोबर सविस्तर चर्चा करून ''अशी आठ दिवसांची आमची ट्रिप फायनल झाली. हुर्यो!!''

आता घरची आघाडी. दोन दिवसांची भ्रमंती सख्यांच्या घरांच्या अंगवळणी पडली होती. आता यावेळी पल्ला मोठा होता. दोघी मैत्रिणींना जरा प्रश्न निर्माण झाले आणि त्यांनी माघार घेतली, मात्र उर्वरित मैत्रिणींना बजावले की, ''आम्हाला जमत नाहीये, पण तुम्ही कॅन्सल करू नका. आम्ही इथून रोज तुमच्या डोळ्यातून बघू.''अवघड होते पण सगळ्या सहमत झाल्या.रविवार ते रविवारचा संपूर्ण आठवडा विचारपूर्वक कार्यक्रम ठरला. मुंबईहून विमानाने बंगलोरला जायचे , तिथे इनोव्हा कार आम्हाला घ्यायला येईल. ती कार पुढील रविवारी परत बंगलोर एअरपोर्टवर आम्हाला सोडेल, तोवर आमच्या दिमतीला असणार होती. जाताना विमानाची वेळ सकाळी लवकर असल्याने आमच्या एका सखीने प्रस्ताव ठेवला की, अलिबागहून पहाटे अति लवकर निघण्यापेक्षा आदल्या दिवशीच माझ्या मुंबईच्या घरी जाऊन राहूया. एकमताने ठराव पास झाला आणि शनिवारपासूनच आमची सहल सुरू झाली.

काय वर्णावा तो उत्साह! चार दिवस आधी खास मीटिंग, बरोबर काय काय घ्यायचं, ड्रेसेस किती, कोणते, बॅग कशी, किती मोठी घ्यावी, गाडीत सामान मावेल का याची काळजी, असे सगळे विषय झाले. यावेळी उगीच खाण्याचे ढीगभर पदार्थ बरोबर आटापिटा करून घ्यायचे नाहीत. आपण स्वतंत्रपणे फिरणार आहोत. वाटेल तिथे थांबू शकतो, तिथे मिळेल ते एन्जॉय करायचे हेही निश्चित झाले. पाच जिवाभावाच्या मैत्रिणी जीवाचे कर्नाटक करायला बाहेर पडल्या.

निघताना एकीच्या सुनेने सांगितले, ''मावश्यांनो जरा वय लक्षात ठेवा. तसेच वागा बरं का. उगाच उड्या मारू नका. आम्ही नाही आहोत तुमच्याजवळ.'' यावर सगळ्यांनी, ''काही होत नाही आम्हाला, काळजीच नको'' सुनावलेच. मजा केली, काळजी समजली होतीच.



तर अशी अत्यंत उत्साहात आमची भ्रमंती सुरू झाली. मुंबईला निघालो आणि त्याच सुनेचा फोन, ''अग, विसरलीस की घरी. आता? पाय दुखतील ना चालताना.''

''हो का? घेऊन टाकीन मुंबईला दुसरे.'' सासूचे प्रॉम्प्ट उत्तर.

खरंच तत्परतेने ती खरेदी झाली. बाकी कोणाची औषधे राहिलीत का? याची शहानिशा आणि पूर्तता झाली. नेहमीप्रमाणे गप्पांचे सत्र गाडीत बसल्यापासूनच सुरू झाले होते. मनपसंद जेवणानंतर मात्र आज रात्री लवकर झोपू, आहेत आता आठ दिवस बडबड करायला असे ठरवून वेळेवर गादीवर आडव्या झालो. अर्थात बराच वेळ खुसुरफुसुर होतेच चाललेले. त्याला आमचा काही इलाजच नसतो. अगदी मुंबई ते बंगलोर विमान प्रवासात सुद्धा शेजारी एक अपरिचित बसला तरी गप्पा अखंड सुरू राहिल्या.

बंगलोरला उतरलो. ड्रायव्हर श्रीनिवास, एक प्रथमदर्शनीच सज्जन वाटणारे पन्नाशीचे गृहस्थ स्वागतास हजर होते. आमची इथून पुढे आठवडाभर साथ देणारी गाडी अतिशय उत्तम स्थितीत आहे हे लक्षात आले आणि मनोमन हुश्श केले. आमच्या सगळ्या बॅगा नेटकेपणे गाडीत रचल्या गेल्या तेव्हा एक मोठी काळजी मिटली म्हणायला हरकत नाही. सामान लावून झाल्यावर श्रीनिवास म्हणाले, ''मॅडम, एक मिनिट, आप जरा आगे आइये न.''दोघीजणी गेल्या. एक छानसे गिफ्ट हॅम्पर देऊन, ''आपका स्वागत है, मैं श्रीनिवास आपके साथ रहनेवाला हूँ.'' अशी त्यांनी मस्त सुरुवात करून दिली. गाडीत बसून निघालो. आम्हाला वाटले होते आधी हॉटेलवर जाऊन फ्रेश होऊ मग आजची टूर. पण श्रीनिवास यांनी बंगलोर ट्रॅफिक, आजच्या स्थळांची अंतरे, लागणारा वेळ, वेळेची मर्यादा सगळे सांगून आपण असेच स्थलदर्शनाला निघणार आहोत हे सांगितले. गाडी सुरू झाल्यावर त्यांना आम्ही आमची सहलीची कल्पना आधी समजावून दिली. ''देखो हम कहीं भी आपको रुकनेको बोलेंगे. कोई अच्छी जगह, खेत, फूलपौधे कुछ भी दिखाई देगा तो रुकेंगे. फोटो निकालेंगे फिर आगे जाएंगे. ठीक हैं ना?''

'' जी मॅडम'' शिवाय त्यांना पर्याय नव्हताच.

प्रथम ''नंदी हिल'' या ठिकाणी गेलो. बंगलोर पासून जवळ उंचावर असलेले हे ठिकाण तिथे सूर्योदय पाहण्यासाठी पर्यटक जातात. आम्ही माध्यान्हीचा सूर्य पाहणार होतो. वरवर चढत जाताना मधेच एक मंदिर लागले. ''हे जरूर बघा'', श्रीनिवास म्हणाले. अगदी रस्त्यालगत असलेले ते देऊळ. आत अनेक देवांच्या मूर्ती आहेत पण मुख्य आकर्षण नंदीची खूप मोठी मूर्ती. दर्शन घेऊन वरती गेलो. पाऊस साथीला होताच. वरती खूपच रम्य परिसर आणि शिवमंदिर. व्ह्यू पॉइंट्स होते. भर डोक्यावर असणारा सूर्य पाहायला त्यांची गरज नव्हती . पण हलका पाऊस, हलके धुके, गार हवा आणि मस्त वातावरण. झकास सुरुवात. आता पोटात कावळे जागे झाले होते. वाटेतील ठिकठाक हॉटेलात पोटपूजा करून त्यादिवशीचे दुसरे आकर्षण ईशा फाउंडेशनचे शिवदर्शन होते तिकडे निघालो.

प्रसिद्ध स्वामी श्री सद्गुरू यांची निर्मिती मानले जाणारे हे शिव स्थान कमालीचे सुंदर आहे. मुळात शंकर भगवान हे सहजसोपे दर्शन देत नाहीत. ते कोणत्यातरी गडावर जाऊन बसणे पसंत करतात. आम्ही निघालो ते स्थान शेकडो एकर जमिनीवर मागे डोंगराच्या पार्श्वभूमीवर निर्मिले आहे. जितका भव्य निसर्गाचा पट त्याला शोभेशी अतिशय भव्य श्री शंभूंची मूर्ती. मान वाकडी करूनच पाहावे लागते इतकी मोठी आणि अतिशयच लोभस मूर्ती. शंभू महादेव तसे कोपिष्ट म्हणून प्रसिद्धच. भोळे ही तेव्हढेच. सद्गुरूंनी जी मूर्ती निर्माण करून घेतली आहे तिच्या चेहऱ्यावरील भाव फारच मोहक आहेत, देखणा चेहरा. भव्यता अगडबंब न वाटता अलगद मनात उतरते. आपण गुंतून जातो त्यात. खूप आवडली मला ही शिव प्रतिमा.

सद्गुरुंचे तरुण, सुशिक्षित अनुयायी दर्शनास आलेल्या मंडळीच्या सेवेत तत्पर होते. मन प्रसन्न आणि भक्तिमय करणारे ते वातावरण. शिवाचा त्रिशूळ सुद्धा तितकाच मोठा, नागदेवता ही तितकीच सुस्पष्ट. छान वाटले खूप.

दिवसभर पहाटेपासून फिरलो, आता पाय पसरून बसावे वाटू लागले. संध्याकाळी हॉटेलवर पोहोचून थकलेल्या शरीराला आराम दिला. सकाळी लवकर निघायचे होतेच. **

# अभिनेता गणपत पाटील 'आत्ता ग बया!'

रंगबहार

**शरद कोरडे**

**तमाशापटांतील 'मावशी' वा 'नाच्या' म्हटले की, कायम गणपत पाटीलांची प्रतिमा डोळ्यासमोर येते. गणपत पाटलांचा जन्म २० ऑगस्ट १९२० साली कोल्हापुरांतील एक गरीब शेतकऱ्यांच्या कुटूंबांत झाला. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे व लहानपणीच वडीलांचा मृत्यू झाल्यामुळे लहानपणापासूनच त्यांना मोलमजुरी करणे, फळे फुले विकून कुटूंबाला आर्थिक सहाय्य करण्याची पाळी त्यांच्यावर आली. इतके असले तरी कोल्हापुरांत त्यावेळी रामायणाच्या खेळांत ते सहभागी होऊन लहानमोठ्या भूमिका करीत.**



मराठी चित्रपटांत कायम तमाशांतील नाच्याचे काम करणारे व नर्तकसांच्या कायम आजूबाजूस राहून त्यांच्या वर्तनावर व विनोदी टिप्पण्या करून टाळ्या वाजविण्याचे काम करणारे व अर्धनारी स्वरूपांत वावरून 'मावशी' झालेले गणपतराव पाटील गेली अनेक वर्षे आपण मराठी चित्रपटांत व लोकनाट्यांत पहात आलो आहोत. चित्रपटांत कोणताही प्रसंग आला की, त्यांचे 'आत्ता ग बया' ही प्रतिक्रिया कायम असे. त्यांच्या संवादाची सुरूवात कायम या टॅग लाईनने व्हायची. त्यामुळे चित्रपटांतील वा तमाशापटांतील 'मावशी' वा 'नाच्या' म्हटले की, कायम गणपत पाटीलांची प्रतिमा डोळ्यासमोर येते. गणपत पाटलांचा जन्म २० ऑगस्ट १९२० साली कोल्हापुरांतील एक गरीब शेतकऱ्यांच्या कुटूंबांत झाला. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे व लहानपणीच वडीलांचा मृत्यू झाल्यामुळे लहानपणापासूनच त्यांना मोलमजुरी करणे, फळे फुले विकून कुटूंबाला आर्थिक सहाय्य करण्याची पाळी त्यांच्यावर आली. इतके असले तरी कोल्हापुरांत त्यावेळी रामायणाच्या खेळांत ते सहभागी होऊन लहानमोठ्या भूमिका करीत. काही वेळेला तर सीतेची भूमिकाही ते करीत. जत्रेच्या खेळांतही ते कामे करीत असत. याचवेळी अभिनेता राजा गोसावी यांच्याशी त्यांचा परिचय झाला व त्यांनी गणपतरावांचा परिचय मा.विनायक यांच्याशी करून दिला. त्यावेळी त्यांच्यामार्फत ते मराठी चित्रपटांची निर्मिती करीत असत. मा.विनायक यांनी त्यांना आपल्या कंपनीत एक हरकाम्या कलाकार म्हणून घेतले. सुरूवातीला त्यांनी शालिनी स्टुडिओत सुतारकाम रंगभूषा सहाय्यक म्हणून काम केले. 'बालध्रुव' या चित्रपटांत त्यांनी बालकलाकार म्हणूनही काम केले. मा. विनायकांच्यासह राजा गोसावी व गणपत पाटीलही मुंबईत आले, पण तरूण वयांतच मा.विनायक यांचे देहावसान झाल्याने दोघेही परत कोल्हापूरला आले.

कोल्हापूरला आल्यावर गणपत पाटील जयप्रभा स्टुडिओमध्ये जाऊन भालजी पेंढारकर यांना भेटले व त्यांना आपल्या स्टुडिओमध्ये काम देण्याची विनंती केली. भालजींनी त्यांना 'तू आता स्टुडिओमध्ये सटरफटर कामे करू नकोस. तू आंता फक्त अभिनयावर लक्ष केंद्रीत कर' असा सल्ला दिला. व त्यांना राजा परांजपे यांचेकडे पाठविले. राजा परांजपे त्यावेळी 'बलिदान' नावाचा चित्रपट करीत होते, त्यांनी गणपत पाटलांना या चित्रपटांत एक भूमिका दिली. त्याचवेळी राम गबाले 'वंदे मातरम' नावांचा चित्रपट निर्माण करीत होते, त्यांनीही त्यांना या चित्रपटांत काम दिले. त्यानंतर भालजी पेंढारकर यांनी त्यांच्या आगामी 'मीठभाकर' या चित्रपटांत खलनायकी भूमिका दिली. या तीन मातब्बर दिग्दर्शकाच्या चित्रपटांत काम केल्याने गणपत पाटलांना चांगली प्रसिद्धी मिळाली व चित्रपटासोबत त्यांना नाटकातही काम करण्यासाठी निमंत्रणे येऊ लागली.

जयशंकर दानवे यांच्या 'ऐका हो ऐका' या ग्रामीण ढंगाच्या तमाशाप्रधान नाटकांत गणपत पाटलांना सोंगाड्याची अर्थात नाच्याची भूमिका मिळाली. ती त्यांनी लिलया रंगतदार केली. त्यांच्या विशिष्ट शैलीत केलेला अभिनयामुळे ते खूप लोकप्रिय झाले. त्यानंतर 'जाळीमंदी पिकली करवंद' या नाटकांतही त्यांनी नाच्याची भूमिका केली व ती लोकप्रिय केली. त्यांच्या अभिनय शैलीत बसणारी भूमिका कृष्णा पाटील या निर्मात्याने त्यांच्या 'वाघ्यामुरली' या चित्रपटांत गणपत पाटलांना दिली व ती त्यांनी गाजवली. त्यामुळे नाच्याची भूमिका म्हणजे गणपत पाटील असे समीकरण रूढ झाले. त्यानंतरच्या 'सख्या सजना' या चित्रपटांतील सोंगाड्या त्यांनी विलक्षण ताकदीने उभा केला. या चित्रपटामुळे गणपतराव पाटलांवर नाच्याचा व तृतीयपंथी कलाकाराचा शिक्का बसला व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल वेगळीच शंका घेण्यास शंकासूरांनी सुरूवात केली. त्यांच्या 'आत्ता ग बया' या संवादाला दाद दिली नसेल असा मराठी माणूस शोधून सापडणार नाही. अंगामध्ये मखमली कुर्ता, त्यावर जॅकेट व गळ्याला गुंडाळलेला रंगीबिरंगी रूमाल व त्यावर डोक्यावर बुहेदार टोपी यामुळे त्यांचे नाच्याचे ध्यान रंगतदार दिसत असे. त्यांचे ठुमकत चालणे, हनुवटीवर मूठ ठेऊन लाडीक बोलणे व त्यांची देहबोलीवरून नाच्या म्हणजे गणपत पाटील व गणपत पाटील म्हणजे टाळी वाजविणारा, बाईल बुध्या अशी त्यांची हेटाळणीही काही टवाळ प्रेक्षक करू लागले. त्यांच्या अशा प्रतिमेमुळे त्यांच्या घरांतही वादळ निर्माण झाले. त्यांच्या मुलामुलीच्या लग्नांतही अनेक अडचणी निर्माण झाल्या 'त्यांचे वडील बायल्या आहेत, नाचे आहेत अशा घरांत आपण मुलगी द्यायची वा अशा घरांतही मुलगी आपण आपल्या घरांत आणायची?' असे हेटाळणीचे बोल गणपत पाटलांना ऐकून घ्यावे लागले.

ज्या कलाकाराने 'राम राम पाव्हणं' व 'पाटलाचा पोर' या चित्रपटांपासून आपल्या भूमिकेची चौकट स्थिर केली. 'छत्रपती शिवाजी महारा' व 'थोरांतांची कमळा' या ऐतिहासिक चित्रपटांपासून १९६० च्या 'शिकलेली बायको', 'पाठलाग' सारख्या चित्रपटांतून अप्रतिम कामे केली. 'सवाल माझा ऐका' 'वाघ्या मुरली' 'केला ईशारा जाता जाता', 'बाई मी भोळी', 'देवा तुझी सोन्याची जेजुरी', 'सुरंगा म्हनतात मला', 'सांगू मी कशी?' 'छंद प्रितीचा', 'धन्य ते संताजी धनाजी', 'एक गांव बारा भानगडी', 'केला ईशारा जाता जाता', अशा विविध विषयांवरील चित्रपटांत वेगवेगळ्या भूमिका करूनही गणपत पाटलांवर तमाशाचा शिक्का बसला तो कायमचाच. त्यामुळे सार्वजनिक जीवनांत आपला 'तमाशा' होऊ लागलाय हे गणपत पाटलांच्या लक्षांत येऊ लागले होते. १९६९ सालच्या 'गणगौळण' व 'खंडोबाची आण' या चित्रपटाचे चित्रीकरणाचे वेळी त्यांनी आपली अस्वस्थता व्यक्त करण्याचा प्रयत्न केला, पण एकाच ई मेजमध्ये अडकून पडल्याने तो प्रयत्न फोल गेला. लगचे १९७० मध्ये 'अशी रंगली रात' व 'गणान घुंगरू हरवलं' या चित्रपटांत त्यांना मोठ्या भूमिका मिळाल्या. 'अशीच एक रात्र होती' व 'लाखांत अशी देखणी' अशा चित्रपटांतून त्यांना तशाच प्रकारच्या भूमिका कराव्या लागल्या. मात्र दादा कोंडके यांच्या सोंगाड्याने त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली. 'पुढारी', 'सून माझी सावित्री', 'सुगंधी कट्टा', 'कलावंतीण', 'नेताजी पालकर', 'हळदीकुंकू', 'राखणदार', 'इरसाल कार्टी', 'लावण्यवती' व 'मा. मुख्यमंत्री गणपत गावडे' हे त्यांचे चित्रपटही गाजले. त्यामुळे ते लोकप्रियतेच्या शिखरावर होते व त्यावेळच्या प्रसिद्ध मराठी नायिका जयश्री गडकर, उषा नाईक, रंजना, मधु कांबीकर, माया जाधव, या मात्र गणपत पाटील आपल्या चित्रपटांत असावेत असा आग्रह धरीत असत. त्यामुळे त्यांना सतत नाच्याच्या भूमिका कराव्या लागल्या, व घरचा संसार हा सर्वांच्या टवाळकीचा विषय झाला. त्यामुळे घरांतील पत्नीसह मुलामुलींना प्रचंड मानसिक त्रास झाला. यांतूनही बाहेर पडणेही अवघड होऊ लागले व पुनः पुन्हा गणपत पाटलांना तोंडाला रंग लावून कॅमेऱ्यासमोर उभे राहण्याची पाळी आली.

दुःख, तिटकारा अपमान याखेरीज पदरांत काही पडले नाही. त्यांनी आपल्या जीवन चरित्राचे नाव 'रंग नटेश्वराचे' असे ठेवले व पुस्तक प्रसिद्ध केले. तमाशांत व चित्रपटांत अशा प्रकारच्या भूमिका करणाऱ्या कलावंतांच्या जीवनावर व त्यांच्या संघर्षावर सुप्रसिद्ध लेखक आनंद यादव यांनी 'नटरंग' नावांची कादंबरी लिहिली. पुढे दिग्दर्शक रवि जाधव यांनी त्यावर 'नटरंग' नावांचाच चित्रपट निर्माण केला व अशा कलाकरांची व्यथा जगासमोर मांडल्यामुळे अशा कलावंतांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला. सन २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने लोकप्रियतेचाही उच्चांक गाठला होता. गणपत पाटील यांचे २३ मार्च २००८ मध्ये निधन झाले. सन २०१३ मध्ये त्यांना विशेष 'दिनानाथ मंगेशकर पुरस्कार' मरणोत्तर मिळाला. त्यापुर्वी २००५ मध्ये त्यांना 'झी गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यांत आले होते.

गणपत पाटील यांनी केलेल्या नाटकांत सोळाव वरीस धोक्याच' हे नाटक खूप लोकप्रिय होते, त्यांत अरूण सरनाईक, उषा नाईक, यांनी भूमिका केल्या होत्या. जगदिश दळवी लिखित 'लावणी भुलली अभंगाला' हे नाटकती खूप गाजले होते, शिवाय 'आल्या नाचत मेनकां रंभा', 'नर्तकी' व 'राया मी डाव जिंकला' ही नाटकेही गाजली होती. 'मा. मुख्यमंत्री गणपतराव गावडे हा प्रमोद प्रभुलकर निर्मित व दिग्दर्शीत चित्रपट हा गणपतराव शेवटचा सन २००६ मधील चित्रपट यामध्ये भरत जाधव, दिप्ती घरत, दिगंबर नाईक, मधुराणी भोसले यांच्या भूमिका होत्या.



## अतिभव्य राष्ट्रीय उद्यान

**वाचा तर खरं**

**द**क्षिण आफ्रिकेतलं दोन राष्ट्रीय उद्यानांनी मिळून तयार झालेलं त्साओ राष्ट्रीय उद्यान ही वन्य जीवप्रेमींसाठी पर्वणीच. त्साओ ईस्ट नॅशनल पार्क आणि त्साओ वेस्ट नॅशनल पार्क अशी ही दोन अभयारण्यं आहेत.
केनियातल्या कोस्ट प्रांतात वसलेलं हे राष्ट्रीय उद्यान नैरोबी शहर आणि मोंबासा यांच्या मध्यभागी आहे. मोंबासाला केनियाच्या दुर्गम भागांना जोडणारा रेल्वेमार्ग याच राष्ट्रीय उद्यानातून जात असल्यामुळे त्याचे दोन भाग करण्यात आले. त्साओ ईस्ट हे केनियातल्या सर्वात जुन्या राष्ट्रीय उद्यानांपैकी एक. १३,७४७ चौरस किलोमीटर एवढ्या प्रचंड भूभागावर पसरलेलं हे राष्ट्रीय उद्यान म्हणजे एक आश्चर्यच. त्साओ वेस्ट राष्ट्रीय उद्यानाचा विस्तार ९०६५ चौरस किलोमीटर एवढ्या परिसरात झाला आहे. १९४८ च्या एप्रिल महिन्यात हे उद्यान सर्वसामान्यांसाठी खुलं करण्यात आलं. या दोन्ही राष्ट्रीय उद्यानांमध्ये वैविध्यपूर्ण जंगल सफारींचा आनंद लुटता येतो. त्साओ ईस्ट राष्ट्रीय उद्यानात सिंह, काळे गेंडे, केप बफेलो, बिबटे आणि हत्ती हे प्राणी पाहता येतात. यासोबतच हिप्पोपोटेमस, जिराफ, झेब्रा, बबून असे प्राणीही इथे आहेत. या भागात वेगवेगळ्या प्रजातींचे पक्षीही सुखाने नांदतात. म्हणूनच पक्षी निरिक्षकांसाठीही या अभयारण्यात बरंच काही आहे. ही दोन्ही अभयारण्यं सुमारे २२ हजार चौरस किलोमीटर परिसरात पसरली आहेत. केनियाचा चार टक्के भूभाग या अभयारण्यांनीच व्यापला आहे. या अभयारण्यांमधला काही भाग फक्त वन्य जीवांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. इथे पर्यटकांना जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. या अभयारण्यांमध्ये जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात.

## मोमोतारो

**जपानी लोककथा**

**खू**प वर्षांपूर्वी जपानमधील एका छोट्या गावात एक वृद्ध शेतकरी आणि त्याची बायको राहत होती. त्यांना मूल नव्हतं. एके दिवशी ती वृद्ध स्त्री नदीवर कपडे धुण्यास गेली. तिला पाण्यातून एक मोठे पीच वाहत



येताना दिसले. तिने ते घरी आणले. घरी आल्यावर ती आणि तिचा नवरा पीच कापण्यासाठी बसले. पीच उघडताच त्यातून एक गोंडस बाळ बाहेर आले. त्यांनी त्या मुलाला नाव दिलं मोमोतारो. म्हणजे 'पीचमधून जन्मलेला मुलगा'
मोमोतारो जसा जसा मोठा होत गेला तसा तो खूप ताकदवान बनला. गावकरी त्याला सांगत,की दूरच्या बेटावर काही राक्षस राहतात. ते लोकांना त्रास देतात. वस्तू लुटतात. एकदा खरोखरीच त्या राक्षसांनी मोमोतारोच्या गावावर हल्ला केला आणि गावात होते नव्हते ते सारे लुटून नेले. राक्षसांशी लढून आपल्या गावातल्या लोकांच्या वस्तू परत आणायच्या असे मोमोतारोने ठरवले.
आईने त्याच्यासाठी खास तांदळाच्या पुऱ्या दिल्या. प्रवासात



मोमोतारोला एक कुत्रा, एक माकड आणि एक कावळा भेटले. मोमोतारोने आपल्याजवळच्या पुऱ्या त्यांना दिल्या. त्यामुळे त्यांची मोमोतारोशी मैत्री झाली. 'राक्षसांशी लढायला आम्ही तुझ्याबरोबर येतो.' ते म्हणाले.
ते चौघेही ते राक्षसांच्या बेटावर गेले.



त्यांची खूप मोठी लढाई झाली.आपल्या पराक्रमाने आणि चतुराईने मोमोतारोने राक्षसांना हरवले. राक्षसांनी गावकऱ्यांचा खजिना परत दिला. विजयी मोमोतारो आपल्या मित्रांसह गावात परत आला. लोकांनी त्याला आपल्या गावाचा राजा बनवले. त्यानंतर सर्वजण सुखाने राहू लागले.



## कुतुहलजनक गोरिला

**रंजक ग्यान**

**गो**रिला हा माणसांशी साधर्म्य साधणारा प्राणी आहे. माणूस आणि गोरिला यांच्या जनुकांमध्ये फक्त तीन टक्के फरक आहे. गोरिला हसू शकतात. त्यांना दु:ख होतं. तसंच ते इतर भावभावनाही व्यक्त करू शकतात. प्रत्येक गोरिलाच्या बोटांचे ठसेही वेगवेगळे असतात. गंमत म्हणजे प्राणीसंग्रहालयातलेच नाही तर जंगलात राहणारे गोरिलाही सांकेतिक आणि बोली भाषा आत्मसात करतात. गोरिला जवळपास दोन हजार शब्द शिकू शकतात. म्हणूनच त्यांची गणना जगातल्या बुद्धिवान प्राण्यांमध्ये केली जाते. गोरिलाच्या हातांची लांबी पायांच्या लांबीपेक्षा जास्त असते. म्हणूनच गोरिला चार पायांवर चालणं पसंत करतात. हा प्राणी माणसांप्रमाणे दोन पायांवरही चालू शकतो. पण हात आणि पाय या दोहोंचा वापर करून चालल्यामुळे त्यांना शरीराचं संतुलन साधता येतं. शिवाय झाडावर किंवा उंचवट्यावर चढणं सोपं जातं. गोरिला समूहात राहतात. एका समूहात साधारणपणे दहा गोरिला असतात. गोरिलांच्या समूहाला 'ट्रूप्स' म्हटलं जातं.
माणसाच्या गर्भातल्या बाळची पूर्ण वाढ व्हायला नऊ महिने लागतात तर गोरिलाची मादी ८.५ महिन्यांनी बाळाला जन्म देते. प्रौढ गोरिला दिवसाला साधारणपणे ४० पाउंड अन्न खातो. गोरिला आणि माणसांच्या जनुकांमध्ये साम्य असल्यामुळे माणसांना होणारे बरेचसे विकार गोरिलानाही जडू शकतात. म्हणूनच गोरिला सफारीमध्ये गोरिला आसपास असतील तर तोंडावर हात ठेऊन खोकण्याचा किंवा शिंकण्याचा सल्ला दिला जातो. गोरिलाची मादी पिल्लू तीन वर्षांचं होईपर्यंत काळजी घेते.

**चित्र रंगवा**



**तिपके जुळवा**



## करिअर... वेगळ्या वाटांवरचं

**कोण होणार?**



**मो**ठं झाल्यावर कोण होणार, असं विचारल्यावर तुमच्यातले बरेचजण डॉक्टर, इंजिनिअर, बँक अधिकारी, सीए, एमबीए असं काही तरी सांगतात. पण मुलांनो, आज करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. तुम्हाला या नेहमीच्या वाटेवर न चालता वेगळं काही करायचं आहे का? मग या पर्यायांचा नक्की विचार करा.

- तुम्हाला राजकारणात रस असेल तर पॉलिटिकल कॅम्पेन मॅनेजर म्हणून काम करता येईल. हे काम वाटतं तितकं सोपं नाही. यासाठी तुम्हाला बरंच डोकं चालवावं लागतं. एखाद्या पक्षाची राजकीय मोहीम यशस्वी करून दाखवण्यासाठी निरनिराळ्या कल्पना लढवाव्या लागतात. अनेकदा तणावाची परिस्थिती हाताळावी लागते. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुमच्याकडे संवादकौशल्य असायला हवं. तसंच पॉलिटिकल सायन्स या विषयाचा अभ्यास करता येईल.
- इमोशनल इंटेलिजन्स डिझायनर म्हणूनही काम करता येईल. कॉम्प्युटर सायन्स किंवा सायकॉलॉजी या विषयाचं ज्ञान घेऊन तुम्हाला पुढे जाता येईल. सायकॉलॉजी हा विषय घेऊन पदवी घेता येईल. तसंच या विषयात उच्च शिक्षणही घेता येईल.
- सध्याच्या काळात प्रत्येकालाच स्मार्ट घरं हवी असतात. म्हणूनच गृहसजावटीला प्रचंड महत्त्व आलं आहे. तुमच्यात कल्पकता, कलात्मकता असेल, घराच्या सजावटीच्या विविध कल्पना असतील तर क्रिएटिव्ह होम डेकोर क्षेत्राकडे वळता येईल. या क्षेत्रात काम करण्यासाठी विशिष्ट पदवीची गरज नसते. अंगभूत कौशल्यांच्या बळावर तुम्ही या क्षेत्रात पुढे जाऊ शकता.

## नवबांचं शहर लखनऊ

**सफर शहरांची**

**मि**त्रमैत्रिणींनो, लखनऊ ही उत्तर प्रदेशची राजधानी. या शहराला खूप मोठा इतिहास आहे. लखनऊ नवाबांचं शहर म्हणूनही ओळखलं जातं. इथले लोक पाहुण्यांचं खूप छान स्वागत करतात. चला तर, मग लखनऊची सफर करू या. लखनऊ हे सीसीटीव्हींचं भारतातलं पहिलं शहर आहे. या शहरात अनेक सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. संपूर्ण शहरात जवळपास चार हजार सीसीटीव्ही आहेत. लखनऊ शहर १८५७ च्या उठावाच्या प्रमुख केंद्रांपैकी एक. ब्रिटिशांविरुद्धचा हा उठाव लखनऊपासून कानपूरपर्यंत आणि नंतर पुढे बंगालपर्यंत पसरला. लखनऊमध्ये खाण्यापिण्याची चंगळ असते. माखन मलई, शाही तुकडा, मलई की गिल्लोरी, गुलाबी चाय आणि लखनवी पान हे पदार्थ खूपच प्रसिद्ध आहेत. त्यामुळे खवय्यांसाठी लखनऊला जाणं ही खूप मोठी पर्वणी ठरते. या शहरात अनेक ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळं आहेत. शाही बावली ही राजेशाही विहिर इथे आहे. गुजरात आणि राजस्थानमध्ये अशा असंख्य विहिरी पहायला मिळतात. शाही बावली हे लखनऊचं खास आकर्षण आहे. इथल्या विविध इमारतींवरची स्थापत्य कला बघण्यासारखी आहे.



## वीणा

**वाद्यांची ओळख**

**भा**रतीय संगीतपरंपरेत वीणा या वाद्याला खूप सन्मान दिला जातो. देवी सरस्वतीच्या हातात वीणा असते. त्यामुळेतिलासांस्कृतिक आणि धार्मिक महत्व आहे. वीणा हे अत्यंत प्राचीन वाद्य आहे. वीणेचे विविध प्रकार आहेत. सारंगी वीणा, रवि वीणा, तात वीणा आणि रास वीणा. प्रत्येक प्रकाराची लांबी, स्वर आणि वाजवण्याची पद्धत वेगळी असते. वीणा वाजवण्यासाठी तारांना बोटांनी किंवा सुईसार'या साधनांनी स्पर्श केला जातो.मंदिरांमध्ये आणि संगीत मैफलीत वीणेचा वापर केला जातो. अनेक महान संगीतज्ञांनी वीणेसह संगीताच्या उत्कृष्टरचना सादर केल्या आहेत.
वीणेचे सारस्वती वीणा आणि रुद्र वीणा असे दोन महत्वाचे प्रकार आहेत. देवी सरस्वती यांच्या हातातील वाद्य म्हणून यालासारस्वती वीणाम्हणतात.ही वीणा मोठी आणि लाकडी असते. एका टोकाला मोठा भोपळ्यासारखा भागअसतो.त्याला तुंबा म्हणतात.या वीणेला ४ मु'य आणि ३झंकारासाठी अशा ७धातूच्या तारा असतात.वीणा बसून मांडीवर ठेवून वाजवली जाते. रागांची अभिव्यक्ती गोड, मृदू आणि लयबद्ध असते.डॉ. जयंती कुमारेश, राजेश वैद्य, डी. बालकृष्ण हे सारस्वती वीणावादक आहेत. भगवान शंकरांनीरुद्र वीणानिर्माण केल्याची आ'यायिका आहे. लांबबांबू किंवा लाकडी दांड्यालादोन मोठे भोपळे म्हणजेच तुम्बेजोडलेले असतात.साधारण२४ पट्ट्या आणि७ ताराअसतात.आकाराने मोठी व जड असते.ही वीणा गळ्यात



अडकवून किंवा पायावर ठेवून वाजवली जाते. बहाऊद्दीन डागर, झियामोईनुद्दीन डागर, असद अली खान हे प्रसिद्ध रुद्रवीणा वादक आहेत.

## आल्प्स पर्वतरांगा

**आ**ल्प्स ही युरोपातील सर्वात मोठी पर्वतरांग आहे. ही सुमारे १२०० किलोमीटर लांब पसरलेली आहे. फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली, जर्मनी, ऑस्ट्रिया, स्लोव्हेनिया आणि लिक्टेंस्टाईन या देशांमध्ये आल्प्स पर्वतरांगा पसरलेल्या आहेत. नैसर्गिक सुंदरता, उंच शिखरे, हिरवीगार मैदाने, धबधबे, हिमनद आणि तलाव यामुळे ही पर्वतरांग अत्यंत सुंदर आहे. उंचीच्या दृष्टीने आल्प्स पर्वतरांग विविध स्तरांमध्ये विभागली जाते. सपाट आणि झुडुपांनी भरलेली पठारे, मध्यम उंचीची पर्वतरांग, आणि बर्फाने झाकलेलीउच्च शिखरे.



आल्प्स पर्वतरांगांमध्ये विविध प्राणी आणि वनस्पती आढळतात. आइबेक्स, मार्मोट्स, आणि अनेक प्रकारचे दुर्मिळ पक्षी आणि प्राणीया भागात आढळतात. आल्प्समध्ये पर्वतीय फुलझाडे, झुडुपे, आणि अल्पाइनची जंगले आढळतात. लोक ट्रेकिंग, हायकिंग, स्कीइंग, आणि पर्वतारोहण आणि पर्यंटन यासाठी आल्प्स पर्वतरांगाना भेट देतात.
आल्प्स पर्वतरांगआर्थिक दृष्ट्या देखील महत्त्वाची आहे. येथे शेतकऱ्यांसाठी पठारावर शेती केली जाते. विशेषतः दुग्धजन्य प्राणी, गवत आणि काही फळांचे उत्पादन केले जाते. पर्यटनामुळे आल्प्स प्रदेशांमध्ये रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. याशिवाय, आल्प्सच्या नदी आणि तलावांपासून जलऊर्जेचा स्त्रोत देखील मिळतो. या पर्वतामुळे हवामान शीत, समशीतोष्ण आणि बर्फाळ भागांमध्ये विभागलेले आहे.त्याचा युरोपातील नद्या, जंगले आणि शेतीवर परिणाम होतो.नैसर्गिक सौंदर्य, विविध प्रकारच्या जीवसृष्टी आणि पर्वतीय जीवनशैली यामुळे जगभरातील लोकांनाया पर्वतरांगेचे आकर्षण वाटते. विशेष म्हणजे या पर्वतरांगेचा युरोपाच्या इतिहास, कला, पर्यटन, आणि आर्थिक जीवनावर मोठा प्रभाव आहे.

**दोस्त हे मस्त**

### भीतीदायक कोमोडो ड्रॅगन



कोमोडो ड्रॅगन नावाचा एक प्राणी आहे. इंडोनेशियातल्या कोमोडो, रिंका, फ्लोर्स आणि गिल मोतांाग या बेटांवर तो आढळतो. कोमोडो ड्रॅगन हा पालीच्या प्रजातीचा प्राणी आहे. या प्राण्याची लांबी जवळपास १० मीटर असते. त्याचं वजन १३६ किलोपर्यंत असू शकतं. कोमोडो ड्रॅगन ही जगातली सर्वात वजनदार पालीची प्रजाती आहे. हा प्राणी खूप भयानक दिसतो. तो वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी खातो. एका वेळी तो भरपूर खाऊ शकतो. कोमोडो ड्रॅगन भीतीदायक असले तरी प्रत्यक्षात खूप खेळकर असतात.

**खादाडी**

### मस्त मसाला इडली



दोस्तांनो, संध्याकाळची किंवा सकाळी केलेली इडली उरली असेल तर त्यापासून मस्तपैकी मसाला इडली बनवता येईल. इडलीचे छोटे तुकडे करा. थोडा कांदा चिरून घ्या. हिरवी मिरची, लसूण, आलं, तिखट, मीठ असं साहित्य घ्या. आता एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर थोडी मोहरी(राई) घाला. राई तडतडली की त्यात कांदा घालून परता. आलं आणि लसूण कुटून घ्या. ते घाला. हिरवी मिरची, तिखट, मीठ घाला. मग इडलीचे तुकडे घालून नीट मिक्स करा. वरून कोथिंबिर घाला. तुमची मसाला इडली तयार आहे!

**स्टडी टिप्स**

### आता सरावावर भर द्या...



दोस्तांनो, परीक्षा जवळ येऊ लागली की खूप ताण येतो. पण या दिवसात नवं काही तरी शिकण्याच्या फंदात पडू नका. आधी केलेल्या अभ्यासाची उजळणी करा. महत्त्वाच्या धड्यांवर भर द्या. नव्या विषयांचा अभ्यास करताना जास्त ताण येऊ शकतो. अखेरच्या टप्प्यात सरावावर भर द्या.

**योगा**

### चेहरा ठेवा मस्त!



मुलांनो, काहीजणांचा चेहरा खूप फुगीर किंवा जाड दिसतो. त्यांना दोन हनुवट्या असल्यासारखं वाटतं. गळ्यालगतही फॅट्स असतात. यामुळे आपलं व्यक्तिमत्त्व चांगलं दिसत नाही. काही योगासनं करून चेहऱ्यावरचे फॅट्स कमी करता येतील. 'सिंहाच्या चेहऱ्यासारखा' व्यायाम केल्यामुळे तुमचा चेहरा बारीक दिसू शकतो. यासाठी मोठा 'आ' करा. जीभ बाहेर काढा. श्वास बाहेर सोडत रहा. डोळे मोठे करा. दोन ते तीन मिनिटं याच स्थितीत थांबा. मग मांडी घालून बसा आणि दीर्घ श्वास घ्या. हा व्यायाम नियमितपणे करा.

# दिल्ली कसोटीत भारताचं वर्चस्व

## दिवसभरात २ बाद ३१८ धावा; कॅरोबियन गोलंदाजी निष्प्रभ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संघातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा कसोटी सामना दिल्लीतील अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर खेळला जात आहे. भारतीय संघ हा सामना जिंकून मालिका क्लीन स्वीप करण्याच्या इराद्यानं मैदानात उतरेल. भारतीय संघाने मालिकेतील पहिला सामना एक डाव आणि १४० धावांनी जिंकला होता. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार गिलने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्याचा हा निर्णय भारतीय फलंदाजांनी सार्थ ठरवला. परिणामी दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाने ९० षटकांत २ बाद ३१८ धावा केल्या. दिवसअखेर संघाचे सलामीवीर यशस्वी जैस्वाल १७३ आणि कर्णधार शुभमन गिल २० धावांवर नाबाद आहेत.



### दिल्लीच्या मैदानावर कामगिरी

**भारतीय संघाने दिल्लीच्या अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर एकूण ३५ कसोटी सामने खेळले आहेत, त्यापैकी १४ जिंकले आहेत आणि ६ गमावले आहेत. शिवाय या मैदानावर १५ कसोटी सामने अनिर्णित राहिले आहेत. भारतीय संघानं १९८७ मध्ये दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला कसोटी सामना गमावला होता, जेव्हा दिलीप वेंगसरकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला पाच विकेटनं पराभव पत्करावा लागला होता. तेव्हापासून गेल्या ३८ वर्षांत भारतीय संघाने या मैदानावर एकही कसोटी सामना गमावलेला नाही.**

पहिल्या दिवशी भारताने ९० षटकांत २ बाद ३१८ धावा केल्या. यशस्वी जैस्वाल १७३ धावांसह आणि शुभमन गिल २० धावांसह खेळत आहेत. साई सुदर्शन ८७ धावा करुन बाद झाला आणि केएल राहुल ३८ धावा करुन बाद झाला. दोन्ही विकेट जोमेल वॉरिकनने घेतल्या. याशिवाय वेस्ट इंडिजचे ५ गोलंदाजांना विकेट मिळाली नाही. गिलच्या नेतृत्वाखाली भारतानं पहिल्यांदाच टॉस जिंकला. याआधी त्यांनी ६ वेळा टॉस गमावला होता. भारताच्या प्लेइंग ११ मध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही. वेस्ट इंडिजनं प्लेइंग ११ मध्ये २ बदल केले. ब्रँडन किंग आणि जोहान लिन यांच्या जागी अँडरसन फिलिप आणि टेविन इमलाचला संधी मिळाली.

भारत आणि वेस्ट इंडिजनं आतापर्यंत १०१ कसोटी सामने खेळले आहेत. या काळात वेस्ट इंडिजने वरचढ कामगिरी केली आहे. वेस्ट इंडिजनं ३० सामने जिंकले आहेत, तर भारतीय संघाने २३ सामने जिंकले आहेत. जरी वेस्ट इंडिजचा हेड-टू-हेड रेकॉर्ड वर्चस्व गाजवत असला तरी वेस्ट इंडिजने भारतात शेवटचा विजय डिसेंबर १९९४ मध्ये मिळवला होता. तसंच २००२ नंतर कॅरोबियन संघाला भारताविरुद्ध विजय मिळवता आलेला नाही.

## अभिनवच्या पैलवानांची दमदार कामगिरी



। मुंबई । प्रतिनिधी ।

शहापूर येथे पार पडलेल्या मुंबई विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा २०२५-२६ मध्ये मिरा-भाईंदर कुस्तीगीर संघ संचलित श्री गणेश आखाड्याच्या पैलवानांनी शानदार कामगिरी करत स्पर्धेवर आपली छाप उमटवली. मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सौजन्याने आयोजित या स्पर्धेत विशाल जाधव, कोमल पटेल आणि मनीषा शेलार यांनी सुवर्ण तर सूरज माने आणि सुदिक्षा जैस्वार यांनी कांस्य पदकाची कमाई केली.

९७ किलो वजनी गटात विशाल जाधवने जे. आर. साळवी कॉलेजच्या विपुल परबवर ९-० गुणांनी विजय मिळवत सुवर्ण पदकावर नाव कोरले. ५० किलो वजनी गटात कोमल पटेलने बी. के. बिर्ला कॉलेजच्या भूमी भोईरला चितपट करत सुवर्णपदक पटकावले, तर ५३ किलो वजनी गटात मनीषा शेलारने रिझवी कॉलेजच्या सबा शाहचा पराभव करून सुवर्ण विजय मिळवला.

सूरज मानेने ८६ किलो वजनी गटात कांस्य पदक जिंकले. हे चौघेही भाईंदर येथील अभिनव कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचे प्रतिनिधित्व करत आपल्या महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. त्याचबरोबर सांताक्रुझ येथील सेंट अँड्रूज कॉलेजची सुदिक्षा जैस्वार हिने ६२ किलो वजनी गटात कांस्य पदकाची कमाई केली.

अभिनव कॉलेजच्या मुला-मुलींच्या संघांनी मिळवलेल्या या यशामुळे त्यांना एकूण तिसऱ्या क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी प्राप्त झाली. या विजयी कामगिरीमागे महाविद्यालयाचे पी. टी. शिक्षक सचिन पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून सुवर्णपदक विजेत्यांची अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# निवडक

## स्मृती अव्वलस्थानी कायम

**नवी दिल्ली :** महिला एकदिवसीय विश्वचषकात दोन सामन्यांत निराशाजनक कामगिरी असूनही भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधाना आयसीसी महिला एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत ७९१ गुणांसह अव्वल स्थानी कायम आहे, मात्र तिची आघाडी कमी झाली आहे. इंग्लंडच्या नेट स्किव्हर ब्रंटपेक्षा ती ६० गुणांनी पुढे आहे. विश्वचषकाआधी ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन शतके झळकावणाऱ्या स्मृतीने श्रीलंकेविरुद्ध फक्त ८ आणि पाकिस्तानविरुद्ध २३ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाची बेथ मूनी (७१३) तिसऱ्या, दक्षिण आफ्रिकेची ताजमिन ब्रिट्स (७०६) चौथ्या तर ऑस्ट्रेलियाची एश्लेग गार्डनर (६९७) पाचव्या स्थानी आहेत. ब्रिट्सला दोन तर गार्डनरला सात स्थानांची झेप मिळाली. न्यूझीलंडची कर्णधार सोफी डिवाइन सात स्थानांनी पुढे जात आठव्या स्थानी तर पाकिस्तानची सिद्रा अमीन दहाव्या क्रमांकावर पोहोचली. गोलंदाजीत इंग्लंडची सोफी एकलेस्टोन (७९२) अव्वल असून भारताची दीप्ती शर्मा (६४०) एक स्थान घसरून सहाव्या स्थानी आहे.



## धोनी मुंबई इंडियन्सच्या जर्सीत



**नवी दिल्ली :** धोनी आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर केवळ आयपीएलमध्ये चेन्नईकडून खेळतो. आयपीएल संपल्यानंतर तो गुडघ्याच्या दुखापतीवर उपचार घेण्यासाठी विश्रांती घेतो आणि पुढील हंगामासाठी एक महिना आधी चेन्नईला परततो. याच पार्श्वभूमीवर, नुकताच कॅज्युअल फुटबॉल सामना खेळताना धोनी मुंबई इंडियन्सचा लोगो असलेली जर्सी घातलेला दिसला. या एका फोटोमुळे धोनीचे चाहते आणि क्रिकेट पंडितांना असा अंदाज लावला आहे की, तो पुढील हंगामात मुंबई इंडियन्सकडून खेळू शकतो. धोनीचा हा फोटो व्हायरल होताच चाहत्यांमध्ये लगेच दोन गट पडले. काही चाहत्यांनी या फोटोचा आधार घेत थेट मुंबई इंडियन्सकडे मागणी केली की, तुम्ही धोनीला घ्या आणि रोहितला परत चेन्नई सुपर किंग्जला द्या! तर काही चाहते धोनीवर नाराज झाले. एका युजरने नाराजी व्यक्त करत लिहिले की, हा माणूस पैशांसाठी केवळ त्याची जर्सीच नव्हे, तर त्याचे नागरिकत्व देखील बदलू शकतो. मुंबई इंडियन्सच्या जर्सीतील या फोटोमुळे चाहत्यांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

## आफ्रिकेने हिसकावला विजयाचा घास

**विशाखापट्टणम :** रिचा घोषने ७७ चेंडूंत ९४ धावांचा झंझावात साकारत अडीचशे धावांचा टप्पा सर करून दिल्यानंतरही दक्षिण आफ्रिकन महिला संघाने अगदी शेवटच्या क्षणापर्यंत निकराने झुंज देत भारताच्या हातातोंडाशी आलेला विजयाचा घास अक्षरशः हिसकावून घेतला. प्रारंभी, भारताचा डाव ४९.५ षटकांत सर्वबाद २५१ धावांवर आटोपल्यानंतर आफ्रिकेने ४८.५ षटकांत ७ बाद २५२ धावांसह सनसनाटी विजय मिळवला. विजयासाठी २५२ धावांचा पाठलाग करताना आफ्रिकेचा निम्मा संघ अवघ्या ८१ धावांत तंबूत परतला होता. मात्र, ट्रियॉनने लॉरासह सहाव्या गड्यासाठी ६१ धावांची, तर नॅदिने क्लेर्कसह सातव्या गड्यासाठी ६९ धावांची भागीदारी साकारत भारताचा संघर्ष खऱ्या अर्थाने संपुष्टात आणला. ट्रियॉन सातव्या गड्याच्या रूपाने बाद झाल्यानंतर भारताला अंधुकशी आशा होती. मात्र, नॅदिनेने ५४ चेंडूंत ८४ धावांची आतषबाजी करत भारताच्या संघर्षाला पूर्णविराम दिला.



## महाराष्ट्र ऑलिंपिक निवडणूकीच्या अध्यक्षपदासाठी अजित पवारांचा अर्ज

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक संघटनेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला आहे. आतापर्यंत अजित पवार तीन वेळा अध्यक्षपद म्हणून कार्यरत राहिले आहेत. आता ते चौथ्यांदा अध्यक्षपदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक संघटनेच्या निवडणुकीत अर्ज भरण्याची अंतिम तारीख ११ ऑक्टोबर आहे. येत्या २ नोव्हेंबरला निवडणूक पार पडणार आहे. अजित पवार यांनी २०१३ पासून महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्षपद भूषवले आहे. यंदा त्यांनी महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेकरवी ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षपदाचा अर्ज दाखल केला आहे. राज्य खो-खो संघटनेच्या अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. या व्यक्तींचाही अर्जमहाराष्ट्र राज्य ऑलिंपिक संघटनेच्या निवडणुकीसाठी अजित पवार यांच्यासह इतर व्यक्तींनीही अर्ज दाखल केला.

## लिजेंड्स स्मॅशर्सची विजयी सलामी

। पुणे । प्रतिनिधी ।

पूना क्लब लिमिटेड व डेक्कन जिमखाना क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या बॅडमिंटन लीगच्या साखळी फेरीत लिजेंड्स, स्मॅशर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धींना हरवून विजयी सलामी दिली. डेक्कन जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन हॉलमध्ये या स्पर्धेत सलामीच्या सामन्यात अमेय श्रीखंडे, राधिका इंगळहळीकर, रोहित भालेराव, वरद कर्वे, विजय अलबल, धवल जितकरच्या लिजेंड्स संघाने जॅग्वार्स संघाचा ३-२ असा, तर स्मॅशर्स संघाने शटलर्स संघाचाही ३-२ असा पराभव केला. त्यात महत्त्वाचा वाटा अक्षय गद्रे, रेवती श्रीखंडे, रवींद्र कान्हेरे, मृगेंद्र बेहेरे, अभिजित आपटे, सिद्धार्थ इनामदारचा होता..या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी



यूएसबीएचे संस्थापक अजय कन्वर, पूना क्लबचे अध्यक्ष गौरव गढोक, डेक्कन जिमखाना क्लबचे सचिव मिहीर केळकर हे उपस्थित होते.. निकाल : १) लिजेंड्स विजयी विरुद्ध जॅग्वार्स ३-२. खुला दुहेरी १ : अमेय श्रीखंडे व राधिका इंगळहळीकर वि.वि. कृष्णा बोरा व अर्णव घई खुला दुहेरी २ : रोहित भालेराव व वरद कर्वे वि. वि. अभिजित परांजपे व अर्जुन मेहता, खुला दुहेरी ३ : संध्या मेळाशिमी व हर्षवर्धन पाटील पराभूत विरुद्ध मोक्षीत पोरवाल व उमेद कोठावला खुला दुहेरी ४ : विजय अलबल व धवल जितकर वि.वि. हरीश सोळंकी व सिमोन खोरशेडी २१-७, २१-२; खुला दुहेरी ५ : ऋषभ जठार व श्रीरंग गोरे पराभूत विरुद्ध यश शहा व कुमार पोरवाल २) स्मॅशर्स विजयी विरुद्ध शटलर्स ३-२. खुला दुहेरी १ : गिरीश खिंवसरा व यश मेंधळे पराभूत विरुद्ध सारा नवरे व सुनील डागले; खुला दुहेरी २ : भूषण भंडारी व आश्विन जोशी पराभूत विरुद्ध रोहित मेहेंदळे व नीरज दांडेकर २१-; खुला दुहेरी ३ : अक्षय गद्रे व रेवती श्रीखंडे वि.वि. केदार नाडगोंडे व प्रकाश खुला दुहेरी ४ : रवींद्र कान्हेरे व मृगेंद्र बेहेरे वि. वि. सलोनी केळकर व किरण संघवी खुला दुहेरी ५ : अभिजित आपटे व सिद्धार्थ इनामदार वि.वि. प्रांजली नाडगोंडे व शुभम गोयल याच्या सामना झाला.

## मुंबई क्रिकेट संघटनेची पूरग्रस्तांना मदत

। मुंबई । प्रतिनिधी ।

यंदा पावसाने संपूर्ण राज्यात हाहकार माजवला आहे. यावर्षी मान्सून २७ मे रोजीच राज्यात दाखल झाला होता. परिणामी यंदा पावसानं लवकर आणि दमदार सुरुवात केले होती. तसंच अजूनही राज्यातील काही भागात पाऊस कोसळत आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालं आहे. शेती पिकाच्या नुकसानाबरोबर मोठ्याप्रमाणीत जमीनही खरडून गेली आहे. यासोबतच घर आणि पशुधनही वाहून गेलं आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जसे राज्य राज्य सरकार पुढं सरसावलं आहे. त्याचप्रमाणे अनेक सामाजिक संघटना, संस्था यांनीही पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढं केला आह. आता पूरग्रस्तांच्या मदतीसाठी राज्यातील प्रसिद्ध क्रिकेट संघटना म्हणून ओळख असलेली मुंबई क्रिकेट असोसिएशननं सुद्धा पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनची बैठक झाली. या बैठकीत सर्वानुमते पूरग्रस्तांसाठी एक कोटी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात सर्वदूर मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पूरग्रस्तांचे अतोनात नुकसान झाले आहे म्हणून मुंबई क्रिकेट असोसिएशन मदत करण्यासाठी नेहमीच अग्रेसर असते.

MUMBAI CRICKET ASSOCIATION

पूरग्रस्तांसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनचेही योगदान असावे म्हणून सामाजिक बांधिलकी म्हणून आम्ही एक कोटी २५ लाखांची मदत मुख्यमंत्री सहायता निधीकडे देण्याच्या निर्णय घेतला आहे.

## शिवम दुबेचं वादळी शतक

। पुणे । प्रतिनिधी ।

शिवम दुबेने पुण्यातील सराव सामन्यात महाराष्ट्राविरुद्ध वादळी शतक ठोकले. ६२ चेंडूत ९ षटकार आणि ५ चौकारांसह १०० धावा करत त्याने सर्वांचे लक्ष वेधले. दुबेचा हा फॉर्म भारत आणि मुंबई संघांसाठी दिलासादायक आहे. रणजी ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेला १५ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. या सामन्यापूर्वी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, गहुंजे, पुणे येथे मुंबई आणि महाराष्ट्र संघात तीन दिवसीय सराव सामना पार पडला. हा सामना अनिर्णित राहिला. मुंबईकडून शिवमने चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना वादळी शतक केले.

## रोनाल्डो फुटबॉल विश्वातील अब्जाधीश

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

फुटबॉल सुपरस्टार ख्रिस्तियानो रोनाल्डो याने आपल्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा खोचला. यावेळी मात्र हा विक्रम गोल किंवा ट्रॉफीसाठी नव्हे, तर त्यांच्या अभूतपूर्व संपत्तीसाठी आहे. ब्लूमबर्ग बिलियनेअर इंडेक्सनुसार रोनाल्डोची एकूण मालमत्ता १.४ अब्ज अमेरिकी डॉलर्स (सुमारे ११,५०० कोटी रुपये) इतकी झाली आहे. त्यामुळे तो फुटबॉल इतिहासातील पहिला अब्जाधीश खेळाडू ठरला आहे.



ब्लूमबर्गने सांगितले की, ही पहिलीच वेळ आहे जेव्हा रोनाल्डोची संपत्ती या प्रतिष्ठीत इंडेक्समध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या मूल्यमापनामुळे तो जगातील सर्वाधिक कमाई करणारा फुटबॉलपटू ठरला असून, त्याने आपला दीर्घकालीन प्रतिस्पर्धी लिओनेल मेस्सीला मागे टाकले आहे.रोनाल्डोच्या कमाईचा सर्वात मोठा स्रोत म्हणजे त्याचे वेतन आहे.

युरोपमध्ये खेळताना त्याचे वेतन मेस्सीच्या जवळपास होते, मात्र २०२३ मध्ये सौदी अरेबियातील अल-नस्र क्लबशी करार केल्यानंतर त्याच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे.

या करारानुसार रोनाल्डोला दरवर्षी २०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (करमुक्त) वेतन आणि बोनस मिळतो, तसेच त्याला ३० दशलक्ष डॉलर्सचा साइनिंग बोनसही देण्यात आला. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार २००२ ते २०२३ दरम्यान रोनाल्डोने एकूण ५५० दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक वेतन कमावले आहे.

आज रात्रौ ९.३० वा.
पी.एन.पी. नाट्यगृह (अलिबाग) A/C
ति.वि. आजपासून पीएनपी नाट्यगृह येथे सुरु
संयोजक : चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६



सर्वत्र ऑनलाईन तिकिट विक्री
book my show
सुरु
फ्रि पासेस बंद
प्रिया बापट सादर करीत आहे
सोनल प्रॉडक्शन्स निर्मित
जरतरची गोष्ट
लेखिका- इरावती कर्णिक
दिग्दर्शक- अद्वैत दादरकर, रणजित पाटील नेपथ्य- संदेश बेंद्रे
प्रकाश- अमोघ फडके संगीत- श्रीनाथ म्हात्रे वेशभूषा- श्वेता बापट
निर्माता- नंदू कदम
प्रिया बापट आशुतोष गोखले पल्लवी अजय आणि उमेश कामत
संपर्क - विकास पावसकर ९९२०६२९९२३, सुनील पानकर ९४२२६३०१०५

## दोन सामन्यांच्या मालिकेत मिळविले यश | दोनच दिवसांत जिंकली कसोटी

# युवकांनी उडवला कांगारुचा धुव्वा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताच्या १९ वर्षाखालील युवा संघाने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर यजमान कांगारूंची अक्षरशः कत्तल केली असे म्हटल्यास नक्कीच वावगे ठरणार नाही. कारण पहिल्या कसोटीत अडीच दिवसांतच ऑस्ट्रेलियन युवा संघाचा खेळ खल्लास करणाऱ्या युवा भारताने चार दिवसांची दुसरी कसोटीही अवघ्या दोनच दिवसांत जिंकून यजमान संघावर निर्विवाद वर्चस्व गाजविले. भारताने या मालिकेत २-० फरकाने बाजी मारत निर्भेळ यश संपादन केले. तसेच याआधी झालेली एकदिवसीय मालिकाही भारताच्या युवा ३-० फरकाने जिंकली होती.



ब्रिस्बेनमधील पहिल्या कसोटीत भारताच्या युवा संघाने यजमानांना डाकाने आणि ५८ धावांनी धूळ चारली होती. मॅकमधील दुसऱ्या कसोटीत मात्र ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीचा पूर्णपणे ऱ्हास झाला. त्यांना पहिल्या डावात १३५, तर दुसऱ्या डावात जेमतेम ११६ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून ॲलेक्स ली यंग (६६ व ३८) याने काही प्रमाणात भारतानी गोलंदाजीचा प्रतिकार केला, पण इतर फलंदाज पूर्णपणे अपयशी ठरले. पहिल्या डावात १७१ धावा करणाऱ्या भार-ताने विजयासाठी मिळालेले ८१ धावांचे लक्ष्य १२.२ षटकांत ३ बाद ८४ धावा करीत सहज पूर्ण करीत ७ गडी राखून विजयावर शिक्कामोर्तब केले.

### पहिल्या डावात भारताची आघाडी

**पहिल्या डाकात ऑस्ट्रेलिया १३५ धावांत गारद झाला. यंगने केलेल्या ६६ धावांशिकाय बाकी सर्क फलंदाज अपयशी ठरले. भारताकडून हेनिल पटेल व खिलन पटेल यांनी तीन-तीन बळी टिपले. प्रत्युत्तरात भारतीय संघाने १७१ धाका करत पहिल्या डावात ३६ धावांची आघाडी घेतली. हेनिल पटेल (२२) आणि दीपेश देवेंद्रन यांची जोडी आज सकाळी लककर तुटली; पण देवेंद्रनने २८ धाका करून भारताला समाधानकारक धावसंख्या उभारून दिली. ऑस्ट्रेलियाकडून केसी बार्टनने ४ फलंदाज बाद केले.**

GOLDEN SATURDAY LOTTO INDIA
Government of Mizoram
WIN JACKPOT
1.37 CRORE+
तिकीट ₹30/-
दर आठवड्याला जॅकपॉट रोलओव्हर
ड्रॉ दर शनिवार 9:30 PM
स्टार लॉटरी सेंटर
बँक ऑफ इंडिया समोर, पाध्ये वाडी, अलीबाग - 94220 94112
प्रिती ऑनलाइन
पोस्ट रेवदंडा, जनसेवा डेअरी जवळ, अलीबाग - 70832 25555
Live Draw on YouTube channel : GoldenLottery
रिटेलरशिपसाठी आमच्याशी संपर्क साधा:
गोल्डन लोटो मुंबई 83693 33517
18+

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आँर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)